॥ ॐ नमः सिद्धम् ॥

श्रीचंद्रसागर-जैन-ग्रंथमाला.

(२)

# प्रथमानुयोगशास्त्र

अथवा

# जैन लोकांचा इतिहास.

लेखक—'अनंततनय.'

प्रकाशक,

भरमप्पा पदमप्पा पाटील.

सेक्रेटरी, श्रीचंद्रसागर जैनग्रंथमाला, होसूर—बेळगांव.

[ प्रथमावृत्ति. ]

बेळगांव श्रीमहावीर छापखान्यांत छापिलें.

( सर्व हक्क स्वाधीन. )

श्रीमहावीर शके २४४४. ] [ सन १९१८ इसवी.

किंमत १२ आणे.

THE

# PRATHAMANUYOGASHASTRA

OR

# HISTORY OF JAINS.

( Traditional and authentic. )

AUTHOR—" ANANTATANAYA."

PUBLISHED BY
BHARAMAPPA PADMAPPA PATIL,
*Secretary*
**Shri Chandrasagar Jain Granthamala, Hosur,**
at Hosur, Post—Shahapur-Belgaum.

( *All rights reserved by the publisher.* )

PRINTED BY
DEVENDRA PHADEPA CHAUGULE,
AT HIS
SHRI MAHAVIR PRESS, BELGAUM.

***Price 12 Annas.***



प्रो० आण्णा बाबाजी लठ्ठे, एम्. ए., एल्.एल्. बी.

# अर्पणपत्रिका.

हें

पुस्तक

महाराष्ट्रांतील जैनसमाजाचे आद्य सूत्रधार,

विद्यागुरु,

प्रो० आण्णा बाबाजी लठ्ठे,

एम् ए. एल्एल्, बी. ( बेळगांव )

यांना

अत्यंत प्रेमानें अर्पण केलें असे.

—लेखक.

# प्रकाशकांचे दोन शब्द.

सुमारें चार वर्षांपूर्वी श्रीचंद्रसागर जैन-ग्रंथमालेचें पहिलें पुष्प ह्मणून '**श्रीभक्तामरवृत्तिसारसमुच्चय**' नामक कानडी ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला असून, मालेच्या नियमानुसार ट्रस्टींच्या सम्मतीनें आतां कोल्हापूरचे प्रसिद्ध जैन-लेखक 'अनंततनय' यांनीं परिश्रमपूर्वक तयार केलेलें मराठी भाषेंतील '**प्रथमानुयोगशास्त्र अथवा जैन-लोकांचा इतिहास**' हें पुस्तक ( पुष्प २ रें ) प्रसिद्ध करण्यांत येत आहे. तरी या उपयुक्त पुस्तकास मराठी वाचकवर्गाचा चांगला आश्रय मिळेल अशी आह्मांस उमेद आहे.

या पुस्तकाच्या उपयुक्ततेची कल्पना त्याच्या लेखकांनीं स्वतः लिहिलेली पुढील 'प्रस्तावना' वाचली असतां वाचकांना चांगल्या रीतीनें होईल. पण सबंध पुस्तक वाचणाऱ्यास त्याचें महत्व उत्तम प्रकारें कळेल, यांत मुळींच संशय नाहीं. अशा प्रकारचें हें पुस्तक मालेकरितां निःस्वार्थ बुद्धीनें लिहून दिल्याबद्दल 'अनंततनय' यांचे मालेवर फारच उपकार झाले आहेत, हें अगदीं उघड आहे. उत्तरोत्तर 'अनंततनय' यांच्या हस्तें अशींच लोकोपकारक कृत्यें बाहेर पडतील अशी आह्मांस आशा आहे.

शेवटीं श्रीमहावीर प्रेसचे मालक श्री. देवेंद्रप्पा चौगुले यांनीं या पुस्तकाच्या छपाईचें काम काळजीपूर्वक व सुरेख रीतीनें करून दिल्याबद्दल त्यांचे आभार मानणें उचित आहे.

| | |
|---|---|
| **होसूर-बेळगांव,** | **भरमप्पा पदमप्पा पाटील,** |
| ज्येष्ठ शु० १५ श्रीमहावीर शके २४४४. | सेक्रेटरी, |
| ता० २४ जून सन १९१८. | श्रीचंद्रसागर जैन-ग्रंथमाला. |

# प्रस्तावना.

अलीकडे महाराष्ट्रांतील जैन-समाजांत लौकिक शिक्षणाचा जसा प्रसार होऊं लागला, तसा धार्मिक शिक्षणाचा आणि त्याबरोबर त्याला साधनीभूत धर्म-ग्रंथांचाहि प्रसार होणें आवश्यक दिसूं लागलें; ह्मणून हें पुस्तक जैनांतील शिकलेल्या लोकांना आणि विशेषतः शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना उपयोगी होईल, या हेतूनें ह्यांत निरनिराळ्या अनेक विषयांची माहिती संकलित करून तयार केलें आहे.

या पुस्तकांत त्रेसष्टशलाका पुरुष, आचार्य, कवि, सूरि, हिंदी जैनकवि, कर्नाटक जैनकवि, महाराष्ट्र जैनकवि, राजे वगैरे महापुरुषांची माहिती दिली असून त्यांचा कालनिर्णयहि यथाशक्ति दिला आहे. यांत श्रीवृषभतीर्थंकराच्या कालापासून श्रीमहावीर शक २४४० पर्यंतचा काल दिला आहे. याशिवाय 'जैनेतर विद्वानांचे जैन-धर्माबद्दलचे विचार,' 'आशिया, युरोप व आफ्रिका या तीन खंडांत झालेला जैन-धर्माचा प्रसार,' जैनांचे सण वगैरे किरकोळ विषयांची माहितीहि संग्रहित केली आहे.

या पुस्तकांत दिलेल्या कांहीं आचार्यांच्या कालाबद्दल अजून विसंवाद आहे. तरी त्यांचा कालनिर्णय सप्रमाण रीतीनें कोणीहि निश्चित केल्यास दुसऱ्या आवृत्तींत त्याची दुरुस्ती करण्यास ठीक पडेल.

या पुस्तकांत अलीकडच्या निरनिराळ्या विद्वानांनीं प्रसिद्ध केलेल्या संस्कृत, हिंदी, मराठी वगैरे अनेक ग्रंथांतील निरनिराळी

माहिती एकत्रित केली आहे. हें पुस्तक तयार करण्यास श्री. नाथूराम प्रेमी, संपादक जैनहितैषी ( मुंबई ) यांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांची विशेष मदत मिळाली, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.


या पुस्तकांत दिलेली महाराष्ट्र जैनकवींची माहिती श्री. तात्या नेमिनाथ पांगळ ( बार्शी ) यांनीं लिहून पाठविली आहे. ती जशीच्या तशीच येथें घेतली आहे. सदर माहिती पाठविल्याबद्दल मी त्यांचा अतिशय आभारी आहे.

हें पुस्तक लिहिण्यास श्री. भरमप्पा पदमप्पा पाटील, सेक्रेटरी श्रीचंद्रसागर जैन ग्रंथमाला होसूर–बेळगांव यांनीं विशेष प्रोत्साहन देऊन तें छापून प्रसिद्ध करण्याचे कामींहि विशेष मेहनत घेतली, याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे

हें पुस्तक पं. ब्रह्मचारी शीतलप्रसादजी, श्री. जीवराज गौतम, श्री. ता. ने. पांगळ, श्री. भ. प. पाटील, प्रो. ए. बी. लट्टे, श्री. वासुदेव शास्त्री वगैरे मंडळींनीं तपासून दिल्याबद्दल त्या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानून ही प्रस्तावना संपवितों.

कोल्हापूर,
ज्येष्ठ शु० ५ शके १८४०.
( विक्रमसंवत् १९७४ )

‘ अनंततनय. ’



श्री ऐलक चंद्रसागरस्वामी, सरगूर.

॥ श्रीजिनाय नमः ॥

## श्रीचंद्रसागर दिगंबर जैनग्रंथमाला.

# नियमावली.

श्रीयुत तोणीकडु वेंकट कृष्णगौडा ( मु० तोणीकडु-पो० कलपत्ता, ता० वायनाड, जिल्हा मलबार ) यांनीं " **श्रीभक्तामरस्तोत्र वृत्तिसारसमुच्चय** " नामक ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याकरितां श्रीचंद्रसागरस्वामी ( सरगूर ) यांचेकडे ५०० पांचशें रुपये दिले आहेत. त्यासंबधीं ट्रस्टी नेमून तिच्या स्वाधीन सदरहू ५०० रुपये देण्याची सदर स्वामींची इच्छा आहे; व सदरी ग्रंथ प्रसिद्ध होऊन राहिलेल्या रकमेंतून व सदरी ग्रंथाच्या प्रती विक्री होऊन आलेल्या रकमेंतून पुनः कोणत्या तरी जैनग्रंथांचें प्रकाशन ट्रस्टीच्या मर्जीनुरूप करावें; मात्र अशा प्रत्येक ग्रंथाच्या ५० पन्नास प्रती आपणास मिळाव्या असा त्यांचा अभिप्राय आहे. त्यास अनुसरून खालील ट्रस्टी नेमून तिच्यासंबंधीं नियम करण्यांत येत आहेत ते येणेंप्रमाणें:—

( १ ) सदरी कामासंबंधीं सर्व व्यवस्था करण्याकरितां खालील पांच गृहस्थांची ट्रस्टी नेमण्यांत येत आहे:—

१ श्री. कुबेरप्पा भरमप्पा अंकले, बेळगांव—चेअरमन.
२ ,, भरमप्पा पदमप्पा पाटील, होसूर—बेळगांव, सेक्रेटरी.
३ ,, आण्णप्पा फडेप्पा चौगुले, बेळगांव.
४ ,, बाळप्पा भुजप्पा मिर्जी, ,,
५ ,, काळप्पा आण्णाजी लेंगडे, शहापूर.

( २ ) सदरी रकमेंतून प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांच्या मालेस **‘ श्रीचंद्रसागर दिगंबर जैनग्रंथमाला ’** असें नांव असावें.

( ३ ) मालेचा पहिला ग्रंथ–श्रीचंद्रसागरस्वामी (सरगूर) यांनीं तयार केलेलें **‘ भक्तामरस्तोत्र वृत्तिसारसमुच्चय ’** हें पुस्तक प्रसिद्ध करावें. पुढें ट्रस्टींच्या मर्जीनुरूप कानडी अथवा आवश्यकतानुसार मराठी भाषेचे दिगंबर जैनग्रंथ प्रसिद्ध करावे. पण कानडी व मराठी ग्रंथप्रकाशनावर होणाऱ्या खर्चाचें मान अनुक्रमें $\frac{3}{4}$ व $\frac{1}{4}$ असें असावें.

( ४ ) सदरी रकमेंतून प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक ग्रंथाच्या ५० पन्नास प्रती मालेचे उत्पादक श्री. वेंकट कृष्णगौडा यांना अगर श्रीचंद्रसागरस्वामी यांजकडे ट्रस्टींनीं पोंचवाव्या. ’

( ५ ) सदरी ५०० पांचशें रुपये अथवा या मालेचा फंड ट्रस्टींच्या संमतीप्रमाणें कोणा योग्य गृहस्थाकडे अगर पोस्टल सेविंग बँकेमध्यें व्याजीं ठेव ठेवण्यांत यावा. ग्रंथप्रकाशनाकरितां आवश्यकतानुसार सदरी ठेवींतून थोडथोडे पैसे काढून घ्यावे.

( ६ ) ट्रस्टींपैकीं एक चेअरमन व एक सेक्रेटरी असे कामदार असावे.

( ७ ) ट्रस्टींचें कोरम ( ३ ) तीन गृहस्थांचें समजण्यांत यावें. समान मतें झाल्यास चेअरमनचीं दोन मतें मोजण्यांत यावीं.

( ८ ) ट्रस्टींच्या बहुमतानुरूप योग्य रीतीनें कामगिरी व्हावी.

( ९ ) या मालेचा हिशोब ट्रस्टींनीं योग्य रीतीनें ठेवून तो दरसाल प्रसिद्ध करावा.

( १० ) या रकमेवर अगर मालेच्या मिळकतीवर मूळ उत्पादकाचा, स्वामींचा अगर ट्रस्टींचा व्यक्तिशः कांहीं हक्क नाहीं. ही एक दिगंबर जैनसमाजविषयक धर्मादायाची बाब आहे असें समजण्यांत यावें.

( ११ ) ट्रस्टींचे ठराव सभा बोलवून प्रत्यक्ष रीतीनें मतें घेऊन अगर लेखी सूचना देऊन परोक्ष रीतीनें लेखी मतें घेऊन बहुमतानुसार करण्यांत यावेत.

( १२ ) ट्रस्टीमधील एकादा मेंबर मयत झाल्यास किंवा हें काम करण्यास नाकबूल अगर नालायख झाल्यास बाकीच्या मेंबरांनीं त्याचे जागेवर दुसऱ्या एका दिगंबर जैन गृहस्थाची नेमणूक करून घ्यावी.

( १३ ) या मालेस आणखी कोणी द्रव्याची मदत केल्यास ती दाखल करून घेण्यांत यावी. मात्र या मालेच्या नांवांत कोणत्याही कारणानें फेरफार होणार नाहीं.

( १४ ) मालेचे ग्रंथ प्रसिद्ध होतांच ट्रस्टींनीं त्यांच्या विक्रीची व्यवस्था करून विक्री होऊन आलेले पैसे या फंडांत जमा करावे व त्यांतून पुढेंही पुस्तकप्रकाशनाचें काम चालवावें.

( १५ ) या मालेच्या अंतर्व्यवस्थेसंबंधीं नवीन नियम करण्यास अगर सदरी नियमांत कारणपरत्वें फेरफार करण्यास ट्रस्टीस पूर्ण अधिकार आहे.

ता. १५-२-१९१४ इसवी.

---

☞ प्रस्तुत पुस्तक विक्रीस मिळण्याचीं ठिकाणें:—

१. भरमप्पा पदमप्पा पाटील, सेक्रेटरी श्रीचंद्रसागर जैन-ग्रंथमाला होसूर, पो० शहापूर—बेळगांव.

२. म्यानेजरः—श्रीमहावीर प्रेस, बेळगांव.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| उपाद्घात. | १ |
| **भाग १ ला.** | |
| णमोकार मंत्र. | २ |
| काल व त्याचे भेद | ३ |
| चोवीस तीर्थंकरांचीं नांवें. | ४ |
| चोवीस तीर्थंकरांचे वंश वगैरे. | १२ |
| **भाग २ रा.** | |
| ६३ शलाका पुरुषांचीं नांवें व त्यांची माहिती. | १६ |
| बारा चक्रवर्ती. | १६ |
| चक्रवर्तींचें ऐश्वर्य. | २४ |
| **भाग ३ रा.** | |
| नऊ नारायण व त्यांची माहिती. | २५ |
| नऊ प्रतिनारायण व त्यांची माहिती. | २९ |
| नऊ बलिभद्रांचीं नांवें व त्यांची माहिती. | ३३ |
| पुण्यपुरुषांचीं नांवें. | ३७ |
| **भाग ४ था.** | |
| श्रीवृषभ तीर्थंकरापासून महावीरापर्यंतचा काल. | ३९ |
| वीरनिर्वाणापासून सुमारें ७०० वर्षांपर्यंतचा काल. | ४१ |
| वीरनिर्वाण शक ५०० पासून १८०० पर्यंतचा काल. | ४२ |
| श्रीकुंदकुंदाचार्य वगैरे संस्कृत कवि. | ४३ |
| **भाग ५ वा.** | |
| वीरनिर्वाण संवत् १४०० पासून २४०० पर्यंतचा काल. | ५७ |
| कर्नाटक जैनकवि व त्यांची माहिती. | ५७ |

हिंदी भाषेंत ग्रंथ लिहिणारे कांहीं जैनकवि. ... ... ... ६२
महाराष्ट्र जैनकवि व त्यांची कांहीं माहिती. ... ... ... ६५
महावीरानंतर झालेले कांहीं जैनधर्मी राजे वगैरे. ... ... ७६
चंद्रगुप्तास पडलेलीं सोळा स्वप्नें आणि त्यांची फलश्रुति. ... ... ८५

भाग ६ वा.

शास्त्रीय जैनग्रंथ. ... ... ... ... ... ८९
जैनांचीं मुख्य तीर्थक्षेत्रे ... ... ... ... ९३
जैनांच्या पर्वतिथी ( सण ). ... ... ... ... ९५
चोवीस तीर्थकरांच्या पंचकल्याणिकांच्या पर्वतिथी. ... ... ९७

भाग ७ वा.

जैनधर्माचें महत्व. ... ... ... ... ... ९९
'जैनधर्म' या विषयावरील जैनेतर विद्वानांचे अभिप्राय. ... ... १०२
हिंदुस्थानच्या बाहेर अन्य देशांत झालेला जैनधर्माचा प्रसार. ... ११३

---

# शुद्धिपत्रक.

| पान. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १२ | १० | गोर्गजोश्व | गोर्गजोऽश्वः |
| १२ | ११ | कोल भल्लुकौ | कोलभल्लुकौ |
| १२ | १२ | मेष मत्स्यौ | मेषमत्स्यौ |
| १८ | ११ | मोक्षास गेले यापुढें [ त्यांच्या देहाची उंची ५०० धनुष्य व आयुष्य ८० लाखपूर्व वर्षांचें होतें. ] असें वाचावें. | |

( भरत )

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | १९ | मोक्षास गेले यापुढें [ त्यांच्या देहाची उंची ४५० धनुष्य व आयुष्य ७० लाखपूर्व वर्षांचें होतें. ] असें वाचावें. | |
| | | | ( समर ) |
| २६ | १४ | स्वयभु | स्वयंभु |
| ३४ | १२ | बलदेव | बलिभद्र |
| ३७ | ९ | गेले. | गेले; |
| ३७ | १८ | भीमवली | भीमबली |
| ४२ | २ | द्रमसेन | द्रुमसेन |
| ४२ | १३ | (म. सं. ८७०) | (म. सं. ९९०) |
| ४३ | १३ | अध्यात्मिक | आध्यात्मिक |
| ४३ | १७ | अध्यात्मशास्त्रांत | अध्यात्मशास्त्रांत |
| ४५ | २६ | प्रायचित्त | प्रायश्चित्त |
| ४६ | १४ | ४ थ्या | ५ व्या |
| ४८ | ६ | महप्ताचा | महत्वाचा |
| ५३ | १९ | अध्यात्मिक | आध्यात्मिक |
| ५५ | ९ | पश्चाताप | पश्चात्ताप |
| ६३ | ६ | (श्वेबतांर मतखंडन) | (श्वेतांबर मतखंडन) |
| ७० | १७ | " देवा, | " देवा ! मी |
| ७३ | १ | मिध्यात्व | मिथ्यात्व |
| ७४ | ७ | शास्त्र्यापासून | शास्त्रापासून |
| ९१ | २४ | उत्पाति | उत्पत्ति |

ॐ

नमः सिद्धेभ्यः

# प्रथमानुयोगशास्त्र

अथवा

# जैन-लोकांचा इतिहास.

प्रथमानुयोगमर्थाख्यानं चरितं पुराणमपि पुण्यम्।
बोधिसमाधिनिधानं बोधति बोधः समीचीनः ॥

—श्रीसमन्तभद्राचार्य.

## उपोद्घात.

जैन-धर्मांत शास्त्राचे चार भाग कल्पिले आहेत. ते येणेंप्रमाणें:—
१ प्रथमानुयोग, २ करणानुयोग. ३ चरणानुयोग व ४ द्रव्यानुयोग.

ज्यामध्यें थोर पुरुषांची चरित्रें, चतुःपुरुषार्थ इत्यादिकांचें वर्णन आहे तें प्रथमानुयोगशास्त्र.

ज्यांत अधः, मध्य आणि ऊर्ध्व या लोकांचें वर्णन आहे तें **करणानुयोगशास्त्र.**

ज्यामध्यें गृहस्थांचें आणि मुनींचें चारित्र सांगितलें आहे तें **चरणानुयोगशास्त्र.**

ज्यामध्यें जीव, अजीव वगैरे सात पदार्थांचें वर्णन आहे, अर्थात् तत्वज्ञानाचें वर्णन ज्यांत आहे तें **द्रव्यानुयोगशास्त्र.**

यांपैकीं प्रथमानुयोगांतील ६३ शलाका पुरुषांची माहिती व जरूर असलेल्या दुसऱ्या विषयांचीहि माहिती ह्या पुस्तकांत दिली आहे.

---

# भाग १ ला.

## णमोकार मंत्र.

**ॐ णमो अरिहंताणं, णमो सिद्धाणं, णमो आयरियाणं, णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्वसाहूणम् ।**

**अर्थः**—अर्हतांस नमस्कार, सिद्धांस नमस्कार, आचार्यांस नमस्कार, उपाध्यायांस नमस्कार, लोकांतील सर्व साधूंस नमस्कार.

## पांच अक्षरी मंत्र.

**अ, सि, आ, उ, सा.** अ=अरिहंत, सि=सिद्ध, आ=आचार्य, उ-उपाध्याय, सा=साधु.

## एकाक्षरी मंत्र.

ॐ=अरिहंत या शब्दांतील पहिलें अ हें अक्षर, अशरीर (सिद्ध) या शब्दांतील अ हें अक्षर, आयरिय (आचार्य) या शब्दांतील आ हें अक्षर, उवज्झाय (उपाध्याय) या शब्दांतील उ हें अक्षर, मुणिणो (साधु) या शब्दांतील म् हें व्यंजन. एकूण:— अ+अ+आ+उ+म्=संस्कृत भाषेच्या नियमानें ओम् हा एकाक्षरी मंत्र झाला. हा अर्थ लक्षांत ठेवून '**ॐ नमः**' असें ह्मटल्यानें पंचपरमेष्ठीस नमस्कार होतो.

या **णमोकारमंत्राचें माहात्म्य** आचार्यांनीं पुढें दिल्याप्रमाणें वर्णिलें आहे.

**एसो पंचणमोयारो सव्व पावप्प णासणो ।**
**मंगलाणं च सव्वेसिं पढमं होइ मंगलम् ॥**

**भावार्थः**—या णमोकार मंत्राचें ज्ञानपूर्वक स्मरण केल्यानें सर्व पाप नाहींसें होतें; कसलेंहि संकट असलें तरी त्याचें निवारण होतें. सारांश हा मंत्र सर्व कार्यांत मंगलदायक आहे.

या मंत्राच्या प्रभावानें अंजनचोर, इंद्रदत्त, श्रीपाल, कपिल-मुनि, सगराचे साठ हजार पुत्र, विद्युत्प्रभ वगैरे जीवांना सद्गति प्राप्त झाली आहे.

हा पंचनमस्कार मंत्र जैन कुलांत उत्पन्न झालेल्या प्रत्येक श्रावकानें पाठ (मुखोद्गत) केलाच पाहिजे.

## काल व त्याचे भेद.

काल हा अनादि आहे; तथापि व्यवहाराकरितां भरत व ऐरावत क्षेत्रांत त्याचे मुख्य दोन भाग कल्पिले आहेत. **१ अवसर्पिणी व २ उत्सर्पिणी.**

अवसर्पिणी कालांत भरत आणि ऐरावत क्षेत्रांतील प्राण्यांचें आयुष्य, शरीराची उंची, अनुभव इत्यादिकांचा ऱ्हास होत जातो. आणि उत्सर्पिणी कालांत प्राण्यांचें आयुष्य, शरीराची उंची, अनुभव इत्यादिकांची वृद्धि होते.

अवसर्पिणी कालाचे सहा भेद आहेत. ते येणेंप्रमाणें:—

१. **सुषम-सुषमा**—चार सागर कोटाकोटी.

२. **सुषमा**—तीन सागर कोटाकोटी.

३. **सुषम-दुःषमा**—दोन सागर कोटाकोटी.

४. **दुःषम-सुषमा**—४२ हजार वर्षें कमी, एक सागर कोटाकोटी.

५. **दुःषमा**—२१ हजार वर्षें.

६. **अतिदुःषमा**— ,,

एकूण अवसर्पिणी काल दहा सागर कोटाकोटी प्रमाणाचा आहे. अवसर्पिणी हा काळ हल्लीं चालू आहे. याच्या चौथ्या भागांत ह्मणजे दुःषम-सुषमा कालांत २४ तीर्थंकर होऊन गेले. अवसर्पिणी-कालाच्या ५ व्या भागाचे ह्मणजे दुःषमा ( चालू ) कालाचें प्रमाण २१००० वर्षांचें आहे.

याचप्रमाणें उत्सर्पिणी काल याच्या उलट क्रमानें जाणावा.

पूर्वी गेलेल्या व पुढें येणाऱ्या प्रत्येक अवसर्पिणीच्या आणि प्रत्येक उत्सर्पिणीच्या **दुःषम-सुषमा** नांवाच्या कालविभागांत २४ तीर्थंकर होऊन जातात. त्यांपैकीं वर्तमानकालीं होऊन गेलेल्या,

## चोवीस तीर्थंकरांचीं नांवें.

**१ ऋषभ, २ अजित, ३ शंभव, ४ अभिनंदन, ५ सुमति, ६ पद्मप्रभ, ७ सुपार्श्व, ८ चंद्रप्रभ, ९ पुष्पदंत, १० शीतल,**

११ श्रेयान्, १२ वासुपूज्य, १३ विमल, १४ अनंत, १५ धर्म, १६ शांति, १७ कुंथु, १८ अर, १९ मल्लि, २० मुनिसुव्रत, २१ नमि, २२ नेमि, २३ पार्श्व, २४ वर्द्धमान (महावीर).

## १. ऋषभ.

तीर्थंकरपदवी प्राप्त होण्याच्या पूर्वींचा यांचा जन्म सर्वार्थसिद्धि, जन्मनगरी अयोध्या, पिता नाभिराज, माता मरुदेवी, देहाची उंची ५०० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ८४ लाखपूर्व, दीक्षास्थान वडाचें झाड (या झाडाखालीं दीक्षा घेतली), गणधर ८४, आसन पर्यंकासन, निर्वाणस्थान कैलासपर्वत, हे सुषम-दुःषमा नांवाच्या तिसऱ्या कालांत जन्म घेऊन त्याच कालांत मोक्षास गेले. त्यावेळीं तीन वर्षें साडेआठ महिने झाल्यावर चौथ्या कालास प्रारंभ झाला. त्यांच्यानंतर ५० लाख कोटिसागर वर्षें गेल्यावर अजितनाथ झाले.

## २. अजित.

तीर्थंकर होण्यापूर्वींचा जन्म वैजयन्त नांवाचें दुसरें अनुत्तर विमान, जन्मनगरी अयोध्या, पिता जितशत्रु, माता विजयसेनादेवी, देहाची उंची ४५० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ७२ लाख पूर्व, दीक्षास्थान सप्तच्छदवृक्ष (सातवणीचें झाड), निर्वाण आसन खड्गासन (कायोत्सर्ग), निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ३० लाख कोटिसागर वर्षांनीं शंभवनाथ झाले.

## ३. शंभव.

तीर्थंकर होण्याच्या पूर्वींचा जन्म ग्रैवेयक विमान, जन्मनगरी श्रावस्ती, पिता जितारि, माता सुषेणादेवी, देहाची उंची ४०० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ६० लाख पूर्व, दीक्षा शालवृक्ष,

गणधर १०५, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेद-शिखर. त्यांच्यानंतर १० लाख कोटिसागर वर्षांनीं अभिनंदन झाले.

## ४. अभिनंदन.

तीर्थंकर होण्याच्या पूर्वींचा जन्म वैजयन्त नांवाचें दुसरें अनुत्तर विमान, जन्मनगरी अयोध्या, पिता संवर, माता सिद्धार्थादेवी, देहाची उंची ३५० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ५० लाख-पूर्व, दीक्षा सरलवृक्ष ( टेंभुरणीचें झाड ), गणधर १०३, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाण स्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९ लाख कोटिसागर वर्षांनीं सुमतिनाथ झाले.

## ५. सुमति.

तीर्थंकर होण्यापूर्वींचा जन्म ऊर्ध्व ग्रैवेयक, जन्मनगरी अयोध्या, पिता मेघप्रभ, माता सुमंगलादेवी ( मंगलावती ), देहाची उंची ३०० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ४० लाखपूर्व, दीक्षा प्रियंगु-वृक्ष ( वाघांटीचें झाड ), गणधर ११६, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९० हजार कोटि सागर-वर्षांनीं पद्मप्रभ झाले.

## ६. पद्मप्रभ.

तीर्थंकर होण्यापूर्वींचा जन्म वैजयन्त नांवाचें दुसरें अनुत्तर विमान, जन्मनगरी कौशांबी, पिता धारण, माता सुसीमादेवी, देहाची उंची २५० धनुष्य, रंग कमलासारखा आरक्त, आयुष्य ३० लाख-पूर्व, दीक्षा प्रियंगुवृक्ष, गणधर १११, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९ हजार कोटिसागर वर्षांनीं सुपार्श्वनाथ झाले.

## ७. सुपार्श्वनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म मध्य ग्रैवेयक, जन्मनगरी काशी, पिता सुप्रतिष्ठ, माता पृथ्वीदेवी, देहाची उंची २०० धनुष्य, रंग प्रियंगुसारखा हिरवा, आयुष्य २० लाखपूर्व, दीक्षा शिरीषवृक्ष ( सिरसाचें झाड ), गणधर ९५, आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९०० कोटी सागरवर्षांनीं चंद्रप्रभ झाले.

## ८. चंद्रप्रभ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म वैजयन्त नांवाचें दुसरें अनुत्तर विमान, जन्मनगरी चंद्रपुरी, पिता महासेन, माता लक्ष्मणादेवी, देहाची उंची १५० धनुष्य, रंग पांढरा, आयुष्य १० लाखपूर्व, दीक्षा नागवृक्ष ( नागवेली ), गणधर ९३, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९० कोटिसागर वर्षांनीं पुष्पदंत झाले.

## ९. पुष्पदंत.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म अपराजित नांवाचें चौथें अनुत्तर विमान, जन्मनगरी काकंदी, पिता सुग्रीव, माता जयरमादेवी, देहाची उंची १०० धनुष्य, रंग पांढरा, आयुष्य दोन लाखपूर्व, दीक्षा शालवृक्ष, गणधर ८८, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९ कोटी सागर वर्षांनीं शीतलनाथ झाले.

## १०. शीतल.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म आरण नांवाचा पंधरावा स्वर्ग, जन्मनगरी भद्रकापुरी, पिता दृढरथ, माता सुनंदादेवी, देहाची उंची

९० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य एक लाखपूर्व, दीक्षा प्लक्षवृक्ष ( पिंपरीचें झाड ), गणधर ८१, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर १०० सागर वर्षे कमी एक कोटी सागर वर्षांनीं श्रेयांसनाथ झाले.

## ११. श्रेयान्.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म पुष्पोत्तर विमान, जन्मनगरी सिंहपुरी, पिता विष्णु, माता विष्णुश्री, देहाची उंची ८० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ८४ लाख वर्षे, दीक्षा तिंदुकवृक्ष ( टेंभुरणीचें झाड ), गणधर ७७, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ५४ सागर वर्षांनीं वासुपूज्य झाले.

## १२. वासुपूज्य.

तीर्थंकरहोण्यापूर्वीचा जन्म कापिष्ट नांवाचा आठवा स्वर्ग, जन्मनगरी चंपापुरी, पिता वासु, माता विजयादेवी, देहाची उंची ७० धनुष्य, रंग आरक्त, आयुष्य ७२ लाख वर्षे, दीक्षा पाटलवृक्ष ( पाडळीचें झाड ), गणधर ६६, निर्वाण आसन पल्यंकासन, निर्वाणस्थान चंपापुरीच्या वनामध्यें. त्यांच्यानंतर ३० सागर वर्षांनीं विमलनाथ झाले.

## १३. विमल.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म शुक्र नांवाचा नववा स्वर्ग, जन्मनगरी कपिला, पिता कृतवर्मा, माता सुरम्या ( जयभामादेवी ), देहाची उंची ६० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ६० लाख वर्षे, दीक्षा जंबुवृक्ष ( जांभळीचें झाड ), गणधर ५५, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ९ सागर वर्षांनीं अनंतनाथ झाले.

## १४. अनंतनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म सहस्त्रार नांवाचा बारावा स्वर्ग, जन्मनगरी अयोध्या, पिता सिंहसेन, माता सर्वयशा (जयशामादेवी), देहाची उंची ५० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ३० लाख वर्षे, दीक्षा पिंपळीचें झाड, गणधर ५०, आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर चार सागर वर्षांनीं धर्मनाथ झाले.

## १५. धर्मनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म पुष्पोत्तर विमान, जन्मनगरी रत्नपुरी, पिता भानु, माता सुप्रभादेवी, देहाची उंची ४५ धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य १० लाख वर्षे. दीक्षा दधिपर्णवृक्ष (कवठ्याचें झाड), गणधर ४३, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर पाउणपल्य कमी तीन सागरवर्षांनीं शांतिनाथ झाले.

## १६. शांति.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म पुष्पोत्तर विमान, जन्मनगरी हस्तिनापूर, पिता विश्वसेन, माता ऐरादेवी (अजिताराणी), देहाची उंची ४० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य १ लाख वर्षे, दीक्षा नंदीवृक्ष (नांदरुखीचें झाड), गणधर ३६, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर अर्ध पल्य वर्षांनीं कुंथुनाथ झाले.

## १७. कुंथु.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म पुष्पोत्तर विमान, जन्मनगरी हस्तिनापूर, पिता सूर्य, माता श्रीकांतादेवी, देहाची उंची ३५ धनुष्य, रंग सुवर्णा-

सारखा, आयुष्य ९५ हजार वर्षे, दीक्षा तिलकवृक्ष, गणधर ३५, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ६ हजार कोटी वर्षे कमी पाव पल्य वर्षे गेल्यावर अरनाथ झाले.

## १८. अरनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म सर्वार्थसिद्धि, जन्मनगरी हस्तिनापूर. पिता सुदर्शन, माता मित्रसेनादेवी, देहाची उंची ३० धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ८४ हजार वर्षे, दीक्षा आंब्याचें झाड, गणधर ३०, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ६५ लाख ८४ हजार वर्षे कमी एक हजार कोटी वर्षे गेल्यावर मल्लिनाथ झाले.

## १९. मल्लिनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म विजय नांवाचें पहिलें अनुत्तर विमान, जन्मनगरी मिथिलापुरी, पिता कुंभ, माता प्रजावती, देहाची उंची २५ धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ५५ हजार वर्षे, दीक्षा अशोकवृक्ष, गणधर २८, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ५४ लाख वर्षांनीं श्रीमुनिसुव्रत झाले.

## २०. मुनिसुव्रत.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म अपराजित नांवाचें चौथें अनुत्तर विमान, जन्मनगरी कुशाग्रनगर ( राजगृही ), पिता सुमित्र, माता पद्मावती ( सोमादेवी ), देहाची उंची २० धनुष्यें, रंग अंजनगिरीसारखा काळा, आयुष्य ३० हजार वर्षे, दीक्षा चाफ्याचें झाड, गणधर १८, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर ६ लाख वर्षांनीं नमिनाथ झाले.

## २१. नमिनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म प्राणत नांवाचा चवदावा स्वर्ग, जन्मनगरी मिथिलापुरी, पिता विजय, माता वप्रादेवी, देहाची उंची १५ धनुष्य, रंग सुवर्णासारखा, आयुष्य १० हजार वर्षें, दीक्षा बेलफळाचें झाड, गणधर १७, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्याच्यानंतर पांच लाख वर्षांनीं नेमिनाथ झाले.

## २२. नेमिनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म वैजयन्त नांवाचें दुसरें अनुत्तर विमान, जन्मनगरी शौरीपूर ( द्वारका ), पिता समुद्रविजय, माता शिवादेवी, देहाची उंची १० धनुष्य, रंग मयूरकंठासारखा, आयुष्य एक हजार वर्षें, दीक्षा मेषशृंगाचें झाड, गणधर ११, निर्वाण आसन पल्यंकासन, निर्वाणस्थान गिरनारपर्वत. त्यांच्यानंतर ८३७५० वर्षांनीं पार्श्वनाथ झाले.

## २३. पार्श्वनाथ.

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म आनत नांवाचा तेरावा स्वर्ग, जन्मनगरी काशी, पिता अश्वसेन, माता वामादेवी, देहाची उंची ९ हात, रंग हिरवा, आयुष्य १०० वर्षें, दीक्षा धवलवृक्ष (धावड्याचें झाड ), गणधर १०, निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान सम्मेदशिखर. त्यांच्यानंतर २५० वर्षांनीं वर्द्धमान झाले.

## २४. वर्द्धमान (महावीर).

तीर्थंकर होण्यापूर्वीचा जन्म पुष्पोत्तर विमान, जन्मनगरी कुंडलपूर, पिता सिद्धार्थ, माता प्रियकारिणी, देहाची उंची ७ हात, रंग सुवर्णासारखा, आयुष्य ७२ वर्षें, दीक्षा शालवृक्ष, गणधर ११,

निर्वाण आसन खड्गासन, निर्वाणस्थान पावापुरी. श्रीमहावीरस्वामी मोक्षाला गेले त्यावेळीं चौथा काळ तीन वर्षें साडेआठ महिने राहिला होता.

## चोवीस तीर्थंकरांचे वंश.

सुपार्श्व आणि पार्श्वनाथ यांचा **उग्रवंश.** धर्म, शांति, कुंथु, यांचा **कुरुवंश.** वर्द्धमान यांचा **नाथवंश.** आणि राहिलेल्या १५ तीर्थंकरांचा **इक्ष्वाकुवंश.**

[ जैन-बाल गुटिका. ]

---

## २४ तीर्थंकरांचीं लांछनें.

**गोगजोश्व कपिः कोकः कमलं स्वस्तिकः शशी ।**
**मकरः श्रीद्रुमो गंडो महिषः कोल भल्लुकौ ॥ १ ॥**
**वज्रं मृगो मेष मत्स्यौ कलशः कूर्म उत्पलम् ।**
**शंखो नागाधिपः सिंहो लांछनान्यर्हतां क्रमात् ॥ २ ॥**

[ श्रीनेमिचंद्रकृत प्रतिष्ठातिलक. ]

**अर्थः**—बैल, हत्ती, घोडा, वानर, चक्रवाक, कमल, स्वस्तिक, चंद्र, सुसर, कल्पवृक्ष, गेंडा, रेडा, डुक्कर, आस्वल, वज्र, हरिण, बकरा, मासा, कलश, कासव, नीलकमल, शंख, सर्प आणि सिंह. अशीं क्रमानें चोवीस तीर्थंकरांचीं चोवीस लांछनें आहेत. *

---

* **टीपः**—सध्यां ज्या प्रतिमा विराजमान आहेत त्यांच्या आसनाच्या खालील मोकळ्या जागेवर जेथें प्रतिष्ठाकार आपलीं नांवें खोदवितात, त्याच्या मध्यभागीं वरील चिन्हांपैकीं जें चिन्ह असेल त्यावरून अमुक तीर्थंकराची ती प्रतिमा आहे असा बोध करून घेतां येतो.

## यक्षांचीं नांवें.

१ गोमुख, २ महायक्ष, ३ त्रिमुख, ४ यक्षेश्वर, ५ तुंबुरु, ६ कुसुमावर, ७ नंदि, ८ विजय, ९ अजित, १० ब्रह्मेश्वर, ११ कुमार, १२ षण्मुख, १३ पाताल, १४ किन्नर, १५ किंपुरुष, १६ गरुड, १७ गंधर्व, १८ महेंद्र, १९ कुबेर, २० वरुण, २१ विद्युत्प्रभ, २२ सर्वाण्ह, २३ धरणेंद्र, २४ मातंग.

अशा प्रकारें हे चोवीस तीर्थंकरांचे चोवीस यक्ष होत.

## यक्षिणींचीं नांवें.

१ चक्रेश्वरी, २ रोहिणी, ३ प्रज्ञप्ति, ४ वज्रशृंखला, ५ पुरुषदत्ती, ६ मनोवेगा, ७ काली, ८ ज्वालामालिनी, ९ महाकाली, १० मानवी, ११ गौरी, १२ गांधारी, १३ वैरोटी, १४ अनंतमती, १५ मानसी, १६ महामानसी, १७ जया, १८ विजया, १९ अपराजिता, २० बहुरूपिणी, २१ चामुंडी, २२ कुसुमांडी, २३ पद्मावती, २४ सिद्धायनी.

ह्या चोवीस तीर्थंकरांच्या चोवीस यक्षिणी होत.

## चोवीस तीर्थंकरांसंबंधीं आवश्यक माहिती.

हे सर्व तीर्थंकर क्षत्रिय कुलांत उत्पन्न झालेले असतात. यांपैकीं वासुपूज्य, मल्लि, नेमि, पार्श्व आणि वर्द्धमान हे गृहस्थधर्म न स्वीकारतां बालब्रह्मचारी राहून तपश्चर्या करून मोक्षास गेले आहेत. चोवीस तीर्थंकरांपैकीं

पहिले वृषभतीर्थंकर हे चौदावे मनु नाभिराय यांचे चिरंजीव होत. जैनधर्मांत विशेष महत्वाची व्यक्ति काय ती तीर्थंकरच होय. तीर्थंकर ह्मणजे धर्मतीर्थाचे प्रवर्तक. त्यांना मति, श्रुति, अवधि, मनःपर्यय आणि केवलज्ञान अशीं पांच ज्ञानें होतात. यांपैकी पहिलीं तीन जन्मतःच असतात. बाकीचीं दोन क्रमानें होत जातात. क्षायिक केवलज्ञान झाल्यानंतर बाकीचीं चार (क्षायोपशमिक) ज्ञानें त्यांना राहत नाहींत. तीर्थंकर गर्भांत आल्यापासून मोक्षास जाईपर्यंत त्यांचे पांच प्रकारचे उत्सव होत असतात. त्यांस पंचकल्याणिक ह्मणतात. तीर्थंकरांचा मातेच्या गर्भांत अवतार होण्याच्या अगोदर आणि अवतार झाल्यावर स्वर्गांतील इंद्राच्या आज्ञेनें जो उत्सव होत असतो त्यास **गर्भकल्याणिक** असें ह्मणतात. आपल्या देशांत एखाद्या राजाचा मुलगा जन्मास आल्याबरोबर लोक गुढ्या वगैरे उभारून त्याचा उत्सव करितात, त्याचप्रमाणें तीर्थंकर जन्मास आल्याबरोबर स्वर्गांतील इंद्र तीर्थंकरास मेरुपर्वतावर नेऊन अभिषेक करितात त्या उत्सवास **जन्मकल्याणिक** असें ह्मणतात. तीर्थंकर ज्यावेळीं दीक्षाग्रहण करतात, त्यावेळीं जो एक उत्सव होतो त्यास **दीक्षाकल्याणिक** असें ह्मणतात. तीर्थंकरास केवलज्ञान झाल्यानंतर जो उत्सव होतो, त्यास **केवलज्ञानकल्याणक** असें ह्मणतात. तीर्थंकर मोक्षास गेल्यानंतर जो उत्सव होत असतो, त्यास मोक्षकल्याणिक किंवा **निर्वाणकल्याणक** असें ह्मणतात. याप्रमाणें हीं कल्याणिकें पांच आहेत.

तीर्थंकरास केवलज्ञान झाल्यानंतर इंद्राच्या आज्ञेनें कुबेर वगैरे देव येऊन समवशरणाची ( दिव्यसभामंडपाची ) रचना करतात. तेथें मध्यसिंहासनावर विराजमान होऊन तीर्थंकर सर्व भव्य लोकांना उपदेश देतात. तीर्थंकरांच्या सभोंवतीं बारा सभा असून त्यांत १२ प्रकारचे सभासद असतात. त्यांचीं नांवें:—१ गणधर

आणि मुनी, २ कल्पवासी देवी, ३ आर्यिका व स्त्रिया, ४ भवन-वासी देवी, ५ व्यंतरवासी देवी, ६ ज्योतिषवासी देवी, ७ इंद्रासह कल्पवासी देव, ८ इंद्रासह भवनवासी देव, ९ इंद्रासह व्यंतरवासी देव, ११ मनुष्य, १२ तिर्यंच=पशुपक्षी.

आपल्या महाराष्ट्रांतील प्रत्येक जिनमंदिरांत केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर शुक्लध्याननिमग्न अशा तीर्थंकरांच्या मूर्ती **'स एव देवो जिनबिंब एषः'** अशा भावनेनें स्थापन केलेल्या असतात. पार्श्वनाथ, अनंतनाथ, वृषभनाथ, चंद्रप्रभ, महावीर यांच्या प्रतिमा जैनमंदिरांतून विशेष आढळतात. बाहुबली स्वामींच्या प्रतिमाहि कोठें कोठें मंदिरांत असतात. याचें कारण असें कीं, पहिल्या तीर्थंकराचे चिरंजीव भरत आणि बाहुबली. त्यांपैकीं बाहुबली हे उग्र तपश्चर्या करून तिसऱ्या कालाच्या अखेर आपल्या पित्याच्या अगोदर मोक्षाला गेले आहेत. बाहुबली हे प्रथम—कामदेव असून त्यांनीं एक वर्षपर्यंत पायाच्या अंगुष्ठावरच कायोत्सर्गानें राहून उग्र-तपश्चर्या केली असल्यानें त्यांच्या मूर्तीचीहि स्थापना करण्याची वहि-वाट आहे. आपल्या महाराष्ट्रांतील मंदिरांत तीर्थंकर, बाहुबली या शिवाय पंचपरमेष्ठी, नवदेवता, नंदीश्वर वगैरे बिंबेंहि असतात. अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय व सर्वसाधु मिळून पंचपरमेष्ठी, जिनधर्म, जिनागम, जिनचैत्य (जिनबिंब) आणि जिनचैत्यालय मिळून या नवदेवता. याशिवाय सरस्वती, पद्मावती, ज्वालामालिनी, सर्वाण्ह-यक्ष, चक्रेश्वरी, ब्रह्मदेव वगैरे हे जिनभक्त असल्यानें त्यांच्याहि मूर्ती मंदिरांतून कोठें कोठें ठेविलेल्या आढळतात.

———

# भाग २ रा.

## ६३ शलाका पुरुषांचीं नांवें व त्यांची माहिती.

चतुर्थ कालाचा शेवट होऊन प्रस्तुत २४४३ वर्षे झालीं. चतुर्थ कालाच्या अखेर महावीरस्वामी मोक्षास गेले आहेत. हल्लीं जैनांत वीरनिर्वाण शक चालू आहे. तो वर दिलेला शक समजावा. प्रथमानुयोगशास्त्र हें ऐतिहासिक माहिती करून देणारें असल्यानें, प्रथमानुयोगांत ६३ शलाका ( अर्थात् महान् पुरुष ह्मणजे तद्भवीं किंवा पुढें कधींतरी नियमानें मुक्त होणार जीव ) पुरुषांचें वर्णन येऊन गेलें आहे. त्यांची माहिती सर्वांस असणें जरूर आहे.

**२४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ नारायण, ९ प्रति-नारायण** आणि **९ बलिभद्र** मिळून हे ६३ शलाका पुरुष. यांपैकीं २४ तीर्थंकरांचीं नांवें व त्यांची माहिती पहिल्या भागांत आलेली आहे.

चतुर्थ कालाच्या आरंभापासून अखेरपर्यंत हे ६३ शलाका पुरुष होऊन गेले.

## १२ चक्रवर्ती.

१ भरत, २ सगर, ३ मघवा, ४ सनत्कुमार, ५ शांतिनाथ, ६ कुंथुनाथ, ७ अरनाथ, ८ सुभौम, ९ पद्मनाभ, १० हरिषेण, ११ जयसेन, १२ ब्रह्मदत्त.

# १. भरत ( चक्रवर्ती ).

भगवान् वृषभतीर्थंकरांचे ज्येष्ठ पुत्र महाराज भरत हे चक्रवर्ती होते. महाराज भरत यांचा जन्म इक्ष्वाकु कुळांत चैत्र कृष्ण ९ दिवशीं उत्तराषाढा नक्षत्रीं झाला. भरत हे पहिले चक्रवर्ती असून ६ खंडांचे अधिपति होते. ह्मणून या आर्यावर्ताला भरतवर्ष असें ह्मणतात. भगवान् वृषभदेवांनीं स्वत: भरताला सर्व विद्या शिकविल्या होत्या. भरतराजा विशेषेंकरून नीतिशास्त्र चांगल्या प्रकारें जाणणारा होता. भरताला राज्य देऊन ज्या वेळीं वृषभ तीर्थंकरांनीं दीक्षा घेतली, त्या वेळीं त्यानें त्यांची अष्टविध पूजा केली. भरत राज्यारूढ झाल्यावर त्याला एके दिवशीं, त्याच्या परिचारकांकडून "वृषभदेवास केवलज्ञान झालें," "शस्त्रशाळेंत चक्ररत्न उत्पन्न झालें" आणि "महाराणीला पुत्र झाला" असे तीन आनंदकारक समाचार एकदम कळले! ते ऐकून भरत राजानें, धार्मिक कार्य अगोदर करावें या हेतूनें प्रथम वृषभतीर्थंकराचा केवलज्ञानोत्सव केला. नंतर शस्त्रशाळेंत जाऊन चक्ररत्नाची पूजा केली. शेवटीं पुत्राचा जन्मोत्सव केला. भरतराजानें पुष्कळ देशांतील राजेलोकांस जिंकून मोठा दिग्विजय संपादन केला. दिग्विजय करून परत येतांना कैलासपर्वतावर जाऊन वृषभतीर्थंकराची पूजा करून त्यानें त्यांच्याकडून धर्मोपदेश ऐकिला. भरतराजानें, अयोध्या नगरींत प्रवेश करण्याच्या अगोदर आपल्या हुकूम आपल्या धाकट्या बंधूस—बाहुबलीस मानण्याची आज्ञा केली; परंतु ती त्यानें कबूल केली नाहीं. कारण वडिलांनीं विभागून दिलेल्या क्षेत्रांतील स्वामित्वावर दुसऱ्याचें मत मानण्याचें कारण नाहीं, असें त्यास वाटलें. पण हें ह्मणणें भरतचक्रवर्तीस पटलें नाहीं. ह्मणून त्यानें आपल्या त्या बंधूबरोबर दृष्टियुद्ध, जलयुद्ध व मल्लयुद्ध अशा रीतीनें तीन प्रकारचें

युद्ध केलें. त्यांत भरतराजा हरला. पण त्यावेळीं बाहुबलीस वैराग्य होऊन त्यानें जिनदीक्षा घेतली. त्यामुळें सर्व राज्य भरतास मिळालें. भरतचक्रवर्तीचें शरीर समचतुरस्रसंस्थान (शरीराचे सर्व अवयव अत्यंत प्रमाणांत सुंदर असणें) असें होतें. भरताच्या शरीरावर चौसष्ट शुभ लक्षणें होतीं. त्याच्या पट्टराणीचें नांव **सुभद्रा** असें होतें. त्यानें दान·देण्यासाठीं व्रती श्रावकांतून परीक्षा करून **ब्राह्मण· वर्ग** स्थापन केला. भरतराजानें कैलासपर्वतावर भूत, भविष्य व वर्तमानकाळीन चोवीस तीर्थकरांचीं ७२ जिनमंदिरें बांधविलीं. पुष्कळ वर्षें राज्य करून शेवटीं जिनदीक्षा घेतली. दीक्षा घेतल्यानंतर अंतर्मुहूर्तांत त्यांना केवलज्ञान प्राप्त होऊन त्याच भवांत ते मोक्षास गेले.

## २. सगर (चक्रवर्ती).

भगवान् अजितनाथ तीर्थंकरांच्या वेळीं सगरचक्रवर्ती होऊन गेले. त्यांचा इक्ष्वाकु कुलांत जन्म झाला होता. त्यांच्या पित्याचें नांव समुद्रविजय असें होतें. चक्ररत्न उत्पन्न झाल्यानंतर त्यांनीं भरत-राजाप्रमाणें दिग्विजय केला. सगरचक्रवर्तीला साठ हजार पुत्र होते. एकें दिवशीं चतुर्मुख नांवाच्या मुनीला केवलज्ञान झालें, ही बातमी कळल्यावर सगर चक्रवर्ती, केवलज्ञानाचा उत्सव करण्यास, ज्या ठिकाणीं मुनि होते त्या ठिकाणीं गेले. कर्म-धर्मसंयोगानें त्यांचा पूर्व जन्माचा स्नेही मणिकेतु देव तेथें आला. पूर्वजन्मांत त्याचा आणि सगराचा ठराव झाला होता कीं, अगोदर जो कोणी मनुष्यजन्मा-मध्यें येईल, त्यानें दीक्षा घ्यावी. याप्रमाणें पूर्वजन्माची आठवण करून देऊन त्यांच्या स्नेह्यानें त्यांस दीक्षा घेण्यास सांगितलें. परंतु त्यांनीं त्या वेळीं ती गोष्ट नाकारली. पुढें सगराच्या साठ हजार मुलांनीं एके वेळीं त्यांस विचारलें कीं, "आह्मी क्षत्रिय आहोंत, आह्मांला

एखादें असाध्य वाटणारें कार्य सांगा." त्या वेळीं त्यानें सांगितलें कीं, "तुह्मी कैलास पर्वतावर जाऊन भरतचक्रवर्तीनें बांधिलेल्या जिनमंदिरांच्या रक्षणाकरितां त्यांच्या भोंवतीं मोठमोठे तट बांधून त्यांच्यापुढें मोठे खंदक खणून त्यांमध्यें गंगेचा प्रवाह आणून सोडा." ही गोष्ट मान्य करून त्यांनीं तसें केलें. त्या वेळीं सगराच्या मणिकेतु नांवाच्या मित्रानें सर्पाचें रूप धारण करून तेथेंच त्या सर्वांना आपल्या विषमयी फूत्कारांनीं अचेतन केलें आणि ही गोष्ट सगरास कळविली. हें ऐकून सगराला वैराग्य होऊन त्यानें दीक्षा घेतली. हें पाहून मणिकेतूचे मनोरथ सफल झाले. त्यानें कैलासपर्वतावर जाऊन सगराच्या मुलांना पुन्हां सचेतन करून सगरानें दीक्षा घेतल्याबद्दलची बातमी त्यांना कळविली. तें ऐकून त्या सर्वांनींही दीक्षा घेतली. दीक्षा घेण्याच्या अगोदर सगरानें भगीरथाला राज्य दिलें होतें. सगर मोक्षास गेल्यानंतर भगीरथानें वरदत्ताला राज्य देऊन आपण तपश्चर्या धारण केली. भगीरथराजानें कैलासपर्वतावरील गंगानदीच्या तीरावर दीक्षा घेतली. देवांनीं गंगानदीच्या पाण्यानें भगीरथ मुनींचा अभिषेक केला. भगीरथाच्या चरणाचा आणि गंगेच्या पाण्याचा संयोग झाल्यामुळें तेव्हांपासून लोक गंगानदीला भागीरथी असें ह्मणूं लागले आणि गंगेला तीर्थ असें समजूं लागले. भगीरथास केवलज्ञान प्राप्त होऊन ते मोक्षास गेले.

## ३. मघवा ( चक्रवर्ती ).

हे चक्रवर्ती धर्मनाथ आणि शांतिनाथ तीर्थंकर यांच्या मध्यकालीं झाले. अयोध्या नगरींत राजा सुमित्र सुभद्रादेवीसह राज्य करीत होता. त्यांच्या उदरीं मघवा चक्रवर्ती जन्मास आले. त्यांनीं सहा खंडांचें राज्य केलें. नवनिधि आणि चौदा रत्नें हीं त्यांना प्राप्त झालीं. या चक्रवर्तीनीं बरींच वर्षें राज्याचा उपभोग घेतल्यावर एके दिवशीं

ते अरण्यांत गेले असतांना त्यांस अभयघोष नांवाचे मुनि भेटले. मुनीजवळ धर्मोपदेश ऐकून तेथेंच त्यांनीं दीक्षा घेऊन घोर तपश्चर्या केली. मघवा चक्रवर्तीचें शरीर ४२ धनुष्य उंच असून त्यांचें आयुष्य ५ लाख पूर्व होतें.

## ४. सनत्कुमार ( चक्रवर्ती ).

मघवा चक्रवर्तीनंतर पुष्कळ वर्षे लोटल्यावर कुंथु आणि अर ह्यांच्या मध्यकालीं सनत्कुमार चक्रवर्ती झाले. सूर्यवंशी राजा अनंतवीर्य यांच्या सहदेवी राणीच्या उदरीं यांचा जन्म झाला. त्यांनीं षट्खंड पृथ्वीचें राज्य मिळवून धर्ममार्गानें व मोठ्या दक्षतेनें राज्य केलें. सनत्कुमार चक्रवर्ती हे शरीरानें सुंदर होते, अशाबद्दल चोहोंकडे ख्याति होती. पुष्कळ दिवस राज्यसुखाचा अनुभव घेतल्यावर त्यांचें मन संसारभोगाविषयीं विरक्त झालें. यौवन, धन व शरीर हीं नश्वर आहेत, असें जाणून त्यांनीं देवकुमार नांवाच्या पुत्रास राज्य देऊन आपण जिनदीक्षा घेतली. तपश्चर्या करीत असता त्यांचें शरीर अनेक व्याधींनीं पीडित झालें. हें पाहून त्यांच्या तपश्चर्येची परीक्षा करण्याकरितां स्वर्गांतील एका देवानें, वैद्याचें रूप धारण करून त्यांच्याजवळ जाऊन ह्मटलें, " मी नामांकित वैद्य आहे. आपणास काय औषधि पाहिजे तें सांगा. " मुनि ह्मणाले, " बाबा तूं जर नामांकित वैद्य आहेस तर जन्म, जरा, मरण या व्याधींनीं पीडलेल्या या शरीराला तुझें औषध देऊन मला यांतून लौकर मोकळें कर. " वेषधारी वैद्य खट्टू झाला आणि लागलीच आपली खरी हकीकत सांगून निघून गेला. मुनींनीं उत्कृष्ट ध्यानानें कर्मांचा नाश केला आणि शेवटीं सद्गति साधिली. हे चक्रवर्ती ४१ धनुष्य उंच असून त्यांचें आयुष्य ३ लाख पूर्व होतें.

## ५. शांतिनाथ ( चक्रवर्ती ).

हस्तनागपूर नगरींत काश्यपवंशीय राजा विश्वसेन, ऐरादेवीसह राज्य करीत होता. त्यांच्या उदरीं हे शांतिनाथ चक्रवर्ती जन्मास आले. त्यांनीं इतर चक्रवर्तीप्रमाणें षट्खंड पृथ्वी, नवनिधि, चौदा रत्नें यांचे स्वामी होऊन पुष्कळ वर्षें राज्य केलें. पूर्वभवांत षोडश-भावना भावल्यामुळें त्यांना तीर्थंकरनामकर्माचा बंध झाला होता. धर्मनाथानंतर हेच सोळावे तीर्थंकर झाले.

## ६. कुंथुनाथ ( चक्रवर्ती ).

शांतिनाथ तीर्थंकराप्रमाणेंच श्रीकुंथुनाथांनीं षट्खंड पृथ्वीचें राज्य संपादन करून सार्वभौम चक्रवर्ती-पद मिळविलें. त्यांना तीर्थंकरनामकर्माचा बंध झाला असल्यानें हे पुढें तीर्थंकर झाले.

## ७. श्रीअरनाथ ( चक्रवर्ती ).

हे कुंथुनाथ तीर्थंकरानंतर त्यांच्याचप्रमाणें सार्वभौम चक्रवर्ती होऊन शेवटीं तीर्थंकर झाले. (या तीन तीर्थंकरांची माहिती पहिल्या भागांत आली आहेच.)

## ८. सुभौम ( चक्रवर्ती ).

एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करून पराक्रमी क्षत्रिय ह्मणवून घेणारा **परशुराम** ज्या कालीं होऊन गेला त्याच कालीं सहस्रबाहु आपल्या चित्रमती राणीसह राज्य करीत होता. परशुरामाकडून सहस्रबाहु मारला गेला त्यावेळीं चित्रमती गरोदर होती. पुढें तिच्या पोटीं सुभौम नांवाचा राजा उत्पन्न झाला. सुभौमानें षट्खंड पृथ्वी जिंकून अतुल शौर्य गाजविलें. त्यानें परशुरामाशीं युद्ध करून आपल्या सुदर्शन चक्ररत्नानें

परशुरामाचा वध केला आणि साकेतापुरीस आपलें राज्य स्थापिलें. सुभौम राजा सुखानें राज्याचा उपभोग घेत कालक्रमण करीत असतां एके दिवशीं पूर्वजन्मींच्या वैरामुळें सुभौमाचा सूड घेण्याकरितां, एक ज्योतिषवासी मिथ्यादेव व्यापाऱ्याचा वेष घेऊन राजाच्या दरबारांत एक अमृतमय फळ घेऊन आला. सुभौमराजा त्या अमृतमय फळाला लुब्ध होऊन पुन्हां त्याच्या प्राप्तीसाठीं त्याच्या पाठीमागून गेला. त्या वेषधारी व्यापाऱ्यानें त्या राजाला एका समुद्रांत नेऊन तेथें त्याचा मोठा छळ मांडिला. चक्रवर्तीनें आपली असहायस्थिति लक्षांत आणून त्याला क्षमा करण्यास विनंति केली. त्यानें चक्रवर्तीस म्हटलें कीं, "तूं पाण्यांत णमोकार मंत्र लिहून त्यावर पाय ठेव." दुर्दैवी चक्रवर्तीनें आपल्या सुटकेसाठीं तसें केलें! त्या पातकामुळें वेषधारी व्यापाऱ्यानें त्याच्यावर झडप घालून त्याचा प्राण घेतला. त्यायोगें सुभौमचक्रवर्ती मरून सातव्या नरकांत गेला. त्याच्या देहाची उंची २२ धनुष्य असून आयुष्य ८६००० वर्षांचें होतें. अर आणि मल्लि यांच्या मध्यकालीं हे चक्रवर्ती झाले होते. भविष्यत्कालीं हे सुभौमचक्रवर्ती वीसावे **अनिवृत्त** नामें तीर्थंकर होणार आहेत.

## ९. पद्मनाभ ( चक्रवर्ती ).

वाराणशी नगरींत पद्मकांत राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचे उदरीं पद्मनाभ नांवाचा पुत्र झाला. त्याला पूर्वपुण्योदयानें सर्व विद्या प्राप्त झाल्या. पुढें पद्मनाभाला चौदा रत्नें व नवनिधि प्राप्त होऊन त्याच्या बळानें त्यानें षट्खंड पृथ्वी जिंकून सर्वत्र आपलें आधिपत्य प्रस्थापित केलें. राजा सुकेतूच्या सुंदर कन्येशीं त्यानें लग्न केलें. तो दिव्य सुखोपभोग घेत असतां त्याला तारुण्यांतच वैराग्य उत्पन्न झालें. तेव्हां सुकेतूला फार वाईट वाटून त्यानें त्याला पुष्कळ उपदेश केला.

पण तो व्यर्थ होऊन पद्मनाभानें आपल्या पुत्रास राज्याभिषेक करून आपण तपोवनाचा मार्ग स्वीकारला. वनांत जाऊन त्यानें समाधिगुप्त मुनीजवळ दीक्षा घेतली आणि दुर्धर तपश्चर्या करून शिवरमणी वश केली. हा चक्रवर्ती मल्लि आणि मुनिसुव्रत यांच्या मध्यकालीं होऊन गेला. त्याची देहाची उंची २० धनुष्य असून आयुष्य ३०००० वर्षांचें होतें.

## १०. हरिषेण ( चक्रवर्ती ).

या चक्रवर्तीची राजधानी भोगपूर या नांवाची होती. त्यांच्या मातेचें नांव ऐरादेवी व जनकाचें नांव पद्मनाभ असें होतें. त्यांच्या देहाची उंची १५ धनुष्य असून १०००० वर्षांचें आयुष्य होतें. हे चक्रवर्ती मुनिसुव्रत आणि नमि यांच्या मध्यकालीं होऊन गेले. हेहि इतर चक्रवर्तींप्रमाणें षट्खंडांचे स्वामी होऊन शेवटीं दीक्षा घेऊन मोक्षाला गेले.

## ११. जयसेन ( चक्रवर्ती ).

हे चक्रवर्ती नमि आणि नेमि यांच्या मध्यकालीं होऊन गेले. कौशांबी ही त्यांची राजधानी होती. त्यांच्या मातेचें नांव प्रभंकरी व जनकाचें नांव विजय असें होतें. त्यांच्या देहाची उंची १० धनुष्य असून ३ हजार वर्षांचें आयुष्य होतें. त्यांनीं चक्रवर्तीपद मिळवून कांहीं काल राज्याचा उपभोग घेतला. शेवटीं दीक्षा घेऊन ते निर्वाणपदाला पोंचले.

## १२. ब्रह्मदत्त ( चक्रवर्ती ).

वर्तमानकाळचे हे शेवटचे चक्रवर्ती, नेमि आणि पार्श्व यांच्या मध्यकालीं होऊन गेले. अयोध्या ही त्यांची राजधानी होती. त्यांच्या मातेचें नांव चूडादेवी व जनकाचें नांव ब्रह्म असें होतें. हे ७ धनुष्य

उंच असून त्यांचें ७०० वर्षांचें आयुष्य होतें. त्यांनीं आपल्या कुकर्मानें शेवटीं नरकगति साधली.

## चक्रवर्तीचें ऐश्वर्य.

**( १ ) सहा खंड पृथ्वीचें राज्य, ( २ ) नव निधि, ( ३ ) चौदा रत्नें, ( ४ ) सात अंगें, ( ५ ) दशांग भोग, ( ६ ) चतुरंग सैन्य वगैरे.**

**सहा खंड पृथ्वीः**-पांच म्लेंछ खंडें व एक आर्याखंड मिळून सहा खंडें भरतक्षेत्रांत आहेत.

**नव निधिः**-१ काळ, २ महाकाळ, ३ पांडुक, ४ माणवक, ५ नैसर्पाख्य, ६ सर्व रत्नाख्य, ७ शंख, ८ पद्म, ९ पिंगलाख्य.

**चौदा रत्नें**ः-१ चक्र, २ खड्ग, ३ दंड, ४ चर्म, ५ छत्र, ६ चूडामणि, ७ चिंतामणि, ८ गृहपति, ९ सेनापति, १० गजपति, ११ अश्व, १२ तक्षक, १३ पुरोहित, १४ स्त्री. यांपैकीं पहिलीं सात अजीव रत्नें आणि शेवटचीं सात सजीव रत्नें.

**सात अंगें:**-१ स्वामी, २ अमात्य, ३ सुहृद्, ४ कोश, ५ देश, ६ दुर्ग, ७ षडंगबल.

**दशांग भोगः**-१ दिव्य भाजन, २ दिव्य भोजन, ३ दिव्य शय्या, ४ दिव्य आसन, ५ दिव्य नाट्य, ६ दिव्य रत्न, ७ दिव्य निधि, ८ दिव्य सेना, ९ दिव्य वाहन, १० दिव्यपुर.

**चतुरंग सैन्यः**-१ हत्ती, २ घोडा, ३ रथ, ४ पायदळ. यांमध्यें ८४ लाख हत्ती, ८४ लाख रथ, १८ कोट घोडे, ८४ कोट पायदळ. इतकें चक्रवर्तीचें सैन्य असतें.

याप्रमाणें प्रत्येक चक्रवर्तीला हीं ऐश्वर्यें असतात.

# भाग ३ रा.

## नऊ नारायण व त्यांची माहिती.

१ त्रिपुष्ट, २ द्विपुष्ट, ३ स्वयंभु, ४ पुरुषोत्तम, ५ नरसिंह, ६ पुंडरीक, ७ दत्तदेव, ८ लक्ष्मण, ९ कृष्ण.

### १. त्रिपुष्ट [ नारायण ].

पौदनापूरचा राजा प्रजापति आणि त्याची महाराणी भगवती यांच्या पोटीं त्रिपुष्ट हा पहिला नारायण होऊन गेला. श्रेयांस तीर्थकरांच्या वेळीं हा नारायण होता. त्याच्या देहाची उंची ८० धनुष्यें असून त्याचें ८४ लक्ष वर्षांचें आयुष्य होतें. त्रिपुष्ट नारायण हा प्रतिनारायण अश्वग्रीव यास जिंकून तीन खंडांचा स्वामी झाला. बहुतकरून राज्य, ऐश्वर्य, भोगोपभोग-सामुग्री ह्या सर्व गोष्टी नारायणास चक्रवर्तीच्या निम्यानें साध्य असतात; ह्मणून उक्त सर्व नारायणांस **अर्धचक्री** असेंहि ह्मणतात. त्रिपुष्टाच्या पट्टराणीचें नांव स्वयंप्रभा असें होतें. या नारायणाच्या ज्येष्ठ पुत्राचें नांव श्रीविजय असें होतें. त्यानें आपल्या या पुत्राचा विवाह आपल्या मेहुण्याची कन्या तारा हिच्याशीं केला होता. हा नारायण ऐहिक भोगांत सदैव मग्न राहिल्यानें मरून नरकांत गेला. त्याच्या पाठीमागून त्याच्या पुत्राला राज्य मिळालें.

### २. द्विपुष्ट [ नारायण ].

भगवान् वासुपूज्य तीर्थकरांच्या वेळीं हा द्वितीय नारायण होऊन गेला. द्वारकापूरचे ब्रह्मराजे हे त्याचे जनक होते. ब्रह्मराजाच्या पूना

नांवाच्या दुसऱ्या राणीपासून द्विपृष्ट जन्मास आला. द्वितीय नारायणाच्या शरीराची उंची ७० धनुष्यें होती आणि ७२ लाख वर्षांचें आयुष्य होतें. द्विपृष्टाच्या शरीराचा रंग नीलवर्णाचा होता. त्याच्या वेळीं प्रतिनारायण '**तारक**' होता. त्यास जिंकून द्विपृष्ट तीन खंडांचा स्वामी झाला. पहिल्या नारायणाप्रमाणेंच त्यास सात रत्नें साध्य होतीं. त्यांचीं नांवें:–१ धनुष्य, २ चक्र, ३ खड्ग, ४ शंख, ५ दंड, ६ गदा, ७ शक्ति. ( हीं सात रत्नें प्रत्येक नारायणास साध्य असतात. इतकेंच नव्हे तर चक्रवर्तीच्या निम्यानें त्यांचें ऐश्वर्य असतें. ) नारायण द्विपृष्ट हाहि वरील कारणामुळेंच मरून नरकांत गेला.

## ३. स्वयंभु [ नारायण ].

पहिल्या जन्मीं लांतव स्वर्गांतील देवानें, चौदा सागर वर्षें आयुष्य भोगिलें आणि तेथून त्यानें द्वारावती नगरीच्या रुद्रराजाची राणी पृथ्वीदेवी हिच्या उदरीं जन्म घेतला. हाच स्वयंभु नारायण होय. याच्या शरीराची उंची ६० धनुष्यें असून ६ लाख वर्षांचें त्यास आयुष्य होतें. त्यानें आपला बंधु धर्मप्रभ-बलदेव याची मदत घेऊन रत्नपुरीच्या मेरक नांवाच्या प्रतिनारायणाशीं युद्ध करून त्यास ठार मारिलें. नंतर स्वयंभु त्रिखंडाधिपति झाला. त्यानें कांहीं कालपर्यंत राज्य केल्यावर तो आर्तध्यानांत मग्न असतां मरण पावला. त्यामुळें तो पुढच्या जन्मीं सातव्या नरकांत गेला. हा नारायण विमलनाथ तीर्थंकरांच्या वेळीं होऊन गेला.

## ४. पुरुषोत्तम [ नारायण ].

भरत क्षेत्रांतील द्वारावती नगरींत सोमप्रभराजा राज्य करीत असतां, त्याच्या सीता नांवाच्या राणीपासून पुरुषोत्तम नांवाचा पुत्र

झाला. बाळपणींच सर्व विद्येंत निपुण होऊन त्यानें आपल्या भुजबळानें सर्व विद्याधरांस पादाक्रांत केलें. पुरुषोत्तमाची उंची ५० धनुष्यें होती व आयुष्य ३० लाख वर्षांचें होतें. त्याच्या शरीराचा वर्ण श्याम ( काळा ) होता. त्यानें प्रतिनारायण **निसुंभ** याजबरोबर युद्ध करून तीन खंडांचें राज्य मिळविलें. पण राज्यांत फारच अन्याय केल्यामुळें शेवटीं तो सातव्या नरकांत गेला. हा नारायण अनंततीर्थकरांच्या वेळीं होऊन गेला.

## ५. नरसिंह ( नारायण ).

पूर्वजन्मीं चौथ्या स्वर्गांत असलेल्या देवानें, नाना ऋद्धि प्राप्त करून घेतल्या आणि सात सागर वर्षे आयुष्य भोगिलें. मग तेथून खगपुरींत असलेल्या इक्ष्वाकु-वंशीय सिंहसेन राजाच्या अंबिका नांवाच्या राणीच्या उदरीं त्यानें जन्म घेतला. हाच नरसिंह होय. तो आपल्या बुद्धीनें आणि शौर्यानें नारायण पदवीस पोंचला. नारायणाच्या शरीराची उंची ४० धनुष्यें असून ८ लाख वर्षांचें आयुष्य होतें. त्यानें मधुकैटभ नांवाच्या प्रतिनारायणाशीं युद्ध करून त्याला युद्धांत जिंकिलें. नरसिंह हा लढाईत यशस्वी झाल्यामुळें संपूर्ण तीन खंडांचें राज्य त्याला मिळालें नरसिंहानें संसाराची असारता न जाणल्यामुळें कृतकर्माच्या नाशार्थ दीक्षा न घेतां, पुष्कळ काळ संसारांत तसाच घातला. ह्मणून दुर्गतीचा बंध पडून तो सातव्या नरकांत गेला. नरसिंहाचा जीव भविष्यत्कालीं तीर्थंकर होणार आहे. हा नारायण धर्मनाथ तीर्थंकरांच्या वेळीं झाला.

## ६. पुंडरीक ( नारायण ).

पूर्वजन्मीं पहिल्या स्वर्गांतील देवानें, स्वर्गीय आयुष्य संपल्यावर भरतखंडांतील चक्रपुरी नगरींत वरसेन राजाच्या लक्ष्मीमती

राणीच्या उदरीं जन्म घेतला. हेच ते पुंडरीक नारायण होत. त्यांची उंची २९ धनुष्यें असून ६५ हजार वर्षांचें त्यांना आयुष्य होतें. त्यांचा विवाह, इंद्रपुरींतील उपेंद्र राजाच्या पद्मावती नांवाच्या राजकन्येशीं झाला. त्यांनीं प्रल्हाद नांवाच्या प्रतिनारायणाबरोबर युद्ध करून युद्धांत त्याला जिंकिलें. नंतर त्यांना तीन खंडांचें राज्य प्राप्त झालें. त्याचा त्यांनीं पुष्कळ काल आपल्या बांधवांसहित उपभोग घेतला. शेवटीं ते आर्तध्यानानें मरण पावल्यामुळें पांचव्या नरकांत गेले. पुंडरीकनारायण हे पुढें भविष्यत्कालीं सहावे **श्रीदेव** तीर्थंकर होणार आहेत. हे नारायण अरनाथाच्या वेळीं होऊन गेले.

## ७. दत्तदेव ( नारायण ).

पूर्वजन्मीं प्रथम स्वर्गींतील देव, स्वर्गीय आयुष्य पूर्ण करून, वाराणशीस अग्निशिखा राजा राज्य करीत असतां, त्याच्या कंसवती राणीपासून दत्तदेव नांवाचा पुत्र होऊन जन्मला. त्यानें आपल्या शौर्यानें नारायण ही पदवी मिळविली. शरीराची उंची २२ धनुष्यें असून ३२ हजार वर्षांचें आयुष्य होतें. दत्तदेवानें बलिसेन नांवाच्या सातव्या प्रतिनारायणाशीं युद्ध करून त्यास जिंकिलें. नंतर सातवा नारायण, तीन खंडांचें राज्य मिळवून त्याचा उपभोग घेऊं लागला. पुढें नारायणानें पुष्कळ आरंभ-प्रारंभ करून पाप संचय केला; त्यायोगें त्याला नरकाचा बंध झाला. एके दिवशीं नारायण दत्तदेव वनक्रीडेसाठीं गेला असतां, तेथें तो व्याधाच्या बाणानें मारला गेला. त्यावेळीं आर्तध्यानानें त्याचा प्राण गेल्यामुळें तो पांचव्या नरकांत गेला. पुढें हा नारायण भविष्यत्कालीं **श्रीकुल** नांवाचा सातवा तीर्थंकर होणार आहे. हा नारायण मल्लिनाथ तीर्थंकरांच्या वेळीं होऊन गेला.

## ८. लक्ष्मण ( नारायण ).

अयोध्या नगरीचा राजा दशरथ हा लक्ष्मणाचा जनक होय. श्रीरामचंद्र लक्ष्मणाचा वडील बंधु होय. या आठव्या नारायणानें आपल्या अतुल पराक्रमानें नारायण ही पदवी मिळविली. त्याच्या शरीराची उंची १६ धनुष्यें असून त्यास १२ हजार वर्षांचें आयुष्य होतें. त्यानें रामचंद्राबरोबर बरींच वर्षें वनवास भोगला. नारायणास सात रत्नें प्राप्त झाल्यानंतर, श्रीरामचंद्रासह लक्ष्मणानें प्रतिनारायण रावण याजबरोबर महायुद्ध करून त्याला ठार केलें. हा लक्ष्मण राज्यसुखाचा अनुभव घेऊन शेवटीं आर्तध्यानानें नरकास गेला. पुढें तपश्चरण करून तो मुक्त होणार आहे.

## ९. कृष्ण ( नारायण ).

द्वारकानगरींत यादव वंशामध्यें वसुदेवाची राणी देवकी हिच्यापासून कृष्णाचा जन्म झाला. त्यांच्या देहाची उंची १० धनुष्यें असून १० हजार वर्षांचें आयुष्य होतें. त्यांनीं राजगृह नगरीचा प्रतिनारायण जरासंध याजबरोबर युद्ध करून त्यास ठार केलें आणि ते त्रिखंडाधिपती झाले. कांहीं कालपर्यंत राज्यसुख भोगून शेवटीं ते आर्तध्यान-मग्न राहिल्यानें नरकास गेले. पुढें तपश्चरण करून ते मुक्त होतील.

---

## नऊ प्रतिनारायण व त्यांची माहिती.

१ अश्वग्रीव, २ तारक, ३ मेरक, ४ शंभु, ५ मधुकीटक ( मधुकैटभ ), ६ प्रल्हाद, ७ बलिसेन, ८ रावण, ९ जरासंध.

# १. अश्वग्रीव ( प्रतिनारायण ).

भगवान् श्रेयांसनाथ तीर्थकरांच्या वेळीं अलकापूर नगरीचा राजा मयूरग्रीव यांच्यापासून अश्वग्रीवाचा जन्म झाला. अश्वग्रीवानें सर्वांच्या अगोदर प्रतिनारायणाची पदवी मिळविली. प्रत्येक प्रतिनारायण तीन खंडांचे अधिपति असतात. या नियमाला अनुसरून हा तीन खंडांचा स्वामी होता. प्रत्येक प्रतिनारायणास चक्ररत्न साध्य असतें. अश्वग्रीवास ८ हजार स्त्रिया होत्या. या प्रतिनारायणाच्या वेळीं त्रिपुष्ट नांवाचा नारायण होऊन गेला. त्याचें वर्णन मागें आलें आहेच. अश्वग्रीवाकरितां त्याच्या एका मांडलिक राजानें नजराणा नेण्याची तयारी चालविली होती; पण नारायण त्रिपुष्टानें तो नेऊं दिला नाहीं. हें ऐकून अश्वग्रीवानें त्रिपुष्टाबरोबर युद्ध करण्याचें ठरविलें. प्रथम त्या दोघांचें सैन्यासह युद्ध करण्याचें ठरलें होतें. पण उभय बाजूंच्या मंत्र्यांनीं सांगितल्यावरून, परस्पर दोघांचें युद्ध होऊन त्यांत अश्वग्रीव हरला. यामुळें त्याचें राज्य नारायणास मिळालें आणि त्याचें चक्ररत्नहि नारायणास प्राप्त झालें.

# २. तारक ( प्रतिनारायण ).

भगवान् वासुपूज्य तीर्थकरांच्या वेळीं उदयास आलेला भोगवर्धनपूरचा राजा श्रीधर, याचा पुत्र तारक हा दुसरा प्रतिनारायण होय त्यानेंहि तीन खंडांचें राज्य केलें. हा राजा मोठा पराक्रमी पण अन्यायी होता. ज्यावेळीं द्विपुष्ट नांवाच्या दुसऱ्या नारायणानें त्याची आज्ञा मानिली नाहीं, त्यावेळीं त्याचा नाश करण्याकरितां त्यानें त्याजकडे दूताकडून निरोप पाठविला कीं, “ आपला गंध नांवाचा हत्ती माझ्याकडे पाठवून दे; नाहींपेक्षां युद्धाला तयार हो. ” यानंतर दोघांचें युद्ध होऊन, प्रतिनारायणानें द्विपुष्टावर चक्ररत्न सोडिलें.

पण तें नारायणाला तीन प्रदक्षिणा घालून उजव्या बाजूला जाऊन राहिलें. त्यावेळीं तेंच चक्र त्यानें प्रतिनारायणावर चालविलें. त्यामुळें तारक हा मारला जाऊन तो सातव्या नरकांत गेला.

## ३. मेरक ( प्रतिनारायण ).

विमलनाथ तीर्थंकरांच्या वेळीं मेरक नांवाचे प्रतिनारायण होऊन गेले. त्यांचा जन्म रत्नपूर नगरींत झाला होता. त्यांनीं आपल्या बाहुबलानें तीन खंडांचें राज्य मिळविलें. पुढें त्यांस स्वयंभु नारायणाच्या पराक्रमाची ख्याती समजली. तेव्हां त्याचा केव्हां अपजय करीन असें त्यांस वाटूं लागलें. आपला द्वेष मेरक करीत आहे हें जाणून स्वयंभूनें बलरामासह मेरकाबरोबर लढाई केली. आणि त्यानें प्रतिनारायणास ठार मारिलें. याप्रमाणें त्याचा अंत झाल्यावर तो आर्तध्यानानें मरण पावून सातव्या नरकांत गेला.

## ४. निसुंभ ( प्रतिनारायण ).

अनंत तीर्थंकरांच्या वेळीं काशी नगरांत निसुंभ नांवाचा प्रतिनारायण तीन खंडांचें राज्य करीत असतां, एकदां नारदानें त्याच्याजवळ जाऊन त्याला सांगितलें कीं, " द्वारावतींत पुरुषोत्तम व सुप्रभ हे दोघे बंधु तुमच्याहिपेक्षां अधिक आनंदानें राज्य करीत आहेत. " हें ऐकून त्याला मत्सर उत्पन्न झाला. त्यानें लागलीच त्यांच्याकडे एका दूताला पाठवून लढाईची तयारी केली. उभयतांचें प्रचंड युद्ध झालें. प्रतिनारायणानें शत्रूवर चक्र सोडलें; पण त्याचा कांहीं उपयोग न होतां, उलट त्या चक्रानें त्याचाच प्राण मात्र गेला. याप्रमाणें त्याचा अंत होऊन तो नरकास गेला.

## ५. मधुकैटभ ( प्रतिनारायण ).

कुरुजांगल देशांत असणाऱ्या हस्तनागपुरांतील राजाच्या उदरीं मधुकैटभ नांवाचा पुत्र झाला. त्यानें सर्व राजांस जिंकून

त्यांना कारभार द्यावयास लाविलें. तेव्हां त्याला त्रिखंडाधिपति ह्मणूं लागले. त्याच्या शौर्याची ख्याति नरसिंह ( नारायण ) यास समजतांच त्यानें लढाईची तयारी करून प्रतिनारायणाशीं युद्ध केलें. युद्धांत प्रतिनारायण मारला गेल्यामुळें रौद्रध्यानानें तो दुर्गतीस गेला.

## ६. प्रल्हाद ( प्रतिनारायण ).

चक्रपुरीच्या राजापासून सहाव्या प्रतिनारायणाचा जन्म झाला. त्यानें तीन खंडांचें राज्य केलें. उपेंद्र राजानें आपली सुंदर कन्या पुंडरीक नांवाच्या सहाव्या नारायणाला दिल्याचें समजल्यावरून त्यानें पुंडरीकावर स्वारी केली. त्रिखंडाधिपति प्रल्हादानें पुंडरीकावर चक्र सोडिलें; पण त्यानें त्याचा नाश न होतां, उलट तें प्रतिनारायणाच्या नाशास कारणीभूत झालें. प्रल्हाद हे भविष्यत्कालीं निष्पाप नामें तीर्थंकर होणार आहेत.

## ७. बलिसेन [ प्रतिनारायण ].

पूर्वजन्मीं यम नांवाचा जीव पुण्यबलानें विद्याधर कुलांत जन्मला. हाच बलिसेन नांवाचा सातवा प्रतिनारायण होय. त्यानें प्रतिनारायण हें पद धारण केल्यावर कांहीं दिवस तीन खंडांचें राज्य केलें. शेवटीं दत्तदेव नांवाच्या सातव्या नारायणाशीं युद्ध करीत असतां तो नारायणाकडून मारला गेला. हा सातवा प्रतिनारायण भविष्यत्कालीं निष्कषाय नांवाचा तीर्थंकर होणार आहे.

## ८. रावण [ प्रतिनारायण ].

जगप्रसिद्ध लंकेचा अधिपति रावण हा त्रिखंडाधिपति झाल्यावर त्यानें श्रीरामचंद्राच्या पत्नीला हरण केलें पुढें लक्ष्मण-नारायणानें आपला ज्येष्ठ बंधु राम-यासह रावणाशीं युद्ध करून त्यास ठार केलें. रावण हा दशमुखी अथवा राक्षस नसून, तो सामान्य मनुष्यासारखाच, पण अत्यंत पराक्रमी व विद्याधर राजा होता.

## ९. जरासंध [ प्रतिनारायण ].

जरासंध हा प्रतिनारायण होता. त्याच्या राजधानीचें नांव राजगृह असें होतें. यादववंशांतील कृष्णानें जरासंधाशीं युद्ध केल्यामुळें युद्धांत जरासंध मारला गेला. आर्तध्यानामुळें मरणोत्तर तो नरकास गेला.

या नऊ प्रतिनारायणांच्या शरीराची उंची आणि आयुष्य हीं पूर्वोक्त नारायणांच्या बरोबरीनेंच असतात.

---

# नऊ बलिभद्रांचीं नांवें व त्यांची माहिती.

१ विजय, २ अचल, ३ धर्मप्रभ, ४ सुप्रभ, ५ सुदर्शन, ६ नंदिसेन, ७ नंदिमित्र, ८ रामचंद्र, ९ पद्म (बलराम).

## १. विजय [ बलिभद्र ].

त्रिपुष्टनारायणाच्या द्वितीय मातेपासून झालेला विजय हा पहिला बलिभद्र होय. विजयाच्या मातेचें नांव जयावती असें होतें. बलिभद्रास पुढील ४ रत्नें साध्य होतीं:–१ गदा, २ माल, ३ हल व ४ मुसल. त्रिपुष्टनारायणाच्या मरणानंतर विजयबलिभद्र, आपल्या भावाचें शव पाठीवर घेऊन सहा महिने हिंडला. शेवटीं ज्यावेळीं तो शुद्धीवर आला त्यावेळीं त्यानें तें शव जाळून टाकलें. आणि सुवर्णकुंभ मुनीजवळ ७०० राजेलोकांसह त्यानें दीक्षा घेतली. त्याच्या शरीराची उंची ८० धनुष्यें असून आयुष्य ८२ लाख वर्षांचें होतें. तपश्चरणाच्या प्रभावानें शेवटीं तो मुक्त झाला.

## २. अचल [ बलिभद्र ].

द्वारकापूरच्या ब्रह्मराजाच्या सुभद्रा नांवाच्या पहिल्या राणीपासून अचल बलिभद्र उत्पन्न झाला. हा द्विपुष्टनारायणाचा वडील भाऊ होय. त्याचा वर्ण कुंदपुष्पाप्रमाणें सुंदर होता. त्याच्या शरीराची उंची ७० धनुष्यें असून आयुष्य ७७ लाख वर्षांचें होतें. त्यास ४ रत्नें साध्य होतीं. कांहीं कालपर्यंत राज्यसुखाचा अनुभव घेऊन त्यानें शेवटीं दीक्षा घेतली आणि तो मोक्षास गेला.

## ३. धर्मप्रभ [ बलिभद्र ].

पूर्वजन्मीं अनुत्तर विमानामध्यें अहमिंद्राचा जीव, तीस सागर वर्षें आयुष्य भोगून द्वारावतीनगरींत रुद्रराजा आपल्या सुभद्रा स्त्रीसह राज्य करीत असतां त्यांच्या उदरीं जन्मला. हाच धर्मप्रभ नांवाचा बलदेव होय. हा स्वयंभूनारायणाचा वडील बंधु होय. ह्यास राज्यप्राप्ती झाल्यावर तो न्यायानें प्रजेचें पालन करीत राज्य करूं लागला. त्याच्या शरीराची उंची ६० धनुष्यें असून ६७ लाख वर्षांचें आयुष्य होतें. याप्रमाणें कांहीं काल गेल्यावर एके दिवशीं आपल्या भावाच्या मरणाची वार्ता ऐकतांच तो मूर्च्छित झाला. त्याला सहा महिनेपर्यंत बंधु-प्रेमाचें वेड लागलें होतें. पुढें त्याला वैराग्य होऊन त्यानें श्रीविमलनाथ तीर्थंकरांजवळ दीक्षा घेतली आणि घोर तपश्चर्या करून निर्वाणपद मिळविलें.

## ४. सुप्रभ [ बलिभद्र ].

द्वारावतीनगरींत सोमप्रभराजा राज्य करीत असतां त्याच्या जयावतीराणीच्या उदरीं सुप्रभ नांवाचा बलिभद्र जन्मास आला. सुप्रभ, पुरुषोत्तमनारायणाचा ज्येष्ठ बंधु होय. सुप्रभानें कांहीं वर्षें राज्य केल्यानंतर संसारस्थिति नश्वर आहे, हें जाणून दीक्षा

घेतली आणि उग्र तपश्चर्या करून अष्टकर्मांचा नाश केला. केवल-ज्ञान झाल्यावर सर्व ठिकाणीं विहार करून त्यानें भव्य लोकांना उपदेश दिला. सुप्रभाच्या शरीराची उंची ५० धनुष्यें असून त्यास ३७ लाख वर्षांचें आयुष्य होतें. शेवटीं तपश्चरण करून तो मुक्त झाला.

## ५. सुदर्शन [ बलिभद्र ].

पूर्वजन्मीं बाराव्या स्वर्गांत असलेल्या देवानें, अठरा सागर वर्षे आयुष्य भोगून, तेथून खगपुरींत असलेल्या इक्ष्वाकुवंशीय सिंह-सेनराजाच्या दुसऱ्या विजयादेवीच्या उदरीं जन्म घेतला. त्याचें नांव सुदर्शन असें ठेविलें. तो आपल्या शौर्यानें आणि बुद्धिबळानें बलिभद्रपदवीस प्राप्त झाला. नरसिंह-नारायण आणि सुदर्शन हे दोघे सावत्रबंधु होत. परस्परांच्या बंधुत्वामुळें परस्परांचें अतिशय प्रेम होतें. नरसिंह-नारायणानें ज्यावेळीं मधुकैटभाचा युद्धांत नाश केला त्यावेळीं सुदर्शनानें आपल्या बंधूस चांगली मदत केली होती. त्याच्या शरीराची उंची ४५ धनुष्यें असून १७ लाख वर्षांचें आयुष्य होतें. आपल्या बंधूच्या मरणानंतर त्यास अतिशय दुःख होऊन त्यानें संसाराचा त्याग करून श्रीधर्मनाथ तीर्थकरांपासून मुनिदीक्षा घेतली. तपाच्या बलानें आणि धर्म-ध्यानाच्या सहाय्यानें कर्मांचा नाश करून तो शेवटीं मोक्षास गेला.

## ६. नंदिसेन [ बलिभद्र ].

अपर विदेहांतील सूर्यपुरींत सुदर्शन नामें राजा राज्य करीत असतां, त्याच्या मनांत एके दिवशीं संसाराविषयीं विरक्तता उत्पन्न झाली. नंतर सुमित्रमुनीजवळ दीक्षा घेऊन त्यानें दुर्धर तप केलें. तपःप्रभावें तो सौधर्मस्वर्गांत देव झाला. तेथें आयुष्य पूर्ण करून त्यानें, चक्रपुरींतील वरसेनराजाच्या दुसऱ्या वैजयंती राणीच्या उदरीं जन्म घेतला. त्याचें नांव नंदिसेन असें ठेविलें. त्याच्या

पूर्वपुण्यामुळें त्याला उत्तम शरीर प्राप्त झालें. सहाव्या पुंडरीकनारायणाचा हा नंदिसेन सावत्रबंधू असून दोघेही मोठ्या प्रेमानें वागत असत. त्याच्या शरीराची उंची २९ धनुष्यें असून त्यास ६ लाख वर्षांचें आयुष्य होतें. पुंडरीकाच्या मरणानंतर नंदिसेनानें दीक्षा घेतली आणि दुर्धर तपश्चर्या करून शिवरमणी (मोक्ष) वश केली.

## ७. नंदिमित्र [ बलिभद्र ].

पूर्वजन्मीं प्रथम स्वर्गांतील देव, वाराणशी नगरांतील अग्निशिखा राजाच्या अपराजित नांवाच्या राणीच्या उदरीं नंदिमित्र होऊन जन्मला. पुढें तो आपल्या शौर्यानें बलिभद्रपदवीस प्राप्त झाला. त्याच्या देहाची उंची २२ धनुष्यें असून ३७ हजार वर्षांचें आयुष्य होतें. नंदिमित्र आणि सातवे दत्तदेवनारायण हे सावत्रबंधु होते. नंदिमित्रानें कांहीं वर्षें राज्य केल्यावर तो विरक्त झाला. त्यानंतर त्यानें आपल्या पुत्रास राज्य देऊन आपण मुनिदीक्षा घेतली. शेवटीं अखिल कर्मांचा नाश करून त्यानें मोक्षपद मिळविलें.

## ८. रामचंद्र [ बलिभद्र ].

अयोध्या नगरीचा राजा दशरथ यांचे, 'श्रीरामचंद्र' हे ज्येष्ठ चिरंजीव होत रामचंद्र आणि लक्ष्मण ( नारायण ) हे दोघे सावत्रबंधु होते. त्यांनीं १२ वर्षें वनवास भोगून नंतर राज्याचा उपभोग घेतला. रामचंद्र राज्य करीत असतां त्यांनीं सीतेला वनांत सोडून दिलें. त्यावेळीं सीता गरोदर होती. तिला लव आणि अंकुश असे दोन पुत्र झाले. सीतेनें पतिव्रत्याची परीक्षा होण्याकरितां सर्वांसमक्ष अग्निप्रवेश करून आपलें तेज प्रकट केलें ! त्यानंतर अर्जिका होऊन तिनें सद्गति साधिली. रामचंद्रानेंहि दीक्षा घेऊन घोर तपश्चर्या केली आणि मोक्षलक्ष्मी वरिली. श्रीरामचंद्र हे मुनिसुव्रत

तीर्थकरांच्या वेळीं होऊन गेले. त्यांच्या देहाची उंची १६ धनुष्यें असून त्यास १७ हजार वर्षांचें आयुष्य होतें.

## ९. पद्मप्रभ ऊर्फ बलराम [ बलिभद्र ].

पद्मप्रभ हे श्रीकृष्णाचे सावत्र ज्येष्ठ बंधु होत. त्यांच्या मातेचें नांव रोहिणी असें होतें. श्रीकृष्णनारायणानें जरासंधाशीं युद्ध केलें, त्यावेळीं बलरामानें आपल्या बंधूला युद्धांत मदत केली होती. त्याच्या शरीराची उंची १० धनुष्यें असून त्यास १२ हजार वर्षांचें आयुष्य होतें. श्रीकृष्ण आणि बलराम हे नेमिनाथ तीर्थकरांच्या वेळीं होऊन गेले. इतकेंच नव्हे तर या तीर्थकरांचे हे दोघेहि चुलतबंधूच होत. शेवटीं पद्मप्रभानें दीक्षा घेऊन तपश्चर्या केली आणि ब्रह्मनामक पांचव्या स्वर्गाची प्राप्ती करून घेतली. *

---

# पुण्यपुरुषांचीं नांवें.

## नऊ नारद.

१ भीम, २ महाभीम, ३ रुद्र, ४ महारुद्र, ५ काल, ६ महाकाल, ७ दुर्मुख, ८ नरकमुख, ९ अधोमुख.

हे नारद प्रत्येक नारायणाच्या वेळीं होत असतात.

## अकरा रुद्र.

१ भीमवली, २ जितशत्रु, ३ रुद्र ( महादेव ), ४ विश्वानल, ५ सुप्रतिष्ठ, ६ अचल, ७ पुंडरीक, ८ अजितधर, ९ जितनाभि, १० पीठ, ११ सात्यकी.

---

* हे नऊ बलिभद्र, नऊ नारायणांचे सावत्रबंधूच असतात.

## चौदा कुलंकर.

१ प्रतिश्रुति, २ सन्मति, ३ क्षेमंकर. ४ क्षेमंधर, ५ सीमंकर, ६ सीमंधर, ७ विमलवाहन, ८ चक्षुष्मान्, ९ यशस्वी, १० अभिचंद्र, ११ चंद्राभ, १२ मरुदेव, १३ प्रसेनजित, १४ नाभिराज.

## चोवीस कामदेव.

१ बाहुबली, २ अमिततेज, ३ श्रीधर, ४ दशभद्र, ५ प्रसेनजित्, ६ चंद्रवर्ण, ७ अग्निमुक्ति, ८ सनत्कुमार, ९ वत्सराज, १० कनकप्रभ, ११ श्वेतवर्ण, १२ शांतिनाथ, १३ कुंथुनाथ, १४ अरनाथ, १५ विजयराज, १६ श्रीचंद्र, १७ राजानल, १८ हनुमान्, १९ बलराजा, २० वसुदेव, २१ प्रद्युम्न, २२ नागकुमार, २३ श्रीपाल, २४ जंबुस्वामी.

## बारा प्रसिद्ध स्त्रीपुरुषांचीं नांवें.

१ नाभि, २ श्रेयांस, ३ बाहुबली, ४ भरत, ५ रामचंद्र, ६ हनुमान, ७ सीता, ८ रावण, ९ कृष्ण, १० महादेव, ११ भीम, १२ पार्श्वनाथ.

कुलंकरांत नाभिराजा, दान देण्यांत श्रेयांसराजा, तप करण्यांत बाहुबली ( हे एक-वर्षसारखे कायोत्सर्गानें राहिले होते ), शुद्धभावनेंत भरतचक्रवर्ती ( दीक्षा घेतल्याबरोबर यांना केवलज्ञान झालें ), बलदेवांत रामचंद्र, कामदेवांत हनुमान, साध्वी स्त्रियांत सीता, मानीपणांत रावण, नारायणांत कृष्ण, रुद्रांत महादेव, बलवानांत भीम, तीर्थंकरांत पार्श्वनाथ हे प्रसिद्धीस आले.

## तीन पदव्यांचे धारक तीर्थंकर.

१ शांतिनाथ, २ कुंथुनाथ, ३ अरनाथ हे तीर्थंकर, चक्रवर्ती आणि कामदेव या तीन पदव्यांचे धारक होते.

## प्रसिद्ध शीलवती व साध्वी स्त्रियांचीं नांवें.

१ ब्राह्मी, २ चंदनबाला, ३ राजुलादेवी, ४ कौशल्या, ५ मृगावती, ६ सीता, ७ समुद्रा, ८ द्रौपदी, ९ सुलसा, १० कुंती, ११ शीलवती, १२ दमयंती, १३ चूला, १४ प्रभावती, १५ शिवा, १६ पद्मावती.

वर वर्णिलेले त्रेसष्ट शलाकापुरुष, पुण्यपुरुष, प्रसिद्ध स्त्रिया वगैरे हे चतुर्थकालाच्या अखेरपर्यंत होऊन गेले.

---

# भाग ४ था.

## श्रीवृषभतीर्थंकरापासून महावीरापर्यंतचा काल.

श्रीवृषभनाथतीर्थंकर मोक्षास गेल्यानंतर ५० लाख कोटी सागर वर्षांनीं अजितनाथ झाले. त्यानंतर ३० लाख कोटीसागर वर्षांनीं शंभवनाथ झाले. त्यानंतर १० लाख कोटीसागर वर्षांनीं अभिनंदन झाले. त्यानंतर ९ लाख कोटीसागर वर्षांनीं सुमतिनाथ झाले. त्यानंतर ९० हजार कोटीसागर वर्षांनीं पद्मप्रभ झाले. त्यांच्या नंतर ९ हजार कोटी वर्षांनीं सुपार्श्वनाथ झाले. त्यांच्या नंतर ९०० कोटीसागर

वर्षांनीं चंद्रप्रभ झाले. त्यांच्या नंतर ९० कोटी सागर वर्षांनीं पुष्पदंत झाले. त्यानंतर ९ कोटी सागर वर्षांनीं शीतलनाथ झाले. त्यानंतर १०० सागरवर्षें कमी एक कोटी सागर वर्षांनीं श्रेयांसनाथ झाले. त्यानंतर ५४ सागर वर्षांनीं वासुपूज्य झाले. त्यानंतर ३० सागर वर्षांनीं विमलनाथ झाले. त्यांच्या नंतर ९ सागर वर्षांनीं अनंतनाथ झाले. त्यांच्या नंतर ४ सागर वर्षांनीं धर्मनाथ झाले. त्यानंतर ३ सागर वर्षांत पाऊण पल्य कमी असतां शांतिनाथ झाले. त्यांच्या नंतर अर्ध-पल्य वर्षांनीं कुंथुनाथ झाले. त्यांच्या नंतर ६ हजार कोटी वर्षें कमी पाव पल्य वर्षें गेल्यावर अरनाथ झाले. अरतीर्थंकर होऊन गेल्यानंतर हजार कोटी वर्षांनीं मल्लिनाथ तीर्थंकर झाले. त्यानंतर ५४ लाख वर्षांनीं मुनिसुव्रत तीर्थंकर झाले. त्यानंतर ६ लाख वर्षांनीं नमिनाथ झाले. त्यानंतर ५ लाख वर्षांनीं नेमिनाथ झाले. त्यानंतर ८३७५० वर्षांनीं पार्श्वनाथ झाले. त्यानंतर २५० वर्षांनीं वर्द्धमान ( महावीर ) झाले आणि महावीरस्वामी होऊन आज ( शालिवाहन शके १८३९ सालीं ) २४४३ वर्षें झालीं. *

विसाव्या तीर्थंकरांच्या वेळीं अर्थात् मुनिसुव्रत तीर्थंकर ज्या-कालीं झाले, त्या कालीं राम, लक्ष्मण, हनुमान, रावण वगैरे महा-पुरुष होऊन गेले. अर्थात् जैन-धर्माच्या दृष्टीनें महावीर निर्वाण शकापूर्वी ११९५१७२ व्या वर्षी ( या सुमारास ) राम-रावण वगैरे होऊन गेले असें ह्मटलें पाहिजे.

नऊ नारायणांपैकीं शेवटचे श्रीकृष्ण यांचे श्रीनेमिनाथ तीर्थंकर हे वडील ( चुलत ) बंधु असल्यानें आणि कृष्णाच्या वेळींच पांच पांडव व शंभर कौरव उदयास आल्यानें जैन-धर्माच्या दृष्टीनें वीर-

* वर प्रत्येक तीर्थंकरामधील जो काल आंकड्यांनीं सांगण्यांत आला आहे, तो पूर्वीच्या तीर्थंकरांच्या मोक्षगमनापासून पुढील तीर्थंकरांच्या जन्मापर्यंतचा अंतर ( मधील ) काल जाणावा.

निर्वाण शकापूर्वी (सुमारें) ८४१७२ व्या वर्षी कौरव-पांडव वगैरे होऊन गेले असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

श्रीमहावीरस्वामींचा काल झाल्यानंतर तीन वर्षे साडेआठ महिन्यांनीं पंचमकालास अर्थात् दुःषमाकालास आरंभ झाला.

# वीरनिर्वाणापासून सुमारें ७०० वर्षांपर्यंतचा काल.

## सामान्यकेवली.

तीर्थंकरपदवीशिवाय तपश्चरण करून जे मुक्त होतात ते सामान्यकेवली होत. असले सामान्य केवली चतुर्थकालांत पुष्कळ मुक्त झाले. महावीरस्वामींच्या निर्वाणानंतर **गौतम, सुधर्मा** आणि **जंबुस्वामी** हे **सामान्यकेवली** होऊन मोक्षास गेले. त्यानंतर **नंदिमित्र, अपराजित, विष्णुमुनि, गोवर्धन** आणि **भद्रबाहु** हे पांच मुनि **श्रुतकेवली** * झाले. या सर्वांचा काल पंचमकालास आरंभ झाल्यापासून १६२ वर्षांचा होता. ह्मणजे महावीर शक १६५ चा होता, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मात्र सामान्यकेवली ६२ वर्षांच्या आंत होऊन गेले आहेत. त्यानंतर १०० वर्षांत श्रुतकेवली झाले. त्यानंतर १८३ वर्षांत अकरा अंग आणि दशपूर्व शास्त्र धारण करणारे ११ महात्मे होऊन गेले त्यांचीं नावें खालीलप्रमाणें:—

**१ विशाखदत्त, २ प्रौष्ठिल, ३ क्षत्रिय, ४ जयसेन, ५ नागसेन ६ सिद्धार्थ, ७ धृतिषेण, ८ विजयसेन, ९ बुद्धिमान, १० गंगदेव, ११ धर्मसेन.**

* द्वादशांग वाणीचें जे पूर्ण ज्ञान प्राप्त करून घेतात त्यांना श्रुतकेवली अशी संज्ञा आहे.

हे असे महात्मे महावीर संवत् १६५ पासून ३४५ पावेतों होऊन गेले. त्यानंतर नक्षत्र, जयपाल, पांडु, द्रुमसेन आणि कंसाचार्य हे वीरसंवत् ३४५ ते ४६८ पर्यंत होऊन गेले. त्यानंतर सुभद्राचार्य, यशोभद्राचार्य, दुसरे भद्रबाहु, लोहाचार्य, अर्हद्बली आचार्य, माघनंदि आचार्य, धरसेनाचार्य, पुष्पदंताचार्य, भूतबली-आचार्य हे क्रमानें वीरसंवत् ४६८ पासून ६८३ वर्षांपर्यंत होऊन गेले. त्यानंतर वीरशक १८०० पावेतों आचार्य, सूरि, पंडित, कवि वगैरे पुष्कळ विद्वान् होऊन गेले; त्यांपैकीं कांहीं आचार्य, सूरि, महाकवि यांचीं नांवें व त्यांची माहिती याखालीं दिली आहे:—

## वीरनिर्वाण शक ५०० पासून १८०० पर्यंतचा काल.

१ **श्रीकुंदकुंदाचार्य** ( महावीर संवत् ४९७ ), २ **श्रीउमास्वामीआचार्य** ( म० सं० ५४६ ), ३ **श्रीसमंतभद्राचार्य** ( म० सं० ५९५ ), ४ **श्रीपूज्यपादाचार्य** ( म० सं० ८७० ), ५ **श्रीवसुनंदि** ( म० सं० १००६ ), ६ **श्रीवीरनंदिकवि** ( म० सं० १०२६ ), ७ **श्रीवादीभसिंह** (म० सं० ११२० ), ८ **श्रीनेमिचंद्रसिद्धांतचक्रवर्ति** (म० सं० १२०५), ९ **श्रीमानतुंगाचार्य** (म० सं० १२२६), १० **श्रीप्रभाचंद्राचार्य** (म० सं० १२७० ), ११ **श्रीअकलंकाचार्य** ( म० सं० १३२६ ), १२ **श्रीजिनसेनाचार्य** ( म० सं० १३४२ ), १३ **श्रीगुणभद्राचार्य** ( म० सं० १३४५ ), १४ **श्रीविद्यानंदिस्वामी** (म० सं० १३५१ ), १५ **श्रीसोमदेवसूरि** (म० सं० १३५१ ),

१६ श्रीवादिराजसूरि ( म० सं० १४१८ ), १७ श्रीअमृतचंद्राचार्य ( म० सं० १४३२ ), १८ श्रीमल्लिषेणाचार्य ( म० सं० १४३९ ), १९ श्रीइंद्रमुनि ( म० सं० १४६० ), २० अमितगतिसूरि ( म० सं० १४९५ ), २१ श्रीशुभचंद्राचार्य ( म० सं० १५२० ), २२ श्रीआशाधर पंडित ( म० सं० १७०५ ), २३ श्रीशाकटानाचार्य, २४ श्रीचंद्रसागर, २५ श्रीधनंजय कवि, २६ श्रीहरिचंद्र कवि.

## श्रीकुंदकुंदाचार्य.

कुंदकुंदाचार्य हे नंदिसंघापैकीं एक होते. त्यांचा जन्म वीरसंवत् ४९७ मध्यें माळव्यांत बुंदीकोटानजीक बारापूर संस्थानांत झाला. त्यांच्या मातापित्यांचीं नांवें अनुक्रमानें कुंदलता आणि कुंदश्रेष्ठी अशीं होतीं. कुंदकुंदाचार्यांचे वडील व्यापारी होते. तरी त्यावेळीं आजच्यासारखा जीवनकलह मात्र प्रबल नव्हता. त्यामुळें बहुतेक अध्यात्मिक ज्ञान शिकण्याकडे अगर शिकविण्याकडे लोकांचा कल होता. त्यावेळीं भारतवर्ष सुसंपन्न होता. शिकंदर बादशहाच्या स्वारीशिवाय त्याला कसलेंही दुःख माहीत नव्हतें. त्या लोकांचा सर्व काल ब्रह्मविद्या व आत्मविद्या यांतच जात असे. ह्मणून कुंदश्रेष्ठींनीं आपल्या मुलाला अध्यात्मशास्त्रांत प्रवीण केलें होतें. या आचार्यांनीं अध्यात्म विषयाचे सुमारें ५० ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं, अष्टपाहुड, समयसारप्राभृत, नियमसार, पंचास्तिकाय, प्रवचनसार, द्वादशानुप्रेक्षा वगैरे ग्रंथ उपलब्ध आहेत. कुंदकुंदाचार्यांनीं आपल्या मुनिसंघासह एकदां जुनागड प्रांतांतील गिरनार पर्वतावर जाऊन दिगंबरमताची थोरवी स्थापित केली होती. त्यांनीं आपल्या वयाच्या ३३ व्या वर्षीं जिनदीक्षा घेतली. हे आचार्य जिनचंद्रस्वामींचे शिष्य असून उमास्वामींचे गुरु होते.

# श्रीउमास्वामीआचार्य.

श्रीउमास्वामी हे नंदिसंघापैकीं होते. हे वि० सं० ७६ मध्यें होऊन गेले. त्यांनीं आपल्या वयाच्या १७ व्या वर्षींच दीक्षा घेऊन उत्तम प्रकारें शास्त्राभ्यास केला. गुजराथ प्रांतांत द्वैपायक नांवाचा एक सम्यग्दृष्टी श्रावक होता. तो शास्त्रवेत्ता असल्यानें त्याच्या मनांत मोक्षशास्त्रासंबंधीं एक ग्रंथ तयार करावा असें येऊन त्यानें एके दिवशीं आपल्या घराच्या खांबावर " **दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः** " असें सूत्र लिहून ठेविलें. एके दिवशीं उमास्वामी आचार्य हे भिक्षेकरितां सदर श्रावकाचे घरीं गेले होते. त्यांची दृष्टि त्या खांबाकडे गेली. त्यावर लिहिलेलीं अक्षरें नीट वाचून त्यांनीं त्या सूत्राच्या पाठीमागें " **सम्यक्** " हें पद जोडून दिलें. मात्र ही गोष्ट द्वैपायकाच्या परोक्ष घडली होती. पुढें स्वामी निघून गेले. द्वैपायकानें त्या खांबावर सुधारणा झालेली पाहून तो आपल्या पत्नीला विचारून मुनींच्या शोधार्थ निघाला. शेवटीं मुनींचा शोध लावून त्यांच्याजवळ जाऊन तो ह्मणाला, " मुनिराज ! आपणच मोक्षशास्त्र रचण्याला पात्र आहांत. तेव्हां कृपा करून आपण मोक्षशास्त्राची रचना करावी. " तेव्हां उमास्वामींनीं १० अध्यायांचें मोक्षशास्त्र रचिलें. त्याला " **तत्वार्थसूत्र** " असें ह्मणतात. हें तत्वार्थसूत्र-महाशास्त्र सर्व ठिकाणीं प्रसिद्ध झालें असून त्याच्या संस्कृत, मराठी आणि हिंदी या भाषांतून टीकाही प्रसिद्ध झाल्या आहेत. हल्लीं बहुतेक भाविक लोक, सदर मोक्षशास्त्राचा स्वाध्याय मोठ्या आवडीनें करितात. सध्यां यावरील सर्वार्थसिद्धि, राजवार्तिक व श्लोकवार्तिक या तीन टीका अत्यंत महत्वाच्या ह्मणून प्रसिद्ध आहेत.

# श्रीसमंतभद्राचार्य.

श्रीसमन्तभद्रस्वामी हे सेनगणापैकीं होते. हे इ० स० च्या

दुसऱ्या शतकांत होऊन गेले, असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे. पण ते वि० सं० १२५ मध्यें हयात होते, असाही कित्येकांचा कयास आहे. ते मूळचे दक्षिण देशांत कांची येथें राहणारे होते. पुढें त्यांना भस्मक रोग झाल्यानें त्याच्या शांतीकरितां वेषांतर करून उत्तर देशांत ते बरेच हिंडले. शेवटीं, काशी येथें शिवकोटी राजानें बांधिलेलें एक शिवमंदिर होतें तेथें ते गेले. त्या महादेवाच्या पिंडीस राजाकडून रोज पक्वान्नांचा बराच नैवेद्य येत होता तो देवास खावयास लावतो, असें सांगून हे वेषधारी योगी दार लावून आंत बसून सगळा स्वतःच खाऊं लागले! पुढें लौकरच त्यांचा भस्मक रोग कमी झाल्यामुळें नैवेद्य उरूं लागला. त्यामुळें राजाला संशय येऊन त्यानें त्याला विचारिलें कीं, "अशी लबाडी करूनही ज्या देवाच्या नांवावर तुला नैवेद्य खावयाला मिळत होता, त्या देवाला तूं नमस्कारही कां करीत नाहींस?" मुनीनें उत्तर दिलें—"राजा! माझा नमस्कार तुझ्या देवाला सहन व्हावयाचा नाहीं, तो मोठा रागीट आहे. मी नमस्कार केला तर तो फुटून जाईल!" तरी पण राजानें नमस्कार करण्याबद्दल आग्रह धरून मुनीला ह्मटलें कीं, "तूं उद्यां आमच्या महादेवाच्या पिंडीला नमस्कार घातला पाहिजेस; नाहीं तर मी तुझा शिरच्छेद करीन!" मुनीनें रात्रीं **स्वयंभुस्तोत्र** नांवाचें एक चोवीस तीर्थंकरांचें स्तोत्र रचिलें; तें बृहत्स्वयंभूस्तोत्र या नांवानें हल्लीं प्रसिद्ध आहे. सकाळीं ठरल्याप्रमाणें राजा व सर्व लोक जमले असतां त्यांच्या समक्ष तें स्तोत्र ह्मणत असतांना महादेवाची पिंडी फुटून त्यांतून नंदीश्वराचें चतुर्मुख बिंब वर आलें! हें पाहून राजाला मोठें आश्चर्य वाटून त्यानें जिनधर्माची दीक्षा घेतली. याच शिवकोटी मुनींनीं भगवती आराधना नामक प्राकृत भाषेंत मुनींच्या चारित्र-वर्णनपर अत्युत्तम ग्रंथ लिहिलेला प्रसिद्ध आहे. श्रीसमन्तभद्राचार्यांनीं पुन्हां प्रायश्चित्त घेऊन यथाविधि मुनींची दीक्षा घेतली आणि ते

जैन-धर्माचा प्रसार करीत हिंडूं लागले व तपःप्रभावानें सद्गति साधते झाले. श्रीसमन्तभद्राचार्य हे पुढें भविष्यत्काळीं तीर्थंकर होणार आहेत. त्यांनीं **गंधहस्तिमहाभाष्य** नांवाचा ८४ हजार श्लोकांचा ग्रंथ लिहिला आहे. तो उमास्वामीकृत तत्वार्थसूत्रावर भाष्यरूपानें आहे. सदर ग्रंथ फारच महत्वाचा आहे; पण तो अद्यापि कोठें उपलब्ध झाला नाहीं, ही गोष्ट मात्र अतिशय दिलगिरीची आहे. याशिवाय त्यांनीं **जिनशतकालंकार, विजयधवलटीका, युक्त्यनुशासन, स्वयंभूस्तोत्र, रत्नकरंड श्रावकाचार, जिनशतक, आप्तमीमांसा** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीपूज्यपादाचार्य.

देवचंद्र कवीच्या राजावली नामक ग्रंथावरून आणि श्रवणबेळगुळच्या शिलालेखावरून असें समजतें कीं, या पूज्यपादाचार्यमहात्म्यांचा, कर्नाटक प्रांतांतील कोलंगाल नांवाच्या गांवात ब्राह्मणकुलामध्यें विक्रमशकाच्या ४ थ्या शतकांत जन्म झाला होता. यांच्या पित्याचें नांव माधवभट्ट आणि मातेचें नांव श्रीदेवी असें होतें. त्यांनीं मुनि-आश्रम घेतला त्यावेळीं त्यांचें पहिलें नांव देवनंदी असें होतें. त्यांच्या कष्टतर तपश्चर्येनें त्यांचे डोळे गेले; पण ‘ वनवास ’ देशाच्या बंकापूर राजधानींत एक शांतिनाथाचें मंदिर होतें, तेथें जाऊन त्यांनीं दृढ भक्तीनें शांतिनाथाचें स्तोत्र केलें. त्यामुळें पुन्हां त्यांना पूर्ववत् दृष्टि प्राप्त झाली. त्यानंतर त्यांनीं नाना देश फिरून निरनिराळ्या ठिकाणीं धर्मोपदेश केला. त्यांच्या उपदेशाच्या प्रभावानें शेकडों प्रसिद्ध पुरुष त्यांचें शिष्य झाले. गंगकुलांतील दुर्विनीत राजा त्यांचा मुख्य शिष्य होता. पूज्यपादाचार्य तपश्चर्या करीत असतां वनदेवता येऊन त्यांच्या चरणाची पूजा करीत असत. त्यामुळें त्यांचें नांव पूज्यपाद असें पडलें असें सांगतात. त्यांच्या पादतीर्थानें

लोखंड देखील सोनें होत असे, अशी त्यांच्याबद्दल आख्यायिका आहे. त्यांनीं **जैनेंद्रव्याकरण, सर्वार्थसिद्धिटीका, शब्दावतार, समाधितंत्र, इष्टोपदेश** आणि इतर कांहीं वैद्यक ग्रंथहि लिहिले आहेत.

## श्रीवसुनंदि.

श्रीवसुनंदि हे नंदिसंघापैकीं होते. त्यांचा काल वि० सं० ५३६ चा होता. त्यांनीं **यत्याचार, प्रतिष्ठासार, श्रावकाचार** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## वीरनंदी महाकवि.

हे महाकवि नंदिसंघापैकीं असून त्यांचा काल वि० सं० ५५६ चा होता. त्यांनीं **आचारसार, चंद्रप्रभचरित** आणि **शिल्पसंहिता** असे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीवादीभसिंहकवि.

श्रीवादीभसिंह हे जैनयति असून पुष्पसेनमुनींचे ते शिष्य होते. त्यांचें मूळचें नांव '**ओडयदेव**' असें होतें. त्यावरून हे दाक्षिणात्य असावेत असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे. वि० सं० ६५० मध्यें हे होऊन गेले असा कित्येक ठिकाणीं उल्लेख आढळतो. त्यांनीं **क्षत्रचूडामणि, गद्यचिंतामणि** वगैरे ग्रंथ लिहिलेले आहेत.

## श्रीनेमिचंद्र ( सिद्धांतचक्रवर्ति ).

श्रीनेमिचंद्राचार्य हे नंदिसंघापैकीं एक असून अभयनंदी स्वामींचे ते शिष्य होते. हे वि० सं० ७३५ मध्यें द्रविडदेशस्थ मथुरा ( मधुरा ) नगरींत रहात होते. त्यावेळीं दाक्षिण मथुरेचा राजा गंगवंशतिलक श्रीराजमल्ल हा असून, त्याचा प्रधान श्रीचामुंडराय

हा होता. त्या दोघांनाही हे नेमिचंद्राचार्य पूज्य आणि वंद्य असे होते. श्रीराजमल्लांनीं त्यांच्या गुणावर लुब्ध होऊन त्यांना **सिद्धांत-चक्रवर्ती** ही पदवी दिली होती. या आचार्यांनीं **गोमट्टसार, त्रैलोक्यसार, लब्धिसार, क्षपणसार** आणि **द्रव्यसंग्रह** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत. यांतून गोमट्टसार हा ग्रंथ जीव आणि कर्म-मीमांसा या दृष्टीनें सांप्रतकालीं अत्यंत महत्ताचा गणला जात आहे.

## श्रीमानतुंगाचार्य.

श्रीमानतुंगाचार्य हे माळवा प्रांतांतील उज्जयनी नगरींत भोज राजाच्या वेळीं असलेल्या बाण आणि मयूर कवींचे समकालीन होते. खिस्तशकाच्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत ह्मणजे इ० स० ७००–७५० वर्षांच्या अवधींत बाणभट्ट होऊन गेले. परंतु भोज-राजाचा काल खि० शकाच्या ११ व्या शतकांत होता, असेंहि कित्येकांचें मत आहे. मानतुंगाचार्यांची अलौकिक चमत्काराबद्दल प्रसिद्धि होती. त्यांची एकदां परीक्षा पाहण्याकरितां राजानें मान-तुंगांच्या हातापायांत ४८ बेड्या अडकवून त्यांस एका तळघराच्या खोलींत नेऊन ठेविलें. तेथें त्यांनीं श्रीजिनेश्वराला उद्देशून भक्तिपुरःसर **भक्तामरस्तोत्रा**ची रचना केली. त्यावेळीं हातापायांतल्या सर्व बेड्या आपोआप तुटून ते मोकळे झाले! अशा आशयाचा एक श्लोक या भक्तामरस्तोत्रांत ग्रथित केला आहे, तो असाः—

**आपादकंठमुरुशृंखलवेष्टितांगा ।**
**गाढं बृहन्निगडकोटिनिघृष्टजंघाः ॥**
**त्वन्नाममंत्रमनिशं मनुजः स्मरंतः ।**
**सद्यः स्वयं विगतबंधभयाभवन्ति ॥ ४६ ॥**

**अर्थः**—हे परमेश्वरा! ज्याच्या पायापासून गळ्यापर्यंत सर्व शरीर लोखंडाच्या सांखळीनें बळकट बांधलें गेलें आहे आणि

मोठमोठ्या बेड्यांनीं ज्याच्या जंघा घासत आहेत, तो मनुष्य आपल्या पवित्र नामस्मरणानें तात्काळ बंधमुक्त होतो!

श्रीमानतुंगाचार्यांनीं भक्तामराशिवाय लिहिलेले दुसरे ग्रंथ उपलब्ध नाहींत.

## श्रीप्रभाचंद्राचार्य.

श्रीप्रभाचंद्राचार्य हे धारानिवासी भोज राजाच्या वेळीं होऊन गेले. श्रीगोपनंदी हे त्यांचे सहाध्यायी होते. हे आचार्य इ० स० च्या ८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेले. त्यांनीं **प्रमेयकमल-मार्तंड, राजमार्तंड, न्यायकुमुदचंद्रोदय** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

प्रभाचंद्र या नांवाचे एक भट्टारकही वि० सं० १३१६ मध्यें फिरोजशहाच्या वेळीं होऊन गेले; त्यांनीं ५० ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत.

## श्रीअकलंकाचार्य.

श्रीअकलंकाचार्य हे देवसंघापैकीं होते. खेट नांवाच्या नगरांत शुभतुंग राजाचा प्रधान पुरुषोत्तम नामक होता. त्याला अकलंक आणि निष्कलंक असे दोन पुत्र होते. त्या दोघांनीं ब्रह्मचर्यव्रत पाळून जैनशास्त्राचा अभ्यास चांगला केला होता. त्यावेळीं बौद्ध-धर्म प्रबळ होऊन राजे लोकही बौद्धांचे अनुयायी झाले होते. अशा वेळीं बौद्धशास्त्राचा अभ्यास करून त्यांच्या मताचा पराभव करावा, असें त्या दोघांच्या मनांत येऊन एका बौद्धशाळेंत ते दोघे बौद्ध वेषानें राहिले. एकदां बौद्धगुरु जैनशास्त्रांतील सप्तभंगीचें व्याख्यान करीत होते. त्यावेळीं पुस्तकांत कोठें अशुद्ध पाठ राहिला होता म्हणून त्याचा अर्थ त्यांस बरोबर लागेना. तेव्हां तें व्याख्यान कर-

ण्याचें बंद ठेवून ते कोठें बाहेर गेले. ही संधी साधून अकलंकानें त्यांना न कळत त्या वाक्याची सुधारणा केली. यावरून बौद्धवेषानें कोणी-तरी जैन आपलें शास्त्र शिकण्याकरितां येथें आला आहे, अशी त्या गुरूला शंका आली. हें जाणून त्या बौद्ध गुरूंनीं राजाला कळवून त्याच्याकडून त्याचा वध करविण्याचा निश्चय केला. हें कळल्या-बरोबर त्या दोघांनीं पलायन केलें. पण त्यांपैकीं अकलंकाचा बचाव होऊन निष्कलंक मारला गेला. पुढें अकलंकांनीं **हिमशीतल** राजाच्या सभेंत जाऊन, बौद्धांच्या गुरूबरोबर वाद केला आणि त्यांस जिंकिलें. हें पाहून हिमशीतल राजानें बौद्धधर्म सोडून देऊन बौद्धलोकांना हद्दपार केलें. त्या राजाची राणी जैन होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राजानें बौद्धांना हद्दपार केल्यानंतर ते लोक लंकेकडे जाऊन राहिले. ही गोष्ट इ० स० ८०० मध्यें घडली. याच्या पूर्वी बौद्धलोक बनारसकडून कांची देशांत इ० स० च्या तिसऱ्या शतकांत आले होते. कांची देशांत सतत ५०० वर्षें बौद्धधर्म चालू होता. पण त्याचा सर्वथा नाश अकलंकानें केला. श्रीअकलंकाचार्यांनीं **चूर्णी, महाचूर्णी, चूलिका, राजवार्तिक, अष्टशती, न्यायविनिश्चयालंकार, अकलंकस्तोत्र** असे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीजिनसेनाचार्य.

श्रीजिनसेनाचार्य हे वीरसेनांचे शिष्य असून मलखेडचा राजा अमोघवर्ष यांचे गुरु होते. वि० सं० ८७२ मध्यें अमोघवर्षाचा राज्याभिषेक झाला. यावरून हाच श्रीजिनसेनचार्यांचा काल होय, हें

उघड आहे. त्यांनीं कालिदासकृत मेघदूत काव्याचें एक चरण आणि आपण रचिलेलीं तीन चरणें अशी समस्यापूर्ती करून '**पार्श्वाभ्युदयकाव्य**' लिहिलें आहे. ( याबद्दल साग्र माहिती अमोघवर्ष राजाच्या हकीकतींत आली आहे. ) त्यांनीं **आदिपुराणाचे** दहा हजार श्लोक लिहिले आहेत. पुढें त्यांचे शिष्य श्रीगुणभद्राचार्य यांनीं दहा हजार श्लोक लिहून **उत्तरपुराण** तयार केलें आहे. या दोन्हींसही मिळून **महापुराण** असें ह्मणतात. हा अपूर्व काव्य ग्रंथ आहे.

## श्रीगुणभद्राचार्य.

श्रीगुणभद्राचार्य हे महापुराणकर्ते श्रीजिनसेन आचार्य यांचे शिष्य होते. अमोघवर्ष राजाच्या कारकीर्दींत गुणभद्राचार्यांचेंही अस्तित्व होतें. त्यांनीं धारवाड प्रांतांतील बंकापूर नगरींत अमोघवर्षाचा पुत्र कृष्णराज हा राज्य करीत असतां उत्तरपुराणाची रचना केली. त्यांनीं **उत्तरपुराण, आत्मानुशासन, भावसंग्रह** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीविद्यानंदिआचार्य अथवा पात्रकेसरी.

श्रीविद्यानंदिस्वामी हे दक्षिण कर्नाटक प्रांतांत राहत असून ते मूळ वेदानुयायी होते. त्यावेळीं त्यांना 'पात्रकेसरी' असें ह्मणत. ते ज्या राजधानींत राहत होते तीमध्यें एक पार्श्वनाथाचें जिनमंदिर होतें. एके दिवशीं श्रीविद्यानंदि प्रभृति विद्वान् मंडळी तें मंदिर पाहण्याकरितां त्या मंदिरामध्यें आली. त्यावेळीं तेथें एक परम योगी जिनेश्वरापुढें **देवागमस्तोत्र** ह्मणत बसला होता. तें स्तोत्र सदर आचार्यास फार महत्वाचें वाटून तो तें स्तोत्र पुरें होईपर्यंत राहिला.

पण तेवढ्यानें त्याची तृप्ति न होतां तें स्तोत्र त्यास पुन्हां ह्मणावयास लाविलें. तें ऐकून त्यास जैनांच्या तत्वज्ञानाबद्दल विशेष आश्चर्य वाटून त्यानें जैन-धर्माची दीक्षा घेतली व जैन-शास्त्राचें अध्ययन केलें. त्यानंतर त्यांनीं कर्नाटक प्रांतांतील राजे लोकांच्या दरबारांत ब्राह्मण आणि बौद्धधर्मीयांबरोबर वाद करून जयपत्रेंहि मिळविलीं होतीं, असें प्राचीन शिलालेखांवरून व कांहीं ग्रंथांवरून समजतें. आद्य शंकराचार्य व मंडनमिश्र ज्या कालीं होऊन गेले त्याच कालीं हे आचार्य होते. यां आचार्यांनीं वि० सं० ८८१ मध्यें आप्तपरीक्षा नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांनीं **विद्यानंदमहोदय, अष्टसहस्री, प्रमाणपरीक्षा, प्रमाणनिर्णय, तर्कपरीक्षा, आप्तपरीक्षा** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीसोमदेवसूरि.

हे वि० सं० ८८१ मध्यें होऊन गेले. त्यांनीं **यशस्तिलकचंपू, नीतिवाक्यामृत, अध्यात्मतरंगिणी** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीवादिराजसूरि.

हे सूरि ( आचार्य ) नंदिसंघापैकीं होते. त्यांना **षट्तर्कषण्मुख, स्याद्वादविद्यापति, जगदेकमल्लवादी** अशा पदव्या होत्या. त्यांचें अस्तित्व वि० सं० ९४८ मध्यें होतें. त्या कालीं चालुक्य वंशांतील जयसिंह राजा होऊन गेला. वादिराजांना एकदां कुष्टरोग झाला होता; पण त्यांनीं भक्तिपूर्वक **एकीभावस्तोत्रा**ची रचना केल्यामुळें त्यांचा तो रोग नाहींसा झाला, अशी आख्यायिका आहे. त्यांनीं या स्तोत्रांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे कीं,—

प्रागेवेह त्रिदिवभवनादेष्यता भव्यपुण्यात् ।
पृथ्वीचक्रं कनकमयतां देव निन्ये त्वयेदम् ॥
ध्यानद्वारं मम रुचिकरं स्वांतगेहं प्रविष्ट ।
स्तत्किं चित्रं जिनवपुरिदं यत्सुवर्णीकरोषि ॥ ४ ॥

**अर्थः**—हे भगवन्! ज्याअर्थी स्वर्गलोकांतून मातेच्या गर्भात सहा महिने येण्याच्या अगोदरच तूं पृथ्वीला सुवर्णमयी करून टाकिलेंस त्या अर्थी ध्यानद्वारानें माझ्या अंतःकरणरूपीं घरांत तूं प्रवेश केल्यावर, माझें शरीर सुवर्णमय करून टाकशील यांत काय आश्चर्य आहे?

वादिराजसूरींच्या या प्रार्थनेवरून त्यांच्या शरीरांत कुष्टरोग अवश्य झालेला असला पाहिजे आणि तो नाहींसा करण्याचीही त्यांची इच्छा होती, असें खास अनुमान निघतें.

वादिराजसूरि हे दिग्गज विद्वान् होते. त्यांनीं लिहिलेल्या फक्त पुढील चारच ग्रंथांचा पत्ता लागतो. **एकीभावस्तोत्र, यशोधरचरित्र, पार्श्वनाथचरित्र** आणि **काकुत्स्थचरित्र.** यांपैकीं एकीभावस्तोत्र २५ श्लोकांचें असून त्याचा सर्वत्र प्रसार झाला आहे.

## श्रीअमृतचंद्राचार्य.

हे वि० सं० ९६२ मध्यें होऊन गेले. त्यांनीं **समयसार, पंचास्तिकाय** आणि **प्रवचनसार** या तीन अध्यात्मिक ग्रंथांच्या संस्कृत टीका लिहिल्या असून, **तत्त्वार्थसार, पुरुषार्थसिध्द्युपाय, समयसारकलशा** इत्यादि ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीमल्लिषेणाचार्य.

श्रीमल्लिषेणाचार्यांनीं वि० सं० ९६९ सालीं ज्येष्ठ शु० ५ स गुळगुंद नांवाच्या गांवांत महापुराण लिहून संपविलें, असा एके ठिकाणीं

उल्लेख आहे. यावरून त्या कालांत मल्लिषेणाचार्यांचें अस्तित्व होतें, असें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं. मुळगुंद हा गांव धारवाड जिल्ह्यापैकीं गदग तालुक्यांत आहे. आपण जिनसेनसूरींचे पुत्र आहोंत, असें त्यांनीं आपल्या ग्रंथांत ह्मटलें आहे. यांनीं केलेलें महापुराण हें श्रीजिनसेनाचार्यांच्या महापुराणाहून मात्र वेगळें आहे त्यांना "**उभयभाषाकविचक्रवर्ति**" अशी पदवी होती. त्यांनीं **महापुराण, नागकुमारकाव्य** आणि **सज्जनचित्तवल्लभ** असे ग्रंथ तयार केलेले आढळतात.

## श्रीइंद्रनंदिमुनि.

श्रीइंद्रनंदि हे नंदिसंघापैकीं एक होते. वि० सं० ९९० मध्यें त्यांनीं **प्रतिष्ठापाठ, औषधीकल्प, शांतिचक्रपूजा** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीअमितगतिसूरि.

श्रीअमितगतिसूरि यांचा जन्म वि० सं० १०२५ मध्यें झालेला असावा, असें कांहीं ग्रंथांवरून अनुमान निघतें. वि० सं० १०५० मध्यें त्यांनीं **सुभाषितरत्नसंदोहनामक** ग्रंथ तयार केला. अमितगतीचे गुरु माधवसेन हे होते. या आचार्यांच्या वेळीं मुंजराजा राज्य करीत होता. चरित्रनायकांनीं वि० सं० १०७० मध्यें एक **धर्मपरीक्षा** नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. तो हल्लीं मराठी भाषेंत प्रसिद्ध होऊन त्यांतील मनोवेग आणि पवनवेग यांच्या गोष्टी बहुतेक जैन लोकांना ठाऊक झाल्या आहेत. त्यांनीं **श्रावकाचार, पंचसंग्रह, जंबुद्वीपप्रज्ञप्ति** वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## श्रीशुभचंद्राचार्य.

श्रीशुभचंद्राचार्य हे परमारवंशावतंस मुंजराजाच्या वेळीं होऊन गेले. मुंजराजे हे वि० सं० १०५० पासून १०७८ पर्यंत राज्य

करीत होते. हे आचार्य राजकुलीन असून त्या मुंजराजाचेच हे पुतणे होते, असें ह्मणण्यास कांहीं ठिकाणीं आधार मिळतो. प्रसिद्ध कवि भर्तृहरि हे या आचार्यांचे बंधु होते असेंही अलीकडे प्रसिद्ध झालें आहे. राज्यतृष्णेला आतुर झालेल्या मुंज राजानें शुभचंद्राला आणि भर्तृहरीला मारण्याचा निश्चय केला, हें जाणून त्या दोघां बंधूंनीं राज्यावर लाथ मारून दीक्षा घेतली. त्यांपैकीं भर्तृहरीनें मिथ्या तपश्चर्या करण्यास आरंभ केला आणि शुभचंद्राचार्यानें जिनदीक्षा घेऊन कर्मक्षय करण्यास प्रारंभ केला. कांहीं वर्षांनीं भर्तृहरीला पश्चाताप होऊन त्यानें पुन्हां जिनदीक्षा घेतली. शुभचंद्राचार्य योगी झाल्यानंतर त्यांनीं **ज्ञानार्णव** नांवाचा महाग्रंथ आपल्या भावास उपदेश देण्याच्या इराद्यानें लिहिला आहे.

## श्रीआशाधरपंडित.

श्रीआशाधरांचा जन्म सपादलक्ष देशांतील मंडलक नांवाच्या नगरांत झाला होता. त्यांच्या पित्याचें नांव सल्लक्षण आणि मातेचें नांव श्रीरत्ना असें होतें. आपल्या देशभाषेंत सपाद लक्षास सव्वा लाख असें ह्मणतात. आशाधरांचा एक पुत्र तत्कालीन धारानगरीच्या अर्जुनदेव राजाच्या पदरीं होता. आशाधरांचा जन्म वि० सं० १२३५ मध्यें झाला असावा असें अनुमान आहे. गिझनीचा बादशहा शहाबुद्दीन यानें सपादलक्ष देशाला व्यापून टाकल्यामुळें त्याच्या अत्याचाराच्या भीतीनें आशाधरपंडित हे माळवा प्रांतांतील धारानगरींत येऊन राहिले होते. त्यांनीं **धर्मामृत** नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. याचे सागार व अनागार असे दोन भाग आहेत. याशिवाय त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर **प्रतिष्ठापाठ** वगैरे सुमारें ४० ग्रंथ लिहिले आहेत.

# श्रीशाकटायनाचार्य.

श्रीशाकटायनाचार्य हे केव्हां होऊन गेले, याचा अद्यापि योग्य निर्णय होत नाहीं. तथापि स्थूल अनुमानानें हे पाणिनीच्या अगोदर झाले आहेत, असें कित्येकांचें मत आहे. त्यांनीं '**शब्दानुशासन**' नांवाचा व्याकरणशास्त्राचा एकच ग्रंथ तयार केलेला आढळतो. सदर शाकटायन व्याकरण फार सरस असून सुलभ आहे. **कौमुदी**पेक्षां यांत सूत्र रचना कमी असून अर्थपूर्णता आहे.

# श्रीचंद्रसागर.

श्रीचंद्रसागर हे ब्रह्मचारी होते. ह्यांनीं **पांडवपुराण** ( श्लोक ५००० ), **रामायण** ( श्लोक ५००० ) व **नागकुमार**-षट्पदी संस्कृत व कर्नाटकमिश्र ( श्लोक ६००० ) याप्रमाणें ग्रंथ तयार केले आहेत.

# श्रीधनंजयकवि.

हे धनंजयकवि भोजराजाचे समकालीन होते. एकदां यांच्या पुत्रास सर्पदंश झाल्यामुळें तो अरण्यांत व्याकूळ होऊन पडला होता, ही बातमी धनंजयास समजल्याबरोबर ते अरण्यांत न जातां चैत्यालयांत जाऊन भक्तिपूर्वक त्यांनीं **विषापहार** स्तोत्र केलें. त्यामुळें तें विष उतरून त्यांचा पुत्र घरीं परत आला, अशी विषापहार स्तोत्राची आख्यायिका आहे. धनंजयाची बहीण, अमरसिंह नामक बौद्धाला दिली होती अशीहि एक दंतकथा आहे. या कवींनीं **धनंजयनाममाला, द्विसंधानकाव्य, विषापहारस्तोत्र, वैद्यकनिघंटु** ( ५००० श्लोक ) असे ग्रंथ लिहिले आहेत.

## हरिचंद्र महाकवि.

श्रीहरिचंद्र या नांवाचे दोन तीन ग्रंथकार झाले असल्यामुळें त्यांचा कालनिर्णय अद्यापि होत नाहीं. तरी बाणकवीपेक्षां हे प्राचीन आहेत, असा कित्येक विद्वानांचा तर्क आहे. त्यांच्या पित्याचें नांव 'आर्द्रदेव' असें होतें. त्यांनीं **धर्मशर्माभ्युदयमहाकाव्य, जीवंधरचंपू** आणि **पुरुदेवचंपू** अशीं तीन काव्यें लिहिलीं आहेत.

याशिवाय महावीर शक ५०० वर्षांपासून सुमारें १८०० वर्षांपर्यंत, काव्य, चंपू, नाटक, न्याय, व्याकरण, धर्मशास्त्र, ज्योतिष, गणित, इतिहास, वैद्यक, अलंकार, तत्वार्थशास्त्र वगैरे विषयांवर ग्रंथ लिहिणारे कवि, महापंडित, सूरि, स्वामी, आचार्य वगैरे पुष्कळ संस्कृत दिग्गज विद्वान् होऊन गेलेआहेत.*

* या चौथ्या भागांतील माहिती निरनिराळ्या हिंदी आणि संस्कृत पुस्तकांवरून घेतली आहे.

# भाग ५ वा.

## वीरनिर्वाण संवत् १४०० पासून २४०० पर्यंतचा काल.

### कर्नाटक जैनकवि व त्यांची माहिती.

१ आदिपंप ( महावीर शक १४२८ ), २ नयसेन (म० श० १६२६ ), ३ कंति (स्त्री) (म० श० १६२६ ),

**४ राजादित्य** (म० श० १६३०), **५ उदयादित्य** (म० श० १६७६), **६ वालचंद्र** (म० श० १६९६), **७ कोशियण्ण** (म० श० १७२६), **८ जन्न** (म० श० १७३५), **९ नागराज** (म० श० १८५७), **१० केशववर्णी** (म० श० १८८५), **११ बोप्पण्ण, १२ कविपरमेष्ठी, १३ नागार्जुन.**

## आदिपंप.

इ० स० ९०२ मध्यें या कवींचा ब्राह्मणकुलांत जन्म झाला. हे पूर्वी वेदानुयायी होते. पाठीमागून ते जैनधर्माचे उपासक बनले. चालुक्य-वंशोद्भव **अरिकेसरी** यांच्या दरबारांत हे कवि आणि सेनापति होते. कानडी भाषेचे हे श्रेष्ठ कवि समजले जातात. त्यांनीं **भारतचंपू** आणि **आदिपुराण** असे दोन ग्रंथ तयार केलेले उपलब्ध आहेत. भारतचंपूचे १४ आश्वास आहेत. त्यांत पांडवांच्या जन्मापासून कौरवांच्या वधापर्यंत त्यांनीं कथा लिहिली आहे. हा ग्रंथ सर्वोत्कृष्ट झाला असल्यानें अरिकेसरी राजानें प्रसन्न होऊन धर्मपूर हा गांव त्यांना बक्षिस दिला होता. त्यांना कवितागुणार्णव, पुराणकवि, सरस्वतीमणिहार, संसारसारोदय वगैरे उपनांवें होतीं.

## नयसेन.

हे कवि इ० स० च्या ११ व्या शतकाच्या पूर्वार्धांत मुळगुंद नांवाच्या तीर्थस्थानांत होऊन गेले. हे त्रैविद्यचक्रवर्ती नरेंद्रसेनसूरीचे शिष्य होते. नरेंद्रसेन हे मोठे प्रभावशाली विद्वान् होते. चालुक्यवंशीय भुवनैकमल्ल (सन् १०६९) राजे हे त्यांची सेवा करीत होते. नयसेनांनीं तयार केलेले दोन ग्रंथ उपलब्ध आहेत ते (१) कर्नाटक भाषेचें व्याकरण आणि (२) धर्मामृत हे होत. त्यांच्या

पश्चात् झालेल्या कवींनीं त्यांना " सुकविनिकरपिकमाकंद " व " सुकविजनमन:सरोजराजहंस " अशीं विशेषणें देऊन त्यांची स्तुति केली आहे.

## कंति ( स्त्री ).

ही स्त्री कवि होती. तिची कविता मनोहर असे. कानडी साहित्यामध्यें तिच्या अगोदर कोणी स्त्री कवि झाली नव्हती. देवचंद्र कवीच्या एका लेखावरून ती छंद, अलंकार, काव्य, कोश, व्याकरण वगैरे ग्रंथांमध्यें कुशल होती असें समजतें. बाहुबली नांवाच्या एका कवीनें आपल्या नागकुमार चरित्राच्या एका पद्यांत तिची प्रशंसा केली आहे आणि तिला " **अभिनव वाग्देवी** " असें ह्मटलें आहे. ती एका राजमंत्र्याची नात होती. तिचा समय अभिनवपंपाच्या समकालीन होता. अभिनवपंप हे जवळ जवळ इ० स० च्या ११ व्या शतकांत होऊन गेले. अभिनवपंपाला, कंतीनें आपली स्तुती करावी असें फार वाटत असें. पण ती ह्मणत असे कीं; ' मी कधींही आपली स्तुती करणार नाहीं. ' अभिनवपंपाचा आणि तिचा नेहमी संवाद होत असे. एके दिवशीं अभिनवपंपानें मेल्याचें सोंग घेऊन, 'अभिनवपंप स्वर्गस्थ झाला' अशी तिला बातमी कळविण्यास एकाला सांगितलें. ती बातमी ऐकून तिनें मोठा आक्रांत करून अभिनवपंपाची हृदयद्रावक रीतीनें स्तुती केली ! पाठीमागून, हें सोंग आहे असें कळल्यावर त्या दोघांनाही मोठा आनंद झाला !!

## राजादित्य.

विष्णुवर्धन राजानें इ० स० ११०४ पासून ११४१ पर्यंत राज्य केलें. या राजाच्या कारकीर्दींत राजादित्य हा त्याच्या दरबारचा पंडित होता. त्यास " पद्यविद्याधर " असेंही ह्मणत असत. त्याच्या

पित्याचें नांव श्रीपति आणि मातेचें नांव वसंता असें होतें. कोंडि-मंडलाच्या 'पूविन बाग' या ठिकाणीं त्याचा जन्म झाला होता. त्यानें गणित शास्त्रावर पुष्कळ ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचीं कांहीं नांवें–व्यवहारगणित, क्षेत्रगणित, व्यवहाररत्न, चित्रहुसगे, लीला-वती वगैरे.

## उदयादित्य.

उदयादित्य कवीस 'साहित्यविद्याधर,' 'राजसुकविविद्या-भरण,' 'कविरत्नशेखर' वगैरे पदव्या होत्या. यांचा अस्तित्वकाल इ० स० ११५० हा असून यांनीं उदयादित्य या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे.

## बालचंद्र.

बालचंद्र (इ० स० ११७०) हे मूलसंघ-देशीयगण-पुस्तक-गच्छ यांमधील असून ते कुंदकुंदांचे अन्वयी (अनुयायी) होते. त्यांच्या गुरूंचें नांव नयकीर्ति असें होतें. दमनंदी या नांवाचे त्यांना एक बंधु होते. त्यांनीं लिहिलेले ग्रंथ–समयसार, प्रवचनसार, पंचास्तिकाय, परमात्मप्रकाश इत्यादि होत.

## कोशियण्ण.

हे कवि इ० स० च्या बाराव्या शतकांत होऊन गेले. यांनीं 'सिंहप्रायोपगमन' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे, असें पार्श्वपुराणा-वरून समजतें.

## जन्न.

ह्या कवींचा जन्म कम्मे नांवाच्या वंशांत (इ० स० १२०९) झाला होता. त्यांच्या पित्याचें नांव शंकर आणि मातेचें नांव गंगादेवी

असें होतें. त्यांनीं यशोधर चरित्र, अनंतनाथपुराण आणि स्मरतंत्र असे तीन ग्रंथ लिहिले आहेत.

## नागराज.

नागराज ( इ० स० १३३१ ) हे कौशिक गोत्री होते. सेचेंबपुरनिवासी विवेकविठ्ठलदेव हे त्यांचे पिते, भागीरथी ही माता, तिप्परस हा बंधु आणि अनंतवीर्य हे गुरु होते. त्यांनीं लिहिलेला पुण्याश्रवचंपु नांवाचा ग्रंथ उपलब्ध आहे. या ग्रंथाच्या प्रस्तावनेवरून त्यांना ' सुललितकविताकल्प, ' ' वल्लीवसंत, ' ' भारतीभालनेत्र, ' ' सरस्वतीमुखतिलक ' वगैरे पदव्या होत्या, असें दिसतें.

## केशववर्णी.

केशववर्णी ( इ० स० १३५९ ) हे अभयचंद्र सिद्धांत चक्रवर्तीचे शिष्य होते. त्यांनीं केलेल्या पुढील दोन कानडी टीका प्रसिद्ध आहेत. १ अमितगति श्रावकाचारवृत्ति व २ गोमट्टसारवृत्ति.

## बोप्पण्ण.

बोप्पण्ण यांचें सुजनोत्तंस असें उपनांव होतें. यांच्यानंतर होणाऱ्या अच्चण, पार्श्व वगैरे पुष्कळ कर्त्यांनीं त्यांची अनेक ठिकाणीं स्तुती केली आहे. यावरून ते अनेक ग्रंथ लिहिणारे असावेत. हल्लीं त्यांनीं लिहिलेलीं **गोमटेश्वरस्तुति** आणि **निर्वाणलक्ष्मीपतीनक्षत्रमालिका** अशीं दोन प्रकरणें उपलब्ध आहेत.

## कविपरमेष्ठी.

या कर्त्यांचा जीवनकाल अनिश्चित आहे; तथापि कानडी भाषेचे सुप्रसिद्ध कवि आदिपंप यांनीं त्यांची प्रशंसा केली आहे. आदिपुराणाचे कर्ते श्रीजिनसेनस्वामी यांनीं त्यांची स्तुती करून

" वागर्थसंग्रह " पुराणाचा कर्ता असें त्यांना ह्मटलें आहे. " कवि-परमेश्वर " असेंही त्यांचें नामान्तर कोठें कोठें दिसून येतें. त्यांनीं तयार केलेल्या एका गद्य ग्रंथावरून जिनसेन स्वामींनीं आदिपुराण ग्रंथाची रचना केली आहे.

## नागार्जुन.

हे कवि वैद्यशास्त्रांत पारंगत आणि रसायन शास्त्राचे अद्वितीय विद्वान् होते. हे जैनेंद्र व्याकरणाचे कर्ते पूज्यपाद यांचे भाचे होते. कर्नाटकांत त्यांच्याबद्दल अशी एक दंतकथा आहे कीं, ते आपल्या रासायनिक प्रयोगानें मोठमोठे पर्वत देखील सुवर्णमय करीत होते. यंत्र, मंत्र आणि तंत्र यांच्यामध्यें त्यांची कीर्ति दिगंतव्यापिनी होती. ज्यावेळीं हे उत्तर हिंदुस्थानांत भ्रमण करीत होते, त्यावेळीं दोघां स्त्रियांनीं त्यांना मोह पाडून त्यांचा प्राण घेतला, असें सांगतात. त्यांनीं नागार्जुनकल्प वगैरे वैद्यक विषयावर अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

---

## हिंदी भाषेंत ग्रंथ लिहिणारे कांहीं जैनकवि.

---

१ **बनारसीदास** ( महावीर शक २१६३ ), २ **हेमराज** ( म० श० २१९४ ), ३ **दौलतराम** ( म. श. २२४० ), ४ **द्यानतराय** ( म. श. २२५८ ), ५ **भूधरदास** ( म० श० २२५९ ) ६ **तोडरमल्ल** ( म० श० २२८८ ), ७ **वृंदावन** ( म० श० २३७६ ), ८ **हिराचंद अमोलिक** ( म० श० २३८२ ), ९ **स्वरूपचंद** (म. श. २३८८), १० **जवाहिरलाल**, ११ **दीपचंद**.

## बनारसीदास.

हे (विक्रम संवत् १६९३) जौनापूरनिवासी श्रीमाल जातीपैकीं होते. त्यांनीं नाटक समयसार, बनारसीपद्धति, नाममाला, बनारसीविलास वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## हेमराज.

यांनीं (वि० सं० १७२४) चौऱ्यांशी बोल (श्वेतांबरमतखंडन) नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्यांनीं पंचास्तिकाय, प्रवचनसार, भक्तामर भाषा, गोमट्टसार आणि नयचक्राचें भाषांतर वगैरे ग्रंथही लिहिले आहेत.

## दौलतराम.

हे बसवानिवासी काशलीवाल जातीपैकीं होते. त्यांचें अस्तित्व वि० सं० १७७७ पासून १८२९ पर्यंत होतें. त्यांनीं पुण्याश्रववचनिका, क्रियाकोश, पद्मपुराण वचनिका, आदिपुराण, हरिवंशपुराण, परमात्मप्रकाश वचनिका वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## द्यानतराय.

द्यानतराय हे आग्र्यामध्यें राहणारे होते. त्यांनीं चर्चाशतक व द्रव्यसंग्रह हे दोन ग्रंथ छंदोबद्ध तयार केले असून **द्यानतविलास** नांवाचा दुसरा एक सुरस ग्रंथही लिहिला आहे. त्यांचें अस्तित्व वि. सं. १७८८ मध्यें होतें.

## भूधरविलास.

हे (वि. सं. १७८९) आग्रा निवासी खंडेलवाल जातीचे

होते. त्यांनीं पार्श्वपुराण, जैनशतक, एकीभाव, भूपाल चौवीसी इत्यादि छंदोबद्ध ग्रंथ व प्रकरणें लिहिलीं आहेत.

## तोडरमल्ल.

हे सुप्रसिद्ध विद्वान् वि. सं. १८१८ मध्यें होऊन गेले असून जयपूर नगर हें त्यांचें निवासस्थान होतें. त्यांना कोणी एका राजानें धर्मासाठीं हत्तीच्या पायाखालीं तुडवून मारलें, अशी त्यांच्याबद्दल आख्यायिका आहे. त्यांनीं गोमट्टसारवचनिका, क्षपणसारवचनिका, लब्धिसारवचनिका, मोक्षमार्गप्रकाश, आत्मानुशासनवचनिका वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## वृंदावन.

हे ( वि. सं. १९०५ ) अग्रवाल जातींपैकीं होते. त्यांनीं चोवीसी पूजा, तीन चोवीसी पूजा, भाषापिंगल, अर्हतपासाकेवली वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## हिराचंद अमोलिक.

हे हिंदी कवि असून महाराष्ट्र भाषेचेही हे चांगले कवि असल्यामुळें यांची माहिती पुढें ' मराठी कवि ' या प्रकरणांत देण्यांत आली आहे. यांनीं हिंदीभाषेंत केलेला ' पंचपूजा ' हा ग्रंथ व भजनी पदें प्रसिद्ध आहेत.

## स्वरूपचंद.

हे ( वि. सं. १९१८ ) जयपूर निवासी होते. त्यांनीं त्रैलोक्यसार चौपाई, ऋद्धिशतक, मदनपराजय, वीरनाथस्तोत्र, जिनपंजरस्तोत्र, दर्शनस्तोत्र, निर्वाणक्षेत्र वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## जवाहिरलाल.

यांनीं सिद्धक्षेत्रपूजा, सम्मेदशिखरमाहात्म्य, त्रैलोक्यपूजा, तीन चोवीसी पूजा वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

## दीपचंद.

दीपचंद हे आमेरनिवासी होते. त्यांना काशलीवाल असेंहि ह्मणत असत. त्यांनीं अनुभवप्रकाशवचनिका, अनुभवविलास, स्वरूपानंद, ज्ञानदर्पण वगैरे ग्रंथ लिहिले आहेत.

---

# महाराष्ट्र जैनकवि आणि त्यांची कांहीं माहिती.

१ जिनदास, २ ब्रह्मजिनदास, ३ जनार्दन, ४ नागकवि, ५ भट्टारक जिनसेन, ६ ब्र० महतिसागर, ७ हिराचंद अमोलिक, ८ कवींद्रसेवक, ९ सन्मतिदास ऊर्फ नानात्मज, १० अनंतराज जोतिबा पांगळ, ११ आण्णप्पा आप्पा वाडकर, १२ रामचंद्र बसाजी कोरडे.

## जिनदास.

यांचा जन्म ' देवगिरी ' येथें झाला. यांना बालपणींच थोडें शिक्षण मिळालें होतें. यांची बुद्धि तीव्र होती. यामुळें यांची हुषारी, विद्वत्ता, संसारावरील अप्रीति व विरक्तवृत्ति पाहून विद्वान् स्वामी उज्जंतकीर्ति आचार्यांनीं त्यांना ब्रह्मचर्याची दीक्षा देऊन त्यांना पंडित बनविलें व आपला शिष्य करून त्यांना काव्य, तर्क व धर्मशास्त्र

पढवून चांगलें व्युत्पन्न केलें. त्यांचें संस्कृत भाषेवर चांगलें प्रभुत्व होतें. ह्मणूनच त्यांनीं लोकहितार्थ श्रीसकलकीर्तिआचार्यविरचित '**हरिवंश**' नामक संस्कृत पुराणाची मराठींत ओवीबद्ध रचना केली. पण एवढ्या मोठ्या हरिवंशाचें भाषांतर त्यांचेकडून पूर्ण होण्यापूर्वींच इहलोकींची यात्रा त्यांना पूर्ण करावी लागली. हरिवंशाचे ५५ अध्याय त्यांनीं मराठींत काव्यात्मक लिहिले. पुढील ५ अध्याय 'पुण्यसागर' नामें एका विद्वान् कवीनें पूर्ण करून तो हरिवंश ग्रंथ परिपूर्ण केला. या कवींचें जनन व निधन काल ओळखण्यास कांहींच साधन नाहीं; तथापि शालिवाहन शकाच्या १६ व्या शतकांत हे कवि झाले असावेत, अशी कित्येक लोकांची कल्पना आहे.

## ब्रह्मजिनदास.

यांचेंही नांव ब्रह्मचारी जिनदास असें आहे. पण यांनीं ग्रंथाच्या शेवटीं "ब्रह्मजिनदास" असें आपलें नांव उल्लेखिलें आहे. हरिवंशपुराणकारानें 'जिनदासनामा' असा नामनिर्देश केला आहे, हें या दोघांतलें तफावत. या दोन भिन्न व्यक्ती होत्या. यांचें वसतिस्थान 'आशापूर.' यांचे विद्यागुरु व धर्मगुरु तत्कालीन जैनधर्माध्यक्ष '**भुवनकीर्ति**' हे होते. श्रीमान् भगवज्जिनसेनाचार्यकृत महापुराणाच्या आधारें यांनीं मराठींत ओवीबद्ध **श्रीआदिनाथपुराण** संक्षिप्तरूपानें रचिलें. विशाळकीर्तींच्या कृपेनें महींद्रचंद्रानें आदिपुराण मराठींत रचिलेसें दिसतें. त्याला काव्यात्मक स्वरूप ब्रह्मजिनदास यांनीं देऊन तो ग्रंथ त्यांनीं शके १६१८ माघ वद्य ५ रविवारीं आशापूर येथील श्रीशांतिनाथ तीर्थंकराचे चैत्यालयांत पूर्ण केला. हें आदिपुराण हल्लीं वर्धा येथील रा. जिनदास नारायण चवडे यांचेद्वारा छापून निघालें आहे. या कवीच्या जननमरण

कालसंबंधीं किंवा त्यांच्याविषयींची इतर माहिती कोठेंही मिळाली नाहीं. मात्र हे साधू धर्मोपदेशक असून धर्मप्रभावनेसाठीं ते आपलें जीवन व्यतीत करीत होते असें दिसतें. यांचें अस्तित्व शके १६१८ मध्यें अर्थात् सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होतें, असें मानण्यास हरकत नाहीं. या कवीच्या हिंदी कविता, अनंतादि पूजा, अष्टकें, जयमालादि प्रकरणें इत्यादि पुष्कळ दृष्टीस पडतात.

## जनार्दनकवि.

जनार्दनपंत हे जैन लोकांतील सैतवाळ शाखेचे होते. यांचें निवासस्थान वऱ्हाडांत वासीमासमीप **नेडसी** हें होय. त्यावेळीं तेथें भट्टारकांचें एक तक्त होतें. त्या गांवाजवळच 'शर्करा' ह्मणून एक गांव असून तेथें त्यावेळीं पुष्कळ जैन-धर्मी लोक रहात होते. त्या गांवीं भक्तराज ह्मणून जैन जहागीरदार असून त्याचा जनार्दन-पंतास चांगला आधार असे. जनार्दनपंताच्या काव्यस्फूर्तीला प्रसन्न होऊन तो त्यावर चांगला अनुग्रह करीत असे. जनार्दनपंत वरील जहागीरदाराकडेच राहात. बालपणीं भट्टारकाकडून विद्या संपादन केल्यामुळें त्यांचा काल काव्यशास्त्राभ्यासांत गेला. पूर्वाचार्यकृत संस्कृत श्रेणिक पुराणाची यांनीं ओवीबद्ध मराठींत रचना केली. यांची कविता सरस व भक्तिरसप्रद आहे. काव्यकल्पनाही सुंदर आहे. शके १६९७ मध्यें यांनीं श्रेणिकपुराण संपूर्ण केलें. यावरून हे ब्रह्मजिनदासानंतर झाले, हें उघड आहे.

## नागकवि.

या कवीनें पुण्याश्रव ग्रंथ मराठींत ओवीबद्ध रचिला आहे. पुण्याश्रव हा ग्रंथ मूळ संस्कृत भाषेंतला; पण त्याचे कानडी

रूपांतरावरून नागकवीनें तो मराठींत शालिवाहन शके १७३९ आश्विन शु० २ स पूर्ण केला. या ग्रंथांत सर्व पुण्यश्लोक पुरुषांच्या कथा आहेत. जैनवाङ्मयप्रसारक मंडळीनें हा 'पुण्याश्रव' ग्रंथ छापून प्रसिद्ध केला आहे. नागकवीची ओवी कथानुसंधानामुळें सुरस झालेली आहे.

## भट्टारक जिनसेन.

कोल्हापूर संस्थानांत नांदणी येथें जैनांच्या चतुर्थ शाखेच्या लोकांचा एक मठ आहे. त्या मठांतील एक पट्टाधिकारी प्रस्तुतचे चरित्रनायक होते. हे सुमारें शके १७२५ ते १७९० पावेतों पट्टारूढ असावेत. हे चांगले विद्वान संस्कृतज्ञ असून धर्मोपदेशकही होते. सतत धर्मोपदेशानें यांनीं जैन लोकांत धर्मजागृति चांगली केली. आतांच्या कित्येक भट्टारकांप्रमाणें त्यांनीं प्रमादानें आपला सारा आयुष्यक्रम व्यतीत न करितां तो आपल्या कर्तव्याला स्मरून उत्तम रीतीनें संपविला. याची साक्ष त्यांनीं आज ग्रंथरूपानें लोकांवर जे उपकार केले आहेत त्यावरून चांगली पटते. त्यांचे-ठायीं स्वपरहितलालसा, ज्ञानार्जनबुद्धि, धर्मोन्नतिप्रेम वगैरे सद्गुण कसे वसत होते, हें त्यांच्या खालील कृतीवरून उत्तम रीतीनें दृग्गोचर होतें. यांनीं संवत १००० च्या सुमारास होऊन गेलेल्या श्रीमान् सकलकीर्ति आचार्यांनीं संस्कृत वाङ्मयांत प्रथित केलेल्या उपदेश-रत्नमाला व जंबुस्वामीचरित्र या दोन पुराणांचें मराठींत ओवीबद्ध भाषांतर करून, ते ग्रंथ प्राकृत जनांसाठीं अत्यंत सुलभ करून ठेविले. हा त्यांचा प्राकृत जनांवर व मराठी भाषेवर मोठा उपकार आहे. हे पट्टाधिकारी भट्टारक असून कवी होते. त्यांनीं उपदेशरत्नमाला हा ग्रंथ शके १७४३ मध्यें रचून पूर्ण केला व दुसरा ग्रंथ जंबुस्वामी-

पुराण हा शके १७८० कीलकनामसंवत्सर ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा सोमवारीं मृगनक्षत्रावर पूर्ण केला, असें त्या ग्रंथांतील कवीच्या उल्लेखावरून समजतें.

## ब्रह्मचारी महतिसागर.

वऱ्हाडांतील अंबनेर गांवचे सोहिलवाळ जातीच्या जैन व्यापाऱ्याचे हे चिरंजीव. यांचें पूर्वनाम मुरारी असें होतें. बाळपणीं यांना अन्य धर्मशास्त्रें वाचण्याचा व ऐकण्याचा फार नाद असे. यांचा बाप चांगला धार्मिक मनुष्य होता. त्याची इच्छा मुरारीनें जैनधर्मानें वागावें अशी फार होती. पण ती लौकर पुरी झाली नाहीं. एके दिवशीं मुरारी घरीं निजला असतां त्याला सहज पित्याच्या तोंडून जैनशास्त्र ऐकण्याचा योग आला. त्यासरशीं त्याचें जैनधर्मावर प्रेम जडून, आपण आजवर जैनशास्त्रें ऐकिलीं नाहींत, याबद्दल त्यास पश्चात्ताप वाटला ! मग तो स्वतः धर्मग्रंथ पाहूं लागला. त्यायोगें त्याची जैनधर्मावरील भक्ति वाढत चालली. तो आपल्या वयाच्या १२ व्या वर्षापासून विरक्त झाला. पण त्याच्या बापानें एका व्यापाऱ्याच्या मुलीशीं त्याचें त्याच्या इच्छेविरुद्ध लग्न लावलें. पण त्यानें मरेपावेतों स्त्रीचें नांवच घेतलें नाहीं ! तो जेथें जेथें जैनधर्मविषयक पूजाप्रभावना होई तेथें तेथें जाई. त्यायोगें जैनभट्टारक व ब्रह्मचारीगण यांच्या दर्शनाचा व त्यांजपासून धर्म जाणण्याचा त्यास लाभ मिळे. श्रीविशाळकीर्ति भट्टारक, नेमिसागर ब्रह्मचारी, पद्मकीर्ति, देवेंद्रकिर्ति वगैरे अनेक जैनसाधूंपासून त्यानें धर्माची माहिती मिळविण्याची संधी वाया दवडली नाहीं. हिंदुस्थानचे १८ वें शतक हें शांततेचें नसल्यामुळें मुरारीस व त्याच्या मातापित्यांस, गांवावर पेंढारी लोक चाल करून आल्यावेळीं एकदोन प्रसंगीं स्थलांतर करावें लागलें. यांना

धर्मग्रंथांवरून कळून आलेली संसाराची असारता व त्यावेळीं झालेली राष्ट्राची अस्वस्थ परिस्थिती आणि स्वतःस नसलेलें गृहसौख्य यामुळें त्याचें मन संसाराविषयीं अगदीं उदासीन झालें व दीक्षा घेण्यास तो प्रवृत्त झाला. पण त्याला तसें कोणी करूं देईना. त्या कामीं त्यास वारंवार व्यत्यय येऊं लागला. ज्ञानार्जन करावें अशी त्याची विशेष लालसा होती; पण त्याला घराकडून अडथळे येऊं लागले.

जरुडास विजयकीर्ति जैनाचार्याजवळ दीक्षा घ्यावी ह्मणून तो गेला असतां तेथेंही लोकांच्या अडथळ्यानें त्याची इच्छा पूर्ण झाली नाहीं. यावरून घरच्या मंडळीप्रमाणेंच लोकही या गोष्टीस व्यत्यय करितात असें त्याला कळून चुकल्यावर एके दिवशीं दीक्षा-सामुग्री व जिनमूर्ति, पिंछि, कमंडलु वगैरे बरोबर घेऊन तो वर्धा-नदीचे तीरावर झुंज ह्मणून एका प्रदेशांत गेला. प्रातःकाळचा समय. नदीचा प्रवाह गंभीरपणें चालला होता. थंड वारा वहात होता. अशा वेळीं देवपूजा करून मुरारी हा देवासमोर उभा राहिला व वस्त्रांचा त्याग करून कौपीन धारण करून जिनेश्वरास अनुलक्षून ह्मणाला, " देवा, संसार सोडून हा भगवा वेष धारण करीत आहें. प्रस्तुत मला कोणी दीक्षागुरु भेटला नाहीं; ह्मणून मी असा वेष घेतों. पुढें त्याच्या भेटीनंतर विधीपूर्वक दीक्षा घेईन. तरी मला क्षमा असावी. " अशा आशयाची देवास विज्ञप्ति करून पंचणमोकार स्मरण करीत, पूर्वाभिमुख करून त्यानें पांच मुठीनें डोक्यावरील केश काढले आणि संन्यासवृत्ति स्वीकारिली. याप्रमाणें स्वतःच दीक्षा घेऊन साधुवेषानें गांवांत आला. दीक्षेचा दिवस फाल्गुन शुद्ध १४ मघा नक्षत्र हा होता. दीक्षा घेतल्याचें वर्तमान घरीं कळल्यावर आईनें फार आक्रोश केला. त्यानें तिचें पुष्कळ सांत्वन केलें. पण ती

शांत होईना. तेव्हां गांवच्या लोकांनीं तिला चार समाधानाच्या गोष्टी सांगितल्या. त्याचा भाऊ दीनानाथ मुरारीस ह्मणाला, "तुझाला विधियुक्त दीक्षा देववितों. तुह्मी आतां येथेंच रहा." पण मुरारीस वाटलें कीं, हा कदाचित् आपली दीक्षा अशास्त्र ठरवून पुन्हां आपल्यास संसारांत ओढील. तेव्हां येथून जावें हें चांगलें, असें जाणून मुरारी तेथून निघाला.

मुरारीचें जन्मनांव महति असें होतें व दीक्षेच्या वेळीं तेंच नांव मुरारीनें स्वतःस ठेवून घेतलें. त्यावेळेपासून मुरारी महति या नांवानें प्रसिद्ध झाला. पुढें लोक त्यांना महतिसागर या नांवानें उल्लेखूं लागले.

हे महतिसागर पुढें फिरत फिरत देवेंद्रकीर्ति भट्टारकाजवळ आले व त्यांचेपासून विधियुक्त दीक्षा घेऊन त्यांचेजवळ त्यांनीं बरींच वर्षें धर्मशास्त्रांचा अभ्यास केला. मग पुष्कळ वर्षें वऱ्हाडांत फिरून तिकडे त्यांनीं धर्मोपदेश केला. कित्येक स्थलीं ग्रंथ-जीर्णोद्धार व पूजाप्रभावना इत्यादि कामेंही केलीं. तेथून मोगलाईमधून धर्मोपदेश करीत करीत फलटणास आले. तेथेंही त्यांच्या धर्मोपदेशानें हिराचंद अमोलिक प्रभृति बरेच जैनधर्मी गुजर शिष्य बनले. महतिसागरानें महाराष्ट्रांतही धर्मोपदेशासाठीं बराच प्रवास केला. शके १७५२ च्या सुमारास श्रीकुंथलगिरीहून बार्शीस आलेवेळीं रा. जोतीबा तात्या पांगळ यांनीं त्यांना शेवटपर्यंत बार्शीस राहण्याची विनंति केली. पण फलटणकरांची विशेष आग्रहाची विनंति असल्यामुळें महतिसागर तिकडे गेले. दहिगांवास मोठें धर्मकार्य होईल असें ते म्हणत होते. त्याप्रमाणें त्यांच्या कित्येक शिष्यांनीं दहिगांवास प्रचंड जिनमंदिरें बांधवून धर्मकार्याची तेथें मुहूर्तमेढ रोंविली. महतिसागर हे

त्या कालचे चांगले विद्वान् असल्यामुळें त्यांनीं कविताबद्ध अशीं चोवीस तीर्थंकरांचीं कल्याणिकें; रविवार, दशलक्षणी, षोडशकारण, रत्नत्रय आदि व्रतकथा; सम्यक्त्वाच्या अष्टांगांवर कविता; कित्येक उपदेशपर अभंग व पद्यें रचिलीं आहेत. यांचा अंत शके १७५४ च्या कार्तिक वद्य २ ला दहिगांव मुक्कामीं झाला. यांचा जन्म शके १६९६ सालीं झाला होता. यांनीं आपल्या वयाच्या १५ व्या वर्षीं दीक्षा घेतली होती. हे आजन्म बालब्रह्मचारी होते. दहिगांव येथें महतिसागर यांच्या समाधीजवळ कार्तिक मासीं प्रतिवर्षीं त्यांचें स्मारक ह्मणून अद्याप मोठी यात्रा भरत असते. या समाधीजवळ असलेलीं मोठमोठीं प्रेक्षणीय जैनमंदिरें त्यांच्या कर्तबगारीची अजून साक्ष देत आहेत!

# हिराचंद अमोलिक फलटणकर.

फलटण येथें शेठ अमोलिक मयाचंद व त्यांची पत्नी दोलीबाई यांच्या पोटीं ' हिराचंद ' यांचा जन्म शके १७५१ श्रावण वद्य १ स झाला. हे चौघे बंधू होते. पण त्यांतील हे द्वितीय होत. यांची ज्ञाति हुंबड असून, गोत्र उत्तरेश्वर व शाखा लघु हीं आहेत. हिराचंदाची प्रवृत्ति बाळपणापासून धर्ममार्गाकडे असल्यामुळें संसाराच्या असारतेचा परिचय त्यांना पदोपदीं येऊं लागला. ह्मणून विद्याध्ययन संपल्यावर लग्न न करितां ते आमरण ब्रह्मचारी राहिले. महतिसागरांची यांच्यावर पूर्ण कृपादृष्टि होती. त्यांच्या संगतीनें यांनीं धर्मशास्त्रांत प्राविण्य संपादिलें. पुढें त्यांना लौकरच काव्यस्फूर्ति झाली. त्यांनीं मराठींत रामायण ( छंदोबद्ध ), नलचरित्र, धर्मसिंधु, हिंदी भाषेंत अत्यंत सरस व प्रासादिक अशी पंचपूजा, शिवाय त्रोटक कविता व पद्यें बरींच रचिलीं. यांनीं गुर्जर समाजास पुढें आणून

गुर्जर लोकांचें मिथ्यात्व काढून टाकिलें. हुम्मड ज्ञातीच्या धर्मोन्नती-प्रीत्यर्थ त्यांनीं ठिकठिकाणीं हिंडून त्याची सुधारणा केली. यांच्या सदुपदेशामुळें ' नाना रामचंद्र नाग ' नामक एका देशस्थ ब्राह्मणानें जैनधर्म स्वीकारला. श्री. हिराचंदांच्या धर्मपर कवितेचा इतका कांहीं हिकडील लोकांत जारीनें प्रसार झाला कीं, प्रातःकाळीं जिनमंदिरांत दर्शनास गेलें असतां जैन-गुर्जर महिलांकडून त्यांनीं रचिलेली कविता बहुधा ह्मटलेली कानावर पडते. रामायण, नळचरित्र यांखेरीज यांचे बाकीचे ग्रंथ बहुतेक छापले गेले आहेत. रामायण व नळचरित्र हींहि शुद्ध करून छापविणें आवश्यक आहे. आपल्या वयाच्या ६३ व्या वर्षी ह्मणजे शके १८१४ च्या भाद्रपद वद्य प्रतिपदेला हे इहलोक सोडून गेले. मरण-काळीं जमलेल्या सर्व धर्म-बांधवांना त्यांनीं ' सतत धर्म-ग्रंथांचा स्वाध्याय करा, कोणी कोणास त्या कार्यीं व्यत्यय करूं नका, ' असा अमोल उपदेश केला. गुर्जर समाजांत यांच्यापासूनच सुशिक्षित रत्नें निपजण्यास प्रारंभ झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

## कवींद्रसेवक.

शके १७८० च्या सुमारास हा कवि घाटावर होऊन गेला. याची कविता अभंगात्मक सुबोध आहे. या कवीच्या अभंगाचा बराच मोठा संग्रह रा. तात्या नेमिनाथ पांगळ यांच्याकडे त्यांच्या पितामहानें संग्रहित केलेला त्यांजपाशीं आहे. त्यावरून या कवीनेंहि मिथ्यामार्गास वळणाऱ्या जैनांच्या स्थितीकरणासाठीं आपल्या काव्यत्राणीचा बराच उपयोग केला असें दिसतें.

" रावोबा " ह्मणून एका कवीच्या बऱ्याच कविता रा. पांगळ यांच्या संग्रहास आहेत. त्या सुबोध आहेत. याही कवीचें जननाम, चरित्र वगैरे परिचित नसल्यामुळें त्याचा नामनिर्देश करण्यापलिकडे प्रस्तुत कांहीं करतां येत नाहीं.

मराठी ओवीबद्ध रामायण, पांडवपुराण यांच्या कर्त्यांचा नामनिर्देश आह्मांस उपलब्ध झालेल्या ग्रंथांवर न सांपडल्यामुळें त्याबद्दल येथें त्या कवींचा उल्लेख करण्यासहि साधन उरलें नाहीं.

# सन्मतिदास ऊर्फ नानात्मज.

यांचें नांव रावजी नाना कोळेकर हे सैतवाळ जैन होते. यांचा जन्म शके १७४० च्या सुमारास सोलापूर येथें झाला. एका ब्राह्मण शास्त्र्यापासून यांनीं संस्कृत अध्ययन केलें. महाराष्ट्र कवि तुकाराम, रामदास, मोरोपंत, वामन यांचे काव्यग्रंथ वाचण्याचा यांना फार नाद होता. यांच्या काव्यस्फूर्तीला त्यायोगें चांगलीच गति मिळाली. यांची पद्यात्मक कविता चांगली प्रासादिक व चटकदार आहे. पण छंदोबद्ध कविता मात्र तशी वठली नाहीं. हे गृहस्थाश्रमी श्रावक होते. यांचे वडील शेठ हिराचंद नेमचंद यांचे दुकानीं लिहिण्याचा धंदा करीत व रावसाहेब हे घरीं बसून कविता करीत. हे स्वतः कीर्तनकार होते. यांनीं मराठींत पूजापाठ, पात्रकेसरी, अकलंक, सनत्कुमारचक्रवर्ती, समंतभद्र, अंजनचोर, अनंतमती, प्रभावती, वारिषेण, प्रद्युम्न, लवांकुशाख्यान याप्रमाणें बरींच कीर्तनोपयोगीं चरित्रें व पीठिका; तसेंच तत्त्वार्थ सूत्रावरील दहाहि अध्यायांवर अभंगात्मक टीका, फुटकळ अभंग व कविता रचिल्या आहेत. छंदोबद्ध कवितेंत मोरोपंतांप्रमाणें यमकानुकरण केलें आहे.

बार्शीस स्व० अनंतराज पांगळ यांनीं धर्मशिक्षणार्थ शके १७८० च्या सुमारास एक पाठशाळा काढली होती. त्यावर रावसाहेब हे बरींच वर्षे काम करीत होते. या कवीचा अंत आपल्या वयाच्या सरासरी ६० व्या वर्षी झाला. जैन वाङ्मयांत छंदोबद्ध काव्यरचना करणारे हेच पहिले कवी ह्मटल्यास हरकत नाहीं.

## अनंतराज जोतीबा पांगळ.

हे जैन सैतवाळ होते. यांचा जन्म शके १७५९ कार्तिक शुद्ध १४ शनिवार रोजीं बार्शी मुक्कामीं पांगळांचे घराण्यांत झाला. गांवठी शाळेंत यांचें शिक्षण झालें. पुढें आपल्या बुद्धिबळानें तरुणपणीं त्यांनीं धर्मशास्त्राचा अभ्यास केला. ते एकदां सम्मेदशिखरजीस लहानपणीं आपल्या वडिलाबरोबर गेले असतां त्यांच्या गायनचातुर्यानें त्यांना शाबासकी मिळून त्यांना आणखी कांहीं पद्यें ह्मणण्यास लोकांनीं सांगितलें; पण त्या वेळीं त्यांना फार पद्यें येत नसल्यानें खिन्नता स्वीकारावी लागली. याचा परिणाम असा झाला कीं, ही गोष्ट त्यांच्या मनाला लागून राहिली व पुढें धर्मशास्त्राचें ज्ञान संपादून त्या विषयावर स्वतः पद्यें रचण्यास त्यांनीं सुरुवात केली व त्यामुळें त्यांना संतोष वाटला. त्यांच्या काव्यस्फूर्तीवर पं० ब्रिजभूषण यांनीं अनुग्रह केल्यामुळें त्या कामीं त्यांना चांगलाच उत्साह प्राप्त झाला. हे बार्शी तालुक्यांत प्रसिद्ध व्यापारी होते. असाता—कर्मोदयामुळें त्यांचें संपत्तीनें युक्त असें सबंध दुकान एकाएकी जळून गेलें; तरी त्यांनीं धैर्य सोडिलें नाहीं! हे बहुश्रुत होते. गोरगरीबांस फुकट धर्मार्थ औषधें देत. सरकारांत यांचें वजन चांगलें होतें. सैतवाळ जैनसमाजोन्नतीप्रीत्यर्थ त्यांनीं फार श्रम घेतले. शके १८२४ च्या पौषमासीं वद्य ८ ला यांचा अंत झाला. यांची कविता पुष्कळ असून ती सरस व प्रासादिक आहे. यांचे हयातींतच यांच्या पदांचा फार प्रसार झाला होता. यांनीं केलेलें पंचस्तोत्रावरील अभंग, उपदेशपर अभंग व पद्यें साधारण मानानें हजारावर आहेत.

## आण्णापा आप्पाजी वाडकर.

सातारा जिल्ह्यांतील दुधगांवचे हे गृहस्थ होते यांनीं "जिन-

दत्तराय " या नांवाचें नाटक लिहिलें होतें. शिवाय ' श्रीपाल-चरित्र ' यांनीं काव्यरूपानें लिहिलेलें आहे. यांच्या जीवन चरित्राचा परिचय नसल्यानें एवढाच उल्लेख करणें भाग आहे. पण यांचा अंत होऊन सरासरी १४-१५ वर्षे झालीं असतील.

## रामचंद्र बसाजी कोरडे.

हे गृहस्थ बेळगांव जिल्ह्यांपैकीं चिक्कोडी येथें राहणारे होते. शाळामास्तरकीचा धंदा करून यांनीं आपलें जीवन व्यतीत केलें. यांनीं भजनी मेळ्यांत ह्मणण्याकरितां बरेच अभंग केले. त्यांचा प्रसार त्या प्रांतीं बराच आहे. सदरहू कर्त्याच्या अभंगाचे एक चोपडें, रा. नागप्पा कोरडे वगैरे मंडळींनीं प्रसिद्ध केलें असून त्याचें नांव ' आनंदोत्साह भजनामृत ' असें आहे. कविता जुन्या पद्धतीची असून भक्तिरस परिप्लुत आहे.

---

## महावीरानंतर झालेले कांहीं जैनधर्मी राजे वगैरे.

१ राजाश्रेणिक ( श्रीमहावीरचा काल ), २ राजाशिव-कोटी ( इ० स० ६९ ), ३ राजा दुर्विनीत ( इ० स० ४७८ ), ४ राजा हिमशीतल ( इ० स० ८०० ), ५ चामुंडराय-मंत्री आणि सेनापति ( इ० स० ८४४ ), ६ राजा अमोघवर्ष ( इ० स० ८७६ ), ७ राजा जयसिंह ( इ० स० ८८२ ), ८ राजा मुंज ( इ० स० ९९४ ), ९ नागवर्माचार्य सेनापति ( इ० स० १००० ), १० राजा कीर्तिवर्मा ( इ० स० १०४४ ),

११ राजा गंडुरादित्य (इ० स० १११८), १२ राजा निंब्राज (इ० स० ११२८), १३ नागवर्म सेनापति (इ० स० ११३१), १४ बूचिराजमंत्री (इ० स० ११३५), १५ राजा विजयादित्य (इ० स० ११४२), १६ राजा उदय (इ० स० ११५०), १७ भोजराज (इ० स० ११८७), १८ राजा बुक्कराय (इ० स० १४००), १९ राजा चंद्रगुप्त, २० राजा जिनदत्त आदि.

## राजा श्रेणिक.

मगध देशांतील राजगृह नगरींत श्रेणिक राजा राज्य करीत होता. हा राजा श्रीमहावीर तीर्थंकरांचा समकालीन होता. हा पूर्वी बौद्धधर्मी होता; पण नंतर जैन झाला, असें कित्येकांचें ह्मणणें आहे तर कित्येकांचें मत असें आहे कीं, तो मूळचा जैन असून बुद्धधर्मानुयायी झाला आणि नंतर चेलनादेवीच्या उपदेशानें व प्रभावानें तो पुन्हां जैन झाला. कांहीं असलें तरी तो एकदां बुद्धधर्मानुयायी होता हें खरें आहे. हा बौद्धधर्मी असतांना तो जैन यतीची फार निंदा करीत असे. त्यानें एकदां एक जैन मुनी ध्यानस्थ असतां त्यांच्या गळ्यांत साप बांधला; त्यामुळें त्याला नरकगतीचा बंध झाला. व त्याप्रमाणें तो हल्लीं नरकांत आहे आणि भविष्यत्कालीं तीर्थंकर होणार आहे, असें पुराणांतरीं उल्लेख आहे. श्रेणिक जैन झाल्यानंतर श्रीमहावीर स्वामींच्या समवशरणांत जाऊन त्यानें पुष्कळ वेळां धर्मोपदेश ऐकला आहे. त्यास कुणिक नांवाचा एक दुष्ट मुलगा होता. श्रेणिकाला त्या मुलापासून भयंकर त्रास होऊन तो त्या त्रासांतच मरण पावला, असें ह्मणतात.

## राजा शिवकोटी.

हे वाराणशी नगरांत विक्रम संवताच्या पहिल्या शतकांत राज्य करीत होते. हे मोठे शिवभक्त होते. त्यांनीं आपल्या नगरांत एक मोठें शिवालय बांधिलें होतें, पण समंतभद्राचार्यांच्या प्रभावानें त्यानें शिवाची भक्ती करण्याचें सोडून जैनधर्माची दीक्षा घेतली आणि ते जैन झाले.

## राजा दुर्विनीत.

हा राजा गंगकुलतिलक होता. ह्यानें इ० स० ४७८ ते ५१३ पर्यंत राज्य केलें आहे. हा पूज्यपाद आचार्यांचा शिष्य होता. कानडी ग्रंथकारांमध्यें ह्याची फार प्रसिद्धी आहे. ह्यानें महाकवि भारवी यांनीं केलेल्या किरात-अर्जुनीय काव्याच्या पहिल्या सर्गापासून १५ सर्गापर्यंत कानडी टीका केली आहे.

## राजा हिमशीतल.

कांची देशांतील रत्नसंचय नगरांत हिमशीतल राजा इ० स० च्या ८ व्या शतकांत राज्य करीत होता. हा बुद्धाचा भक्त होता; पण त्याची आवडती राणी मदनसुंदरी ही जिनभक्त होती. एकदां श्रीअकलंकाचार्य हे हिमशीतल राजाच्या दरबारांत येऊन त्यांनीं बौद्धधर्माचा पराभव केला; हें पाहून राजानें बौद्ध लोकांना हद्दपार करून जैनधर्म स्वीकारला.

## चामुंडराय.

श्रीचामुंडराय हे, गंगकुलचूडामणि, जगदेकवीर, नोलंबकुलांतक वगैरे पदव्या धारण करणारे महाराज राचमल्ल यांच्या पदरीं मंत्री आणि सेनापति होते. ब्रह्मक्षत्रिय कुलांमध्यें वि० सं० ९०० च्या

सुमारास ह्यांचा जन्म झाला. श्रवणबेळगुळची सुप्रसिद्ध श्रीगोमटेश्वर स्वामींची प्रतिमा ह्यांनींच अपरिमित द्रव्य खर्चून प्रतिष्ठित केली आहे. यांच्या औदार्य गुणावर लुब्ध होऊन राचमल्लानें 'राय' ही पदवी दिली होती. हे मोठे शूर होते. गोविंदराज, वेकुंडराज वगैरे राजांना ह्यांनीं पराजित केल्यामुळें ह्यांना समरधुरंधर, वीरमार्तंड, रणरंगसिंह, वैरीकुलकालदंड, समरपरशुराम, प्रतिपक्षराक्षस वगैरे उपनांवें होतीं. ह्यांच्या प्रेरणेनेंच नेमिचंद्र-सिद्धांत-चक्रवर्तींनीं **गोमट्ट-सार** हा ग्रंथ लिहिला. चामुंडरायांनीं **त्रिषष्टिलक्षण-महापुराण** नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्याचें दुसरें नांव चामुंडरायपुराण असें आहे. याशिवाय चारित्रसार नांवाचा एक ग्रंथहि त्यांनीं लिहि-लेला आहे.

## राजा अमोघवर्ष.

राष्ट्रकूट वंशावतंस अमोघवर्ष हे भारतवर्षाचे अत्यंत सुप्रसिद्ध राजे होते. त्यांची बंकापूर नांवची राजधानी होती. हे मोठे विद्वान् असून त्यांना कविराज ही पदवी होती. महाराज अमो-घवर्षाचा राज्याभिषेक वि० सं० ८७२ मध्यें झाला. वि० सं० ९३२ च्या पूर्वी त्यांनीं आपलें राज्य सोडून दिलें होतें. त्यांनीं ६० वर्षेंपर्यंत राज्य करून आपल्या कृष्णराज नांवाच्या पुत्राला राज्य देऊन शेवटीं जिनदीक्षा घेतली होती. आदिपुराणाचे कर्ते श्रीजिन-सेनाचार्य हे त्यांचे गुरु होते. त्यांनीं **कविराजमार्ग** नांवाचा एक ग्रंथ तयार केला आहे आणि जिनदीक्षा घेतल्यानंतर **प्रश्नोत्तर-रत्नमाला** नांवाचा दुसरा एक ग्रंथ तयार केला आहे. अमोघवर्ष वि० सं० ९३४ पर्यंत हयात होते; पण यानंतर त्यांचा देहांत कधीं झाला हें समजत नाहीं.

# राजा जयसिंह.

जयसिंह महाराज हे चालुक्य वंशामध्यें होऊन गेले. त्यांची कट्टगानदीच्या कांठीं एक राजधानी होती. त्यांना पृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर, चालुक्यचक्रेश्वर, परमभट्टारक अशीं उपनांवें होतीं. त्यांच्या वंशामध्यें त्यांच्या अगोदर दुसरा एक जयसिंह राजा होऊन गेला ह्मणून हे दुसरे जयसिंह होत. ह्यांच्या राज्याच्या वेळचे ३० पेक्षां अधिक शिलालेख आणि ताम्रपत्रें आहेत. त्यावरून इतकें निर्विवाद आहे कीं, ह्यांनीं कमींतकमी वि० सं० ९३८ पासून ९६४ पर्यंत राज्य केलें आहे. ह्यांच्यानंतर ह्यांचे पुत्र सोमेश्वर ( आहवमल्ल ) हे राज्याचे स्वामी झाले. हे जैन होते कीं नाहीं हें जरी निश्चयानें सांगतां येत नाहीं, तरी श्रीवादिराजसूरी यांच्यावर त्यांची अत्यंत भक्ती असल्यानें जैन धर्मावर आणि जैनधर्मानुयायी लोकांवर त्यांची मोठी कृपा होती, हें निर्विवाद आहे.

# राजा मुंज.

परमारवंशावतंस महाराज मुंज यांची कारकीर्द विक्रम राजाच्या स्वर्गगमनानंतर १०५० वर्षांच्या पाठीमागून अर्थात् वि० सं० च्या दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होती. त्यांच्या कारकीर्दींत अमितगतिआचार्य होऊन गेले. मुंजराजानें वि० सं० १०५० ते १०७८ पर्यंत राज्य केलें. या मुंज राजाची अशी हकीकत आहे कीं, पूर्वीं माळवा प्रांतांतील उज्जयनी नगरांत सिंह नामें राजा राज्य करीत होता. त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें तो नेहमीं खिन्न असे. एके दिवशीं तो राजा वनक्रीडा करण्यास गेला असतां तेथें त्याला एका गवताच्या पेंडीवर मूल दिसलें. तें पाहून त्यानें तें आणून राणीच्या स्वाधीन केलें. मुंज ह्मणून एक गवताची जात

आहे. त्या गवतावर तें मूल पडलें असल्यानें राजानें त्याचें नांव मुंज असें ठेविलें. पुढें पुण्योदयानें सिंहराजाला सिंहल ( सिंधुराज ) नांवाचा मुलगा झाला. मुंजराजा आणि सिंहल हे दोघे राज्य करूं लागल्यावर सिंह राजानें दीक्षा घेतली. पुढें सिंहलापासून पराक्रमी आणि तत्वज्ञानी शुभचंद आणि भर्तृहरी असे दोन युगुल पुत्र झाले. हे दोन पुत्र आपलें राज्य हिरावून घेतील या भीतीनें मुंज राजानें त्यांस मारण्याचा विचार केला. तें ऐकून शुभचंद्र आणि भर्तृहरी दीक्षा घेण्याकरितां वनांत गेले. त्यानंतर मुंज राजानें निष्कंटक राज्य केलें.

## नागवर्माचार्य.

हे उदयादित्य राजाचे सेनानायक आणि संधिवैग्रहिक मंत्री होते. हे इ० स०च्या दहाव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेले आहेत. ह्यांनीं बलिपूर नांवाच्या नगरांत पुष्कळ मंदिरें बांधविलीं असून **चंद्रचूडामणि** नांवाचा एक ग्रंथहि त्यांनीं लिहिला आहे. या ग्रंथाचें दुसरें नांव **ज्ञानसार** असें आहे. ह्यांत वैराग्याला जागृत करणारीं पुष्कळ पद्यें आहेत.

## राजा कीर्तिवर्मा.

चालुक्यवंशीय महाराज त्रैलोक्यमल्ल हे राजा कीर्तिवर्मा यांचे जनक होत. त्रैलोक्यमल्ल ह्यांनीं इ०स० १०४४ पासून १०६८ पर्यंत राज्य केलें. ह्यांना चार पुत्र होते. जयसिंह, विष्णुवर्धन, विजयादित्य आणि कीर्तिवर्मा. राजा कीर्तिवर्मा यांची विद्वत्ता आणि कवित्व हे गुण वाखाणण्यासारखे होते. वैद्यशास्त्रावर ह्यांनीं बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं एका ग्रंथांत त्यांनीं पशूंच्या रोगांची चिकित्सा केली आहे. इ० स० ११२५ मध्यें राजा कीर्तिवर्मा यांचें अस्तित्व होतें.

## गंडुरादित्यदेव.

मु० हेरलें पेटा आळतें (कोल्हापूर) येथील शिलालेखावरून असें समजतें कीं, " इ० स० ११९८ ह्या वर्षी गंडुरादित्यदेव ह्या राजानें कोल्हापूर बस्तींतील शांतिदेव यांस पुष्कळशी जमीन दान दिली आणि मौजे हेरलें येथील देवळाकरितां कांहीं रक्कम व्याजीं लाविली." यावरून हा राजा जैनधर्मी असावा किंवा जैन धर्मावर तरी निष्ठा ठेवणारा असला पाहिजे असें अनुमान निघतें.

## निंब्राज.

कोल्हापूर येथील गंगावेशीच्या देवालयांत असलेल्या शिलालेखावरून असें समजतें कीं, शके १०५० सोमवार रोजीं जीमूतवाहन वंशांतील गंडुरादित्याचा सेवक ह्मणविणारा राजा निंब्राज ह्यानें कुदीगोळ गांवाजवळ बांधिलेल्या देवालयासाठीं मूर्तीची पूजा करण्याबद्दल, देवळाच्या डागडुजीबद्दल आणि उपाध्यायाच्या उपजीविकेसाठीं देशांतील शेठी व महाजन यांना कोल्हापूर व मिरज इलाख्यांतून जाणाऱ्यायेणाऱ्या व्यापारी मालावर जकात बसवून ती तें देवालय बांधविलेल्या नूतन स्वामीस देण्यास हुकूम केला. यावरून हे राजे जैनधर्मीच होते, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

## नागवर्म.

हे चालुक्यवंशीय जगदेकमल्ल राजाच्या पदरीं (११३९ ते ११४९) सेनापति होते. अभिनवशर्ववर्म, कवितार्कणपूर आणि कवितागुणोदय अशा त्यांना पदव्या होत्या. ह्यांच्या पित्याचें नांव दामोदर असें होतें. ह्यांनीं काव्यावलोकन, कर्नाटक भाषाभूषण आणि वस्तुकोश असे तीन ग्रंथ लिहिले आहेत.

## बूचिराज.

हे बल्लाळ राजाचे मंत्री ( इ. स. ११७३ ) होते. हे मोठे विद्वान् आणि कवि होते. पोन्न कवीप्रमाणें मार्मिकता आणि श्रेष्ठता हे गुण त्यांच्या अंगीं होते. हे श्रीपालत्रैविद्यांचे शिष्य होते. ह्यांनीं जिनसेवेंत आपलें जीवन घालविलें.

## राजा विजयादित्य.

कोल्हापूर येथील गंगावेशीच्या मंदिरांत असलेल्या दुसऱ्या एका शिलालेखावरून असें समजतें कीं, माघ शु० १५ शके १०६४ रोजीं ( शनी लागलेल्या चंद्रग्रहणसमयीं ) वाळवाद येथें राज्य करणाऱ्या ह्या राजानें माकियानंदी पंडितदेव ह्यास हिरवीन गांवांतील एक घर व एक शेत हीं करवीर येथील जैन देवालयाच्या पूजेबद्दल दिलीं. हा राजा जीमूतवंशांतील होता.

## राजा उदय.

राजा उदय हा चोल देशचा राजा सोमनाथ याचा मुलगा होय. ह्यानें उदयादित्य नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. ह्याचें अस्तित्व इ० स० ११५० मध्यें होतें. हा जैन धर्माचा मोठा उपासक होता.

## भोज राजा.

जीमूतवंशांतील भोज राजा कोल्हापूर येथें राज्य करीत असतां ह्या राजानें कुमारकीर्ति यास त्याचा शिष्य 'प्रधान' यानें कोल्हापुरास बांधलेल्या जैन-देवालयाच्या दुरुस्तीबद्दल आणि भिक्षुकाच्या उदरपोषणाकरितां मीरनजी ( हल्लीं ज्यास मिरज ह्मणतात ) देशांतील कोरंवी हा गांव दान दिला. या देशाच्या आग्नेयेस रुंवी, वायव्येस कुनूर आणि ईशान्येस सांद्री हीं आहेत. हा मजकूर कोल्हापूर महाराज सरकारांच्या कोटींत असलेल्या शिलालेखावरून घेतला आहे.

# राजा बुक्कराय.

इ० स० च्या १४ व्या शतकांत यांचें अस्तित्व होतें. ह्यांच्या वेळीं पंडित, आर्य, कवि वगैरे होते.

# राजा चंद्रगुप्त.

पूर्वी पाटलीपुत्र नगरांत नंद नामें राजा राज्य करीत होता. त्याच्या पदरीं शकट नांवाचा मंत्री होता. एकदां नंदराजावर चाल करून आलेल्या शत्रूंना, शकटमंत्र्यानें खजिन्यांतून पुष्कळ द्रव्य देऊन त्यांना परतविलें. ही गोष्ट नंदाला समजून त्यानें रागानें शकटाला त्याच्या कुटुंबीमाणसांसह कैदेंत घातलें. राजाला पुन्हां युद्धाच्या बाबतींत त्याची सम्मति घेण्याचा प्रसंग आल्यामुळें त्याला कैदेंतून मुक्त करून त्यानें त्याला आपल्याजवळ ठेवून घेतलें. पण शकटाच्या मनांत आपला अपमान केल्याबद्दलचा द्वेष असल्यानें त्यानें नंदाचा सूड उगविण्याकरितां चाणक्य नांवाच्या धूर्त ब्राह्मणास जवळ ठेवून घेतलें. आणि त्याच्या मदतीनें नंदाचा निर्वंश केला. शकटानें, चाणक्यानें बरोबर आणलेल्या चंद्रगुप्तास गादीवर बसवून उत्तम रीतीनें राज्य चालविलें. हा चंद्रगुप्त धर्मानें जैन होता असा उल्लेख आहे. हा पहिला चंद्रगुप्त. याच्यानंतर त्याचा मुलगा बंधुसागर यानें कांहीं वर्षें राज्य चालवून आपल्या अशोक मुलास राज्य दिलें. अशोकानें कांहीं वर्षें राज्य केल्यावर आपल्या कुनाळ नांवाच्या पुत्रास झालेल्या चंद्रगुप्तास ( नातवास ) राज्य देऊन त्यानें दीक्षा घेतली. हा दुसरा चंद्रगुप्त. हा जैन होता, याबद्दल पूर्ण आधार आहे. ह्याच्या वेळीं भद्रबाहु स्वामी होऊन गेले. चंद्रगुप्तानें कांहीं वर्षें सुखानें राज्य केलें. चंद्रगुप्तानंतर १२ वर्षें सारखा दुष्काळ पडल्यानें बहुतेक राजे आणि मोठमोठे घरंदाज, जमीनदार वगैरे

लोक दक्षिणेंत येऊन राहिले. चंद्रगुप्ताला एकदां सोळा स्वप्नें पडलीं. त्यांची फलश्रुति श्रीभद्रबाहु स्वामींकडून ऐकून त्यानें जिनदीक्षा घेतली.

## चंद्रगुप्तास पडलेलीं सोळा स्वप्नें आणि त्यांची फलश्रुति.

---

१. **कल्पवृक्षाची फांदी मोडलेली दिसली.**

**फळ**—या पंचम (कलि) काळांत फारच थोडे लोक जिनदीक्षा घेतील.

२. **सूर्यास्त झालेला दिसला.**

**फळ**—पंचमकालांत भद्रबाहूनंतर पूर्ण अंगपूर्वज्ञान राहणार नाहीं.

३. **चंद्र चाळणीसारखा सछिद्र दिसला.**

**फळ**—जिनशासनांत अनेक भेद होतील.

४. **बारा फणीयुक्त सर्प दिसला.**

**फळ**—बारा वर्षें दुष्काळ पडेल.

५. **देवाचें विमान परत जातांना दिसलें.**

**फळ**—पंचमकालांत चारणमुनि, विद्याधर हे भूमीवर येणार नाहींत.

६. **उकिरड्यावर कमलोत्पत्ति पाहिली.**

**फळ**—बहुतेक वैश्य लोक मात्र जैनधर्म पाळतील. ब्राह्मण आणि क्षत्रिय अन्यमती होतील.

**७. भूतवृंदास नाचतांना पाहिलें.**

फळ–या पंचमकालांत लोक चंडी-मुंडी, भैरवादि नानाप्रकारच्या कुदेवांच्या सेवेंत राहून अनेक जीवांची हिंसा करतील.

**८. सोनकिडा चमकतांना पाहिला.**

फळ–जैनधर्म शुद्ध स्वरूपांत व सविस्तर न राहतां त्यांत मिथ्यात्वाचा प्रसार होईल.

**९. सरोवर बहुतेक आटलेलें असून त्याच्या एका बाजूस थोडें पाणी असलेलें पाहिलें.**

फळ–ज्या ठिकाणीं जिनकल्याणिक झालें आहे, त्या ठिकाणीं धर्माची क्षीणता होईल.

**१०. सोन्याचे भांड्यांत कुत्रें खीर खातांना पाहिलें.**

फळ–उत्तम कुळांतील लक्ष्मी नीच कुळांत राहील.

**११. माकड हत्तीवर बसलेलें पाहिलें.**

फळ–पंचमकालांत नीच लोक राज्य करतील. क्षत्रिय राजा कोणी राहणार नाहीं.

**१२. समुद्र मर्यादा उल्लंघतांना दिसला.**

फळ–पंचमकालांत राजे लोक अन्यायी व नीतिभ्रष्ट होऊन परवित्त हरण करतील.

**१३. महारथास वासरें जुंपलेलीं दिसलीं.**

फळ–वृद्धापकाळीं दीक्षा न घेतां लोक तरुणपणीं दीक्षा घेतील.

**१४. राजपुत्र उंटावर बसलेला दिसला.**

फळ—राजे लोक धर्म व दया न पाहतां हिंसा करतील.

**१५. रत्नराशींत माती मिसळलेली पाहिली.**

फळ—राजे लोक निर्ग्रंथमुनींचा द्रोह करतील.

**१६. दोन काळे हत्ती टक्कर खेळतांना पाहिले.**

फळ—पाहिजे त्यावेळीं पर्जन्य पडणार नाहीं.

## राजा जिनदत्त.

हा राजा उत्तर मथुरेंतील साकार महाराजांचा चिरंजीव होय. त्याच्या मातेचें नांव श्रियाळदेवी असें होतें. एकदां साकार महाराज एका भिल्लिणीच्या सौंदर्याला भुलून भ्रष्ट झाले. तशा स्थितींत त्या भिल्लिणीस मारिदत्त नांवाचा मुलगा झाला. आपल्या मुलास राज्य मिळण्यासाठीं भिल्लिणीनें जिनदत्तास युक्तीनें मारण्याचा विचार केला; पण दुर्दैवानें फसून मारिदत्तच मारला गेला! यानंतर आपल्यावर हें संकट येणार हें जाणून जिनदत्तानें कांची देशाची वाट धरली. जिनदत्त हा पद्मावतीदेवीचा मोठा भक्त होता. जातेवेळीं देवीच्या प्रतिमेला बरोबर घेऊन गेला होता. त्यानें एका दाट अरण्यांत आपला तळ दिला. तेथील भिल्लांनीं त्यास चांगली मदत केल्यामुळें तेथेंच त्यानें वसति केली. हल्लींचें हुमस ( श्रीक्षेत्र होंबुज, जिल्हा शिमोगा ) नांवाचें क्षेत्र हें जिनदत्तरायासंबंधानेंच प्रसिद्धीस आलें आहे. जिनदत्तरायानें कलिशकाच्या ५व्या शतकांत हुमस येथें पद्मावतीची प्रतिष्ठा केली असा एका ग्रंथांत उल्लेख आहे.

## चालुक्यवंश.

चालुक्यवंशांत भुवनैकमल्ल नांवाचा एक जैनराजा होऊन गेला.

त्यानें इ. स. १०६९ पासून १०७६ पर्यंत राज्य केलें आहे. हा राजा गुणचंद्र नांवाच्या मुनीचा शिष्य होता. ह्याच वंशांत **जगदेक-मल्ल** नांवाचा जैनराजा होऊन गेला. त्यानें इ स. ११३९ पासून ११४९ पर्यंत राज्य केलें आहे. ह्या राजाचा, नागवर्म ( द्वितीय ) नांवाचा जैनब्राह्मण हा कुलोपाध्याय होता.

## राष्ट्रकूटवंश.

पंडित भगवानलालजी यांनीं लिहिलेल्या लेखावरून असें समजतें कीं, द्वितीय **भिल्लम** राजाचा विवाह, शिलाहार वंशाच्या झंझराजाची कन्या लक्ष्मीयव्वा हिच्याबरोबर झाला होता आणि तिची ( लक्ष्मी-यव्वाची ) माता राष्ट्रकूटवंशांतील होती. अर्थात् हे तीन्ही राजवंश बहुतकरून जैनधर्मानुयायी असले पाहिजेत.

## देवगिरी यादववंश.

इ० स० १२३५च्या जवळजवळ **कमलभव** नांवाचा एक जैनकवि होऊन गेला. त्यानें आपल्या शांतीश्वरपुराणांत विनयेंदुव्रति ( विनयचंद्रमुनि ) नांवाच्या जैनमुनीची स्तुती केली आहे आणि त्याला 'सिंहणोर्वीश्वरविनमन्मस्तकनादं' असें विशेषण दिलें आहे. हा सिंहणनांवाचा राजा ( जो विनयचंद्रमुनीच्या पादकमलीं आपलें मस्तक नम्र करीत होता ) देवगिरीच्या यादववंशांतला होता. त्यानें १२१० पासून १२४८ पर्यंत राज्य केलें आहे.

## कलचूरि.

कलचूरिवंशाचा सुप्रसिद्ध राजा **बिज्जल** हा जैनधर्माचा उपासक होता. ह्याच्या कालकीर्दीतच त्याचा प्रधान व लिंगायतमतस्थापक **'बसवेश्वर'** हा उदयास आला.

## सौंदत्ती रट्टराजवंश.

ह्या वंशाचा मूळपुरुष **मेरद** आणि त्याचा पुत्र **पृथ्वीराम** हे दोघे जैनधर्माचे उपासक होते. ह्या वंशाच्या चौथ्या **कार्तवीर्य** राजाचा आश्रित एक पार्श्वपंडित नांवाचा जैनकवि होता. ह्या कवीनें इ. स. १२०५ मध्यें कार्तवीर्यासंबंधीं एक शिलालेख लिहिला आहे. त्यावरून असें समजतें कीं, **कार्तवीर्य** राजा, शुभचंद्रभट्टारकाचा शिष्य होता. त्यानें इ. स. १२०२ ते १२२० पर्यंत राज्य केलें आहे.

## शिलाहारवंश.

ह्या वंशाच्या **लक्ष्मणराजाच्या** दरबारांत कर्णपार्य नांवाचा एक जैनकवि होता. राजाच्या प्रेरणेनें ह्या कवीनें 'नेमिनाथपुराण' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यामध्यें त्यानें, **लक्ष्मणराज** नेमिचंद्र मुनीचा शिष्य होता असें ह्मटलें आहे. *

---

## भाग ६ वा.

## शास्त्रीय जैनग्रंथ.

ज्यांत धर्मतत्वें सप्रमाण सिद्ध केलेलीं आहेत, त्यास **न्यायशास्त्र** ह्मणावें. प्रमेयकमलमार्तंड, अष्टसहस्री, आप्तपरीक्षा, न्यायविनिश्चया-

---

* या पांचव्या भागांतील माहिती श्री. नाथूराम प्रेमी यांनीं तयार केलेल्या हिंदी पुस्तकांवरून व कांहीं कानडी पुस्तकांवरून घेतली आहे. यांतील 'मराठी कवि' हें प्रकरण मात्र रा० पांगळ यांनीं स्वतंत्रपणें लिहिलेलें आहे.

लंकार, प्रमेयरत्नमाला, न्यायदीपिका, न्यायकुमुदचंद्रोदय वगैरे न्यायशास्त्राचे ग्रंथ होत.

ज्यामध्यें शब्दांचीं रूपें सिद्ध केलेलीं आहेत त्यास **व्याकरण-शास्त्र** ह्मणावें. शाकटायनव्याकरण, जैनेंद्रव्याकरण, शब्दार्णवचंद्रिका, शब्दानुशासन, कातंत्ररूपमाला वगैरे व्याकरणशास्त्राचे ग्रंथ होत.

काव्य, चंपू, नाटक, कादंबरी, अलंकार यांस **साहित्यशास्त्र** ह्मणावें. धर्मशर्माभ्युदय, जीवंधरचंपू, गद्यचिंतामणि, अलंकार-चिंतामणि, विक्रांतकौरवीय ( नाटक ), अंजनापवनंजय ( नाटक ), मैथिलीपरिणय ( नाटक ) वगैरे साहित्यशास्त्राचे ग्रंथ होत.

ज्यामध्यें पुरातन महापुरुषांच्या कथा लिहिल्या आहेत ते **पुराणग्रंथ.** त्रिषष्टिशलाका महापुराण, हरिवंशपुराण, पद्मपुराण ( रामायण ), पांडवपुराण ( जैनमहाभारत ), पार्श्वपुराण हे पुराण-ग्रंथ होत.

गणितसारसंग्रह, त्रिलोकसार, भद्रबाहुसंहिता, जंबुद्वीपप्रज्ञप्ति, चंद्रसूर्यप्रज्ञप्ति हे **गणित** आणि **ज्योतिष** शास्त्रांचे ग्रंथ होत.

ज्यामध्यें तत्वांचें वर्णन केलें आहे त्यास **सिद्धांतशास्त्र** ह्मणावें. तत्वार्थसूत्र, राजवार्तिक, श्लोकवार्तिक, पंचास्तिकाय, बृहद्-द्रव्यसंग्रह, सर्वार्थसिद्धि, श्रुतसागरी वगैरे सिद्धांतग्रंथ होत.

## बारा अंगशास्त्रांचें वर्णन.

१. **आचारांगः**—मुनींच्या चारित्राचें वर्णन.

२. **सूत्रांगः**—ज्ञानाचा विनय आणि स्वमतपरमत–धर्म-क्रियांचें निरूपण.

३. **स्थानांगः**-जीव, पुद्गल वगैरे द्रव्यांच्या स्थानांचें वर्णन.

४. **समवायांगः**–द्रव्य, क्षेत्र, काल आणि भाव यांच्या अपेक्षेनें समानतेचें वर्णन.

५. **व्याख्याप्रज्ञप्तिः**–जीवाचें अस्तित्व, नास्तित्व वगैरेंबद्दल ६०००० प्रश्नोत्तरांचें वर्णन.

६. **ज्ञातृकथांगः**–धर्मकथांचें वर्णन व जीवादिक पदार्थांचें स्वभाववर्णन.

७. **उपासकाध्ययनः**–अकरा प्रतिमा, व्रत, शील, आचारक्रिया, मंत्रोपदेश वगैरेंचें वर्णन.

८. **अंतकृतांगः**–प्रत्येक तीर्थंकराच्या वेळीं दहा दहा महामुनीश्वरांनीं घोर उपसर्ग सहन करून कर्मांचा क्षय केल्याबद्दलचें वर्णन.

९. **अनुत्तरांगः**–प्रत्येक तीर्थंकराच्या वेळीं दहा दहा मुनीश्वरांनीं घोर उपसर्ग सहन करून अनुत्तर विमान पदवी मिळविल्याबद्दलचें वर्णन.

१०. **प्रश्नव्याकरणांगः**–अतीतअनागत कालासंबंधीं सुख, दुःख, लाभ, अलाभ, जीवित, मरण वगैरेंचें वर्णन.

११. **विपाकसूत्रांगः**–कर्मफलवर्णन.

१२. **दृष्टिप्रवादांगः**–१४ पूर्व, ५ प्रज्ञप्ति, ५ चूलिका, १ सूत्र, १ प्रथमानुयोग यांचें वर्णन.

प्रत्येक अंगाची पदसंख्या १८ हजारांपासून एक अब्जपर्यंत आहे. एकूण बाराही अंगांची पदसंख्या १,१२,८३,५८,००५ आहे. प्रत्येक पदांत ५१ कोटींपेक्षां अधिक श्लोक आहेत.

## चौदा पूर्वशास्त्रांचें वर्णन.

१. **उत्पादपूर्वः**-सर्व वस्तूंची उत्पत्ति, विनाश व ध्रौव्य यांचें वर्णन.

२. **आग्रायणीपूर्वः**—सुनय, कुनय व पृथ्वीचें जातिभेदात्मक वर्णन.

३. **वीर्यानुवादः**—६३ शलाका पुरुषांची शक्ति व धैर्यात्मक वर्णन.

४. **अस्तिनास्ति**—सप्तभंग ( स्याद्वाद ) व शाश्वत व विनाशात्मक वस्तूचें वर्णन.

५. **ज्ञानप्रवादः**—मति आदि ज्ञानाचे आठ भेद व गणितविषय, फल उत्पत्ति वर्णन.

६. **सत्यप्रवादः**—हृदयादि आठ स्थानांपासून स्वरोच्चारात्मक वर्णन.

७. **आत्मप्रवादः**—कर्ता, भोक्ता, नित्य, अनित्य, जीवस्वभाव आदि वर्णन.

८. **कर्मप्रवादः**—आठ कर्मांचें वर्णन.

९. **प्रत्याख्यानः**—पापक्रियांचा त्याग व सहा संहनन ( शरीर ) यांचें वर्णन.

१०. **विद्यानुवादः**—महाविद्या ५००, लघुविद्या ७००, अष्टांग निमित्तज्ञान वगैरेंचें वर्णन.

११. **कल्याणवादः**—६३ शलाका मंगलोत्सव, पंचकल्याणिक, सोळा भावना यांचें वर्णन.

१२. **प्राणानुवादः**—वैद्यक, गारुड, श्वासोच्छ्वास, अष्टयोग, वायु-ज्ञान यांचें वर्णन.

१३. **क्रियाविशालः**—पुरुषांच्या ७२ कला, स्त्रीचे ६४ गुण, शिल्प-भेद ८४ यांचें वर्णन.

१४. **लोकबिंदुः**—तीन लोकांचें वर्णनात्मक शास्त्र.

चौदा पूर्वांची पदसंख्या—९५,५०,००,००५ आहे. हें चौदा पूर्वांचें वर्णन झालें. श्रीवृषभदेवतीर्थंकरापासून श्रीमहावीरतीर्थंकरा-

पर्यंत प्रत्येकानें आपल्या केवलीअवस्थेंत जो उपदेश दिला तो श्रवण करून समवशरणांतील त्यांच्या प्रत्येक गणधरानें वरील द्वादशांग श्रुतीची रचना केली. याचें पूर्ण ज्ञान श्रुतकेवलींना असतें. अंतिमश्रुतकेवली श्रीभद्रबाहुस्वामी झाले. तदनंतर तें कमी प्रमाणांत राहिलें. धर्मसेनाचार्यापर्यंत ११ अंगें व १० पूर्वांचें ज्ञान राहिलें. कंसाचार्यापावेतों ११ अंगांचेंच ज्ञान राहिलें. सुभद्राचार्य १०, यशोभद्र ९ आणि दुसरे बाहुभद्राचार्य ८ अंगांचे धारक होते. भूतबलीपर्यंत तर एकच अंगाचें ज्ञान उरलें. पण आज जसा अंगज्ञानाचा अभाव झाला आहे, तशी मात्र तेव्हां स्थिति नव्हती. यांतील थोडी, त्यांतील थोडी अशी थोडीथोडी माहिती राहिली होती.

# जैनांचीं मुख्य तीर्थक्षेत्रें.

## श्रीकैलासपर्वत.

या क्षेत्रावर श्रीवृषभतीर्थंकर आणि बाहुबली वगैरे मुनि मोक्षास गेले आहेत. हिमालयपर्वताच्या उत्तरेकडे हें क्षेत्र आहे.

## श्रीसम्मेदशिखर.

या क्षेत्रावर प्रत्येक कालाचे चोवीस तीर्थंकर मोक्षास जातात. या कालांतील वीस तीर्थंकर आणि कोट्यावधि मुनि मोक्षास गेले आहेत. हें क्षेत्र बंगाल प्रांतांतील हजारीबाग जिल्ह्यामध्यें आहे. प्रतिवर्षी हजारों यात्रेकरू या क्षेत्रास जात असतात. या क्षेत्रावर वीस टोंकें आहेत. पैकीं पार्श्वनाथाचें टोक सर्वांत उंच आहे. हें टोक समुद्रसपाटीपासून साडेसहा हजार (६५००) फूट उंच आहे. या पहाडावर बाकीच्या चार तीर्थंकरांचीं टोंकेंही बनविलीं आहेत.

## श्रीगिरनारपर्वत.

या पर्वतास **ऊर्जयन्तगिरी** किंवा **रैवतकपर्वत** असेंही ह्मणतात. या पर्वतावर श्रीनेमिनाथ तीर्थंकर मोक्षास गेले आहेत. हें क्षेत्र काठेवाड प्रांतांतील जुनागड शहरापासून ४ मैलांच्या अंतरावर आहे. या गिरनारपर्वतांची उंची ३६६६ फूट आहे. या पर्वतास वरच्या टोंकापर्यंत एकंदर ५००० दगडी पायऱ्या आहेत.

## पावापूर.

या क्षेत्रावर महावीर तीर्थंकर मोक्षास गेले आहेत. हें सिद्ध-क्षेत्र शिखरजीला जातांना वाटेंत बिहारप्रांतांत आहे.

## मंदारगिरी ( चंपापुरी ).

या क्षेत्रावर वासुपूज्य तीर्थंकर मोक्षास गेले आहेत. हें क्षेत्र बिहार प्रांतांतच आहे.

# अन्य सिद्धक्षेत्रांचीं नांवें.

**१ मांगीतुंगी, २ मेंढागिरी, ३ सिद्धवरकूट, ४ पावागड, ५ शत्रुंजय** ( पालिठाणा किंवा सिद्धाचल ), **६ वडवाणी, ७ सोनागिरी, ८ नैनागिरी, ९ द्रोनागिरी, १० तारंगा, ११ कुंथुगिरी, १२ गजपंथ, १३ राजगृही, १४ कोटिशिला** वगैरे.

# अतिशय क्षेत्रांचीं नांवें.

**१ अहितक्षत, २ चंदेरी, ३ थोवन, ४ पपोरा, ५ कुंडलपूर, ६ अंतरिक्ष पार्श्वनाथ, ७ कारंजा, ८ भातकुली, ९ रामटेक, १० बाबानगर, ११ अबूगड, १२ केसरियानाथ,**

१३ चांदनपूर १४ जैनबद्री, १५ कानूरग्राम, १६ मूडबिद्रि, १७ कारकल, १८ बारंगपूर, १९ हुमस वगैरे.

### श्रवणबेळगुळ ( जैनबद्रि ).

हें अतिशयक्षेत्र म्हैसूर प्रांतांत आहे. विंध्यगिरी आणि चंद्रगिरी यांच्यामध्यें श्रवणबेळगुळ हा गांव आहे. विंध्यगिरीवर चामुंडरायांनीं प्रतिष्ठा केलेली श्रीगोमटेश्वरस्वामींची मूर्ति आहे. या मूर्तीची उंची ५६ फूट आहे. ही एका अखंड दगडाची तयार केली असून इच्या एका बाजूला ' चामुंडरायें करवियलें ' अशीं अक्षरें आहेत. चंद्रगिरीवर जैनांचीं पुष्कळ देवळें असून शिलालेखही पुष्कळ आहेत. यांचें विशेष वर्णन मि० राइससाहेबकृत श्रवणबेळगुळचे शिलालेख ( Inscriptions at Shravanbelgola ) या पुस्तकावरून पहावें.

## जैनांच्या पर्वतिथी ( सण ).

महिन्यांतील प्रत्येक अष्टमी व चतुर्दशी हे पर्व दिवस होत. ह्या पर्वदिवशीं उपवास किंवा शक्ति नसेल तर एकवेळ जेवून अर्हंताचें जप, स्तोत्र, ध्यान, स्वाध्याय, सामायिक वगैरे करून इच्छानिरोध अथवा वासनाक्षय व इंद्रियदमन किंवा आत्मसंयमन करीत असावें. निदान या दिवशीं तरी कांदा, लसूण, रताळे वगैरे कंदमूळ व इतर अभक्ष्य पदार्थ जैन हें नांव धारण करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें खाऊं नयेत.

### श्रीमहावीरजयन्ति.

चैत्र शु० १३ दिवशीं महावीर तीर्थंकरांचा जन्म झाल्यानें अलीकडे **महावीरजयन्ति** हा पर्वदिवस मानण्याची वहिवाट चालू

आहे. याशिवाय ज्येष्ठ शु० ५ ( श्रुतपंचमी ), श्रावणी, अनंत-चतुर्दशी, शिवरात्र ( माघ वद्य १४ या दिवशीं आदिनाथ स्वामी मोक्षास गेले आहेत ) वगैरे पर्वतिथी आहेत.

## अक्षय्य तृतीया.

वैशाख शु० ३ चे दिवशीं श्रेयांसराजानें आदिनाथ तीर्थंकरांस इक्षुरसाचा आहार दिला आहे. ह्मणून या दिवशीं जैन लोक देवळांत उसाच्या रसाचा अभिषेक करून देवाची पूजाअर्चा करितात.

## अष्टान्हिकपर्व.

आषाढ, कार्तिक आणि फाल्गुन या तीन महिन्यांत शु० ८ पासून पौर्णिमेपर्यंत आठ दिवस जिनमंदिरांतून नंदीश्वरबिंबाची पूजा-अर्चा सुरू असते. नंदीश्वरद्वीपांत चारी दिशेला अकृत्रिम अशीं ५२ जिनचैत्यालयें आहेत. या चैत्यालयांतील ५२ मूर्तींची कल्पना करून प्रत्येक दिशेस १३ मूर्ती बसवून ५२ तीर्थंकरांची एक प्रतिमा तयार केलेली असते. ती बहुतेक जिनचैत्यालयांत असते. या आठ दिवसांत पंचमेरूचीं स्थापना करून त्यावर नंदीश्वर बिंब ( प्रतिमा ) ठेवून त्याची पूजा करतात. या पर्वास '**नंदीश्वरपर्व**' असेंही ह्मणतात.

## दशलाक्षणिक पर्व.

भाद्रपद महिन्यांत शु० ५ पासून १० दिवसपर्यंत असलेल्या पर्वदिवसांत उत्तरेकडचे लोक दशधर्मांची आराधना करतात. या दिवसांत जैनांच्या देवळांत मोठा उत्सव होत असतो. महाराष्ट्रांत या पज्जुसणाची फारशी वहिवाट नाहीं. तथापि भाद्रपद महिन्यांत अनंतचतुर्दशीव्रताचा तीन दिवसपर्यंत मोठा समारंभ चाललेला असतो. सदर महिन्यांत षोडशकारण, पुष्पांजलि, रत्नत्रय वगैरे इतर पर्वदिवसही आहेत

## श्रीमहावीरनिर्वाणपर्व.

आश्विन वद्य ३० च्या दिवशीं प्रातःकाळीं श्रीमहावीर स्वामी मोक्षाला गेले आहेत, ह्मणून तो पर्वदिवस समजून जैन लोक देवळांत श्रीमहावीरतीर्थंकरांची वगैरे पूजाअर्चा करतात आणि निर्वाणलाडु चढवितात. (निर्वाणलाडु चढविण्याची वहिवाट उत्तर हिंदुस्थानांत फार आहे.) या दिवशीं दीपोत्सवही करितात.

---

# चोवीस तीर्थंकरांच्या पंचकल्याणिकांच्या पर्वतिथी. ❀

| | गर्भकल्याण. | जन्मक. | दीक्षाक. | केवलज्ञानक. | मोक्षक. |
|---|---|---|---|---|---|
| वृषभ. | आषा. व २ | चैत्र व. ९ | चैत्र व. ९ | फा. व. ११ | मा. व. १४ |
| अजित. | * | ज्ये. व. ३० | मा. शु. ९ | पौ. शु. ११ | चै. शु ५ |
| शंभव. | फा. शु. ८ | का. शु. १५ | * | * | चै. शु. ६ |
| अभिनंदन. | वै. शु ८ | मा. शु. १२ | मा. शु. १२ | पौ शु. १४ | वै. शु. ६ |
| सुमति. | श्रा. शु. २ | चै. शु. ११ | वै. शु. ९ | चै. शु. ११ | चै. शु. ११ |

❀ ही सर्व माहिती कोल्हापूर येथील श्रीलक्ष्मीसेन स्वामींच्या मठामधील 'उत्तरपुराण' या ग्रंथावरून घेतली आहे. यांत तीर्थंकरांच्या कांहीं कल्याणिकांबद्दल मिती मिळाल्या नाहींत ह्मणून त्या दाखल केल्या नाहींत. श्रीमहावीर तीर्थंकरांचें मोक्षकल्याण कार्तिक वद्य १४ स झालें आहे असा या ग्रंथांत उल्लेख आहे. पण आश्विन वद्य ३० हाच दिवस प्रचारांत आहे. तथापि यासंबंधीं शोध होणें जरूरीचें आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पद्मप्रभ. | मा.व.१३ | * | का.व.१३ | चै.शु.१५ | फा. व. ४ |
| सुपार्श्व. | भा. शु. ६ | * | ज्ये.शु.१२ | फा. व. ६ | फा. व. ७ |
| चंद्रप्रभ. | चै. व. ५ | पौ.शु.११ | पौ. व.११ | फा. व. ७ | फा. शु.७ |
| पुष्पदंत. | फा.व. ९ | मार्ग.शु. ९ | मार्ग. शु. ९ | का. शु. २ | भा. शु. ८ |
| शीतल. | चै. व. ८ | मा.व. १२ | मा.व. १२ | पौ.व. १४ | आश्वि.शु. ८ |
| श्रेयान्. | ज्ये.व.११ | फा.व.११ | फा.व.११ | मा.व. ३० | * |
| वासुपूज्य. | आषा.व.६ | फा.व.१४ | फा.व.१४ | मा. शु २ | भा.शु.१४ |
| विमल. | ज्ये.व.१० | मा.शु.१४ | मा. शु. ४ | मा. शु. ६ | आषा.व.८ |
| अनंत. | का.व.सुपरिवासर(?) | ज्ये.व.१२ | ज्ये.व १२ | चै.व.३० | * |
| धर्म. | * | मा.शु.१३ | मा.शु. १३ | पौ.शु. १५ | ज्ये.शु.१४ |
| शांति. | भा. व. ७ | ज्ये.व.१४ | ज्ये. व. ४ | पौ. शु. १० | ज्ये.व.१४ |
| कुंथु. | श्रा. व. १० | वै. शु. १ | वै. शु. १ | चै. शु. ३ | वै. शु. १ |
| अर. | फा. शु. ३ | मार्ग शु.१४ | * | का.शु.१२ | चै.व. ३० |
| मल्लि. | चै. शु. १ | मार्ग शु ११ | मार्ग.शु.११ | पौ.व.२ | फा शु. ५ |
| मुनिसुव्रत. | श्रा. व. २ | श्रा. व. २ | वै. व. १० | वै. व. ९ | फा.व.१२ |
| नमि. | आश्वि.व.२ | आषा.व.१० | आषा.व.१० | मार्ग. शु.३ | वै.व.१४ |
| नेमि. | का. शु. ६ | श्रा. शु. ६ | श्रा. शु. ६ | आश्वि.शु. १ | आषा.शु. ७ |
| पार्श्व. | वै. व. २ | पौ. व. ११ | पौ. व. ११ | चै. व. १ | श्रा. शु. १ |
| वर्द्धमान. | आषा.शु.६ | चै.शु.१३ | मार्ग.व.१० | वै.शु.१० | का.व. १४ |

# भाग ७ वा.

## जैनधर्माचें महत्व.

जैनधर्म हा अनादि आहे. सृष्टीला उत्पन्न करणारा आणि तिचा संहार करणारा कोणी एक परमेश्वर आहे, ही गोष्ट जैनधर्माला मान्य नाहीं. जसा जैनधर्म अनादि आहे, तशी सृष्टीही पण अनादि आहे. श्रीमहावीर तीर्थकरांच्या वेळीं जैनमताची स्थापना झाली, असें जें कित्येकांचें ह्मणणें आहे तें चुकीचें आहे. श्रीमहावीर तीर्थकर हे जैन लोकांचे शेवटचे अर्थात् २४ वे तीर्थंकर असून त्यांच्यापूर्वी जैनधर्माचे २३ तीर्थंकर होऊन गेले आहेत व त्यांच्याही पूर्वी प्रत्येक कालांत २४ याप्रमाणें अनंत चोविशी झालेल्या आहेत. आधुनिक वेद जैनांना मान्य नसले तरी वेदानें जैनधर्माचा सन्मान केला आहे. आदिनाथ तीर्थंकरांची आणि इतर सर्व तीर्थंकरांची त्यांत स्तुति केलेली आहे.

ऋग्वेदांत ह्मटलें आहे:–

ॐ त्रैलोक्यप्रतिष्ठानां चतुर्विंशति तीर्थंकराणाम् ।
ऋषभादिवर्धमानांतानां सिद्धानां शरणं प्रपद्ये ॥

यजुर्वेदांत ह्मटलें आहे:–

"ॐ नमो अर्हतो ऋषभो"

ॐ ऋषभं पवित्रं पुरुहूतमध्वरं यज्ञेषु नग्नं परमं माह संस्तुतं वारं शत्रुंजयं तं पशुरिंद्रमाहुरितिस्वाहा । उत्रातारमिंद्रं ऋषभं वदन्ति अमृतारमिंद्रं हवे सुगतं सुपार्श्वमिंद्रं हवे शक्र-

**मजितं तद्वर्धमानपुरुहूतमिंद्रमाहुरिति स्वाहा । ॐ स्वस्ति न इंद्रावृद्धश्रवाः स्वस्तिनः पूषा विश्ववेदाः स्वस्तिनस्तार्क्ष्यो अरिष्टनेमिः स्वस्तिनो बृहस्पतिर्दधातु दीर्घायुस्त्वाय बलायुर्वा शुभजातायु ॥**

येणेंप्रमाणें वेदांमध्यें जैनमताचे ऋषभनाथ, सुपार्श्वनाथ, नेमिनाथ, वर्धमान इत्यादि चोवीस तीर्थंकरांची स्तुति व पूजा आहे. यावरून वेदांच्याही पूर्वीचें जैनमत आहे हें उत्तम प्रकारें सिद्ध होतें.

महापुराणकर्ते श्रीजिनसेनाचार्य, ह्यांनीं आपल्या महापुराणांत, तिसऱ्या कालाच्या अखेर वृषभतीर्थंकर होऊन गेले; त्यांच्या नातवानें अर्थात् भरतचक्रवर्तीच्या पुत्रानें सांख्यमताची स्थापना केली असें वर्णन केलें आहे. जैनधर्मांतील स्याद्वादमताचें रहस्य ज्यांना कळलें आहे त्यांना, जैनधर्म हा इतर सर्व धर्मांचा जनक आहे आणि इतर धर्म आपल्या बापापासून ( जैनधर्मापासून ) आपली वाटणी घेऊन वेगवेगळे होऊन बसले आहेत, असें वाटेल. कारण हिंदुस्थानांत ज्या वेळीं वेदमताचा आणि बौद्धमताचा प्रसार सर्वत्र चालू होता, त्यावेळीं वेदमतानुयायांचा पुढारी **याज्ञवल्क्य**, 'जग हें नित्य आहे' असें प्रतिपादन करीत होता आणि बौद्धधर्माचा पुढारी **गौतम**, 'जग हें अनित्य आहे' असें लोकांना सांगत चालला होता. त्याचवेळीं जैन लोकांचे चोविसावे तीर्थंकर **श्रीमहावीर** यांचा उदय होऊन त्यांनीं स्याद्वादमताचें रहस्य लोकांना सांगून 'जग हें नित्यही आहे आणि अनित्यही आहे,' असें सिद्ध करून दाखविलें. कारण जगांतील प्रत्येक वस्तूची सिद्धता परस्परांच्या अपेक्षेनें होते. उदाहरणार्थः–रामा हा एकाचा पुत्र आहे; पण तोच दुसऱ्यांच्या अपेक्षेनें भाऊ, मामा, काका इत्यादीही होऊं शकतो, हें उघड आहे. ह्मणजे प्रत्येक वस्तूवर परस्पर विरुद्ध धर्म निरनिराळ्या अपेक्षेनें

राहूं शकतात. यावरून याज्ञवल्क्याच्या नित्यमताला आणि गौतमाच्या अनित्य मताला जैनधर्मांत थारा मिळाला. याप्रमाणें सूक्ष्म निरीक्षण केल्यास जैनधर्म हा, "**अन्यूनमनतिरिक्तं याथातथ्यं विना च विपरीतात्**" या श्रीसमंतभद्राचार्यांच्या ह्मणण्याप्रमाणें निराबाध आहे; असें ह्मणण्यांत मुळींच पक्षपात होत नाहीं, हें या पुढील प्रकरणांत दिलेले जैनेतर विद्वानांचे, जैनधर्माबद्दलचे निरनिराळे विचार वाचल्यास स्पष्ट समजून येईल.

## जैनधर्माचें श्रेष्ठत्व.

**अहिंसा परमोधर्मः** हें तत्व जगांतील कोणत्याही धर्माला मान्य आहे. पण या तत्वाचा जैनधर्मांत जितका सूक्ष्म विचार केला आहे तितका कोणत्याही धर्मांत केलेला दिसत नाहीं. पूर्वापर विरोध येईल, असे प्रतिपादन करणारे पुष्कळ धर्म जगांत आहेत. बौद्धधर्माला अहिंसा मान्य आहे; पण मेलेल्या प्राण्यांचें मांस खावयाला कांहीं हरकत नाहीं, असें तो सांगत आहे! हिंदुधर्माला अहिंसा हें तत्व ग्राह्य आहे; पण यज्ञामध्यें हिंसा करावयाला कांहीं हरकत नाहीं, असें तो प्रतिपादन करीत आहे. जैनेतर कोणताहि धर्म घ्या, त्यांत हिंसाप्रतिपादक गोष्टी आढळून येतील. जर एखादा उदारमतवादी व केवळ परार्थपर असा जगांत कोणता धर्म असेल तर तो जैनधर्मच होय. ह्मणूनच जैनधर्माला श्रेष्ठपणा दिला गेला आहे. कारण उदार बुद्धीनें, स्वार्थ सोडून '**प्राण्यावर दया करा**' असें अक्षरशः सांगणारा जैनधर्मावांचून इतर कोणताहि धर्म दिसून येत नाहीं. यामुळें सर्वांपेक्षां जैनधर्माला श्रेष्ठत्व आलें आहे.

## ‘जैनधर्म’ या विषयावर खालील जैनेतर विद्वानांनीं निरनिराळ्या ठिकाणीं दिलेल्या व्याख्यानांतील आणि त्यांनीं लिहिलेल्या लेखांतील कांहीं उतारे.

# श्री. कुंवर दिग्विजयसिंह. *

सर्व धर्मांला समाविष्ट करून घेणारा सर्वमान्य जर कोणता धर्म असेल तर तो जैनधर्म असून तो **राष्ट्रीय धर्म** होण्याला लायख आहे. कोणत्याहि धर्मांचें जीवित केवळ बाह्यावडंबरापेक्षां त्याच्या उत्तमपणावर व हितकारक तत्वावर अवलंबून असतें. हल्लीं जगांत जितके प्रचलित धर्म आहेत, ते सर्व धर्म जैनधर्मांत समाविष्ट असल्याचें दृग्गोचर होत आहे. जैनेतर धर्म कर्तावादी आहेत. ह्मणजे त्यांचें ह्मणणें असें आहे कीं, सर्व विश्वाची उत्पत्ति व नाश करणारा ईश्वर आहे. या ह्मणण्यास जैनधर्मांत मुळींच थारा नाहीं. जैनधर्मांत जड व चैतन्य असे दोन पदार्थ आहेत. चैतन्य जीवाचे एक बहिरात्मा, दुसरा अंतरात्मा व तिसरा परमात्मा असे तीन भेद आहेत. जैनधर्मांत प्रमाण व युक्तीला अनुसरून शुद्ध, बुद्ध व मुक्त असा परमात्मा अनादिकालापासून कोणी आहे, या ह्मणण्यास मुळींच आधार नाहीं. पण प्रत्येकाचा आत्मा हाच परमात्मा आहे, ही गोष्ट जैनधर्मास मान्य आहे. हा आत्मा वर्तमानसमयीं परमात्मा नाहीं; पण तो प्रयत्न करील तर परमात्मा होऊं शकेल. जैनधर्मांत संसारावस्था व मोक्षावस्था अशा दोन अवस्था आहेत. या अवस्थांचा कर्ता ईश्वर नाहीं. आत्मा अनादिकालापासून या संसारांत भ्रमण करीत असून त्याची संसारावस्था त्यानेंच कर्मानुसार उत्पन्न केली आहे.

* हे पूर्वीं आर्यसमाजिष्ट होते; पण हल्लीं ते जैनधर्मी बनले आहेत.

वेदांती लोक ज्याला ईश्वर मानतात, त्या ईश्वराचा मायेशीं जोंवर संबंध आहे, तोंवर त्याला जीवात्मा व तो संबंध तोडल्यावर त्यालाच परमात्मा ह्मणतात. अर्थात् त्याला ब्रह्म ह्मणतात. जैन-धर्माला सुद्धां ही गोष्ट मान्य आहे. आत्म्याचा कर्मांशीं (मायेशीं) संबंध आहे, तोंवर तो जीवात्मा व कर्मांचा नाश झाल्यावर तोच पर-मात्मा ऊर्फ ब्रम्ह. यावरून जैनधर्मांत वैदिक धर्मीयांच्या ब्रह्म कल्प-नेचा समावेश होत आहे. तसेंच ईश्वर कर्ता ह्या जैनेतर सिद्धांताचाही जीवात्मा तोच परमात्मा ऊर्फ ईश्वर; ह्मणून तोच कर्ता या दृष्टीनें कर्तृत्वाचाही समावेश जैनधर्मांत होत आहे.

आर्यसमाजानें असा एक सिद्धांत मानला आहे कीं, सृष्टीच्या आरंभीं आईबापावांचून तरुण मनुष्यें उत्पन्न झालीं. जैनधर्मानें या विचारालाही आपल्या गंभीर उदरांत आश्रय दिला आहे. जैन-धर्मानुसार ज्या वेळीं भोगभूमीचा काल होता, व स्त्रीपुरुषांच्या उदरीं जुगळें ( दोन बालकें—स्त्री व पुरुष ) उत्पन्न होत होतीं, त्यावेळीं या युग्मबालकांस जन्म देतांच मातापिता शिंक व जांभई देऊन मरण पावत असत. तें जोडपें ४९ दिवसांत पूर्ण वृद्धि पावून, पति-पत्नी बनून संसार करीत. त्यांना आपण उत्पन्न कधीं झालों, हें सुद्धां कळत नसे. यावरून आईबापावांचून आपण उत्पन्न झालों, अशी त्यांची भावना होणें साहजिक आहे. यावरून जैनधर्मांत सर्व धर्ममतांचा समावेश होण्यास प्रत्यवाय नाहीं.

पाश्चात्य ( युरोपियन ) पं० डार्विनसाहेब यांच्या—‘ मानव-जातीची उत्पत्ति माकडापासून आहे ’-या सिद्धांतासही जैनधर्मानें आधार दिला आहे. कालाच्या विभागासंबंधाच्या सहाव्या कालाच्या वेळीं मानवशरीरप्रमाण कमी कमी होऊन शेवटीं एक हातावर येतें. त्याकालीं एक हात उंच शरीराचे स्त्री-पुरुष केवळ माकडाप्रमाणें दिसत असून त्यांची स्थितीही त्यांच्याचसारखी जवळ-

जवळ असते. पुढें त्या अल्पशा शरीरावरून पूर्ण वाढीस पुन्हां लवकरच प्रारंभ होतो. या डार्विनच्या सिद्धांतासही जैनधर्मानें आश्रय देण्यास कमी केलें नाहीं. सारांश सर्व धर्मांचा समावेश जैनधर्मांत होऊं शकतो. यावरून अशीं दोन अनुमानें निघतात कीं, जैनधर्मांतून तरी इतर धर्म निर्माण झाले असावेत, किंवा सर्व धर्मांतला अल्प अल्प भाग घेऊन तरी जैनधर्म निर्मापित केला असावा. पण कित्येक विद्वानांस ही गोष्ट कबूल आहे कीं, सांख्य, मीमांसक, वैशेषिकादि परमतवाल्यांच्या तत्वज्ञानाचा समावेश जैनधर्मांत असलेला दृग्गोचर होतो; पण जैनांचें तत्वज्ञान कोठेंही अन्यत्र दृग्गोचर होत नाहीं. यावरून जैनधर्म अनेक धर्मांतला भाग घेऊन रचिला नसून इतर सर्व धर्मांचा व्यापक जैनधर्म आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कन्नमूल नामें पंडिताचें असें मत आहे कीं, जैनसिद्धांत हा एक पक्क्या व मजबूत मंदिराप्रमाणें आहे. व बाकीचे इतर धर्मांचे सिद्धांत त्या मंदिरांतील निरनिराळ्या विभागांप्रमाणें आहेत. यावरून जैनधर्म हा **राष्ट्रीयधर्म** होण्यालायख आहे.

जैनधर्मांत संपूर्ण प्राण्यांविषयीं समता व दया व्यक्त करण्याबद्दल पूर्णपणें सांगितलें आहे. जी प्राणज्योत आपल्याठायीं वसत आहे, तीच एखाद्या कीटकाच्याठायीं आहे. अर्थात् पीडेनें ज्या वेदना आपणास होतात, त्याच वेदना त्या प्राण्यांनाही होतात. तेव्हां त्या सर्वांविषयीं दयाभाव धारण करा; एवढेंच नव्हे तर त्यांना कांहीं त्रास दिला असल्यास त्याबद्दल स्वतः अनुतापयुक्त व्हा, त्या प्राण्यांची क्षमा मागा, अशी श्रीजिनेश्वरांची आज्ञा आहे. यावरून जैनधर्माची थोरवी व सदयता पूर्णपणें व्यक्त होत आहे. आत्म्याला वीतरागत्वाचे पूर्णत्वानंतर परमात्मपद–निर्वाणपद–ब्रह्मपद मिळतें.

———

# जर्मनीचे सुप्रसिद्ध संस्कृतज्ञ विद्वान् प्रो० एच्. जेकोबी.

प्राचीनकालीं ज्या प्रांतांत याज्ञवल्क्यमहर्षीनें, उपनिषदाला अनुसरून ब्रम्ह आणि आत्मा हें विश्वाचें शाश्वत आणि केवल तत्व आहे, असें प्रतिपादन केलें होतें; आणि ज्या ठिकाणीं श्रीमहावीर स्वामींच्या समकालीन असलेल्या गौतमबुद्धानें आपल्या क्षणिकवादाचा लोकांना उपदेश दिला होता, त्याच प्रांतांत शेवटचे जैन तीर्थंकर (श्रीमहावीर) हे उदयाला येऊन त्यांनीं वर सांगितलेल्या परस्परविरुद्ध धर्माच्या अपेक्षेनें आपण प्रतिपादन केलेल्या जैनधर्मांत विशेष महत्व काय आहे, हें लोकांना सांगून त्यांनीं सर्वांना जैनधर्मानुयायी करून सोडलें होतें.

उपनिषद्कारांनीं, 'प्रत्येक पदार्थाच्या ठिकाणीं शाश्वत, निराबाध आणि अद्वितीय असें एक तत्व आहे, आणि तें सर्व विश्वाला व्यापून राहिलें आहे,' असें प्रतिपादन करून त्याचें शक्य तितकें महत्व परिपूर्ण रीतीनें वर्णन केलें आहे. ह्या अविनाशी तत्वाचा आणि जडविश्वाचा काय संबंध आहे, हें जरी त्यांनीं स्पष्ट सांगितलें नाहीं, तथापि ह्या दृश्य जगतामध्यें कांहींतरी सत्य आहे, असें निःपक्षपाती माणसाला वाटल्यावांचून राहणार नाहीं.

ह्या नित्य व शुद्ध ब्रह्मतत्वाच्या विरुद्ध गौतमबुद्धानें लोकांना असा उपदेश दिला होता कीं, 'हें सर्व विश्व क्षणिक—विनाशी आहे, म्हणजे प्रत्येक पदार्थ नश्वर आहे.' हे त्यांचे शेवटचे शब्द होते. बौद्धांचें मत असें आहे कीं, आत्मवाद अर्थात् आत्म्याला अविनाशी

समजणें, हें मिथ्या आहे. संसारांत जितके पदार्थ आहेत, तितके द्रव्य मात्र आहेत, अर्थात् कोणतेंही नित्य द्रव्य नाहीं.

याप्रमाणें परस्परांच्या विरुद्ध विश्वाचें स्वरूप पाहणारे ब्राह्मण आणि बौद्ध यांच्या मतांचा तत्वतः विचार केल्यास विश्वाचें संपूर्ण अस्तित्व अविनाशी, निरपेक्ष आणि एकरूप आहे, हें ब्राह्मणधर्माचें मत सत्य आहे, असें वाटतें. आणि नेहमीच्या अनुभवावरून विचार केल्यास ' सर्व जग जन्ममरणांनीं व्याप्त आहे, अर्थात् नश्वर आहे, ' हें बौद्धांचें मतही रास्त दिसतें. या दोन्ही मतांपैकीं कोणत्याही एका मताचा विचार केल्यास त्यांत अनेक अडचणी उपस्थित होतात. वर सांगितलेल्या परस्परविरुद्ध दोन्ही धर्मांच्या मतांवर अंधविश्वास ठेवल्याशिवाय मात्र त्यांचे सिद्धांत कोणालाही पटणार नाहींत.

या तात्विक प्रश्नासंबंधानें जैनधर्माचें मत काय आहे, याबद्दल विचार केल्यास **' उत्पादव्ययध्रौव्ययुक्तं सत् '** अर्थात् जगांतील सर्व पदार्थ उत्पत्ति, स्थिति आणि नाश यांनीं युक्त आहेत. ह्मणजे जो पदार्थ उत्पन्न होऊन लयास जातो, तोच पदार्थ नित्यही असतो. वेदांत्याच्या नित्यवादाहून आणि बौद्धांच्या अनित्य-वादाहून जैनमत वेगळें आहे, हें समजण्याकरितां जैनलोक आपल्या सिद्धांताला **अनेकांतवाद** असें नांव देतात. उदाहरणार्थः–प्रत्येक जड पदार्थ पुद्गलस्वरूपाच्या अपेक्षेनें नित्य आहे. पण त्याच्या निर-निराळ्या आकाराला आणि गुणाला पोंहोंचणाऱ्या परमाणूंच्या अपे-क्षेनें जडपदार्थ अनित्य आहे. पुद्गलत्वाच्या अपेक्षेनें माती शाश्वत–अविनाशी आहे; परंतु घटाच्या अपेक्षेनें अथवा रंगाच्या अपेक्षेनें त्या मातीची उत्पत्ती आणि नाश हीं दोन्हीं संभवतात.

सामान्य रीतीनें विचार केल्यास जैनांचा हा सिद्धांत कांहीं गूढ नाहीं असें वाटतें. पण या वर सांगितलेल्या सिद्धांताला इतकें

महत्व कां दिलें, हें समजण्यास कठीण पडतें. तथापि जैनतत्वज्ञानाचा हा मूळ सिद्धांत आहे. स्याद्वादनयाच्या अपेक्षेनें विचार केल्यास या सिद्धांतास फारच महत्व द्यावें असें वाटतें.

मिथ्याज्ञानाच्या जाळ्यांतून सुटण्याला जैनप्रवचन (स्याद्वाद) हें अद्वितीय साधन आहे. स्याद्वाद सिद्धांताचा उपयोग वरवर पहाणाऱ्यास शुष्क वाटतो. पण 'एकमेवा द्वितीयं' आणि 'सर्व व्यापी परब्रह्म' या मताचें निराकरण करण्यास स्याद्वादाचा मोठा उपयोग होतो.

जैनांनीं आपल्या तत्वज्ञानाची इमारत सरळ आणि स्पष्ट कल्पनेवर उभी केली आहे. **जैनधर्म सर्वथा स्वतंत्र धर्म आहे.** माझा विश्वास आहे कीं, जैनधर्मानें कोणाचें अनुकरण केलेलें नाहीं. आणि ह्मणूनच प्राचीन तत्वज्ञानाचा आणि धर्मपद्धतीचा अभ्यास करणाऱ्यासाठीं जैनधर्म ही एक महत्वाची वस्तु आहे.

---

# रा. रा. वासुदेव गोविंद आपटे.

:0:

वि० सं० च्या पूर्वी ४७० वर्षांत वर्द्धमान (श्रीमहावीर) नामक जैन साधूंचा उदय होऊन त्यांनीं ज्यावेळीं जैनधर्माचा प्रसार केला होता, त्यावेळीं हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत, सीलोनपासून कराची व कराचीपासून कलकत्यापर्यंत किंबहुना त्याच्याहीपुढें ब्रह्मदेश, जावा वगैरे प्रदेशांमध्यें जैनधर्मी लोकांचा फैलाव झाला होता. हिंदुस्थानाच्या संपूर्ण व्यापाराचा ½ भाग जैनांच्या हातांत आहे, असें एका विद्वानाचें मत आहे. हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरांत जैनकार्यालयें, भव्यमंदिरें, अनेक लोकोपयोगी संस्था

आहेत. मध्यप्रांत, उत्तरहिंदुस्थान आणि गुजराथ या प्रांतांत जैनांचा प्राचीन कार्यभाग पुष्कळ अंशानें दृष्टिगोचर होतो.

प्राचीनकाळापासून जैनांचें नांव इतिहासप्रसिद्ध आहे. जैनधर्माचे अनेक राजे होऊन गेले आहेत. राजा वज्रकरण हा दशनगर-(मंदसौर) मध्यें राज्य करीत होता. तो जिनदेवाशिवाय इतर कोणत्याहि देवास भजत नसे. ललितपुराजवळ चंदेरी ह्मणून एक गांव आहे. तेथें शिशुपाल नांवाचा राजा राज्य करीत होता; तो जैन-धर्मीच होता. उज्जयनीचा राजा गंधर्वसेन व श्रीवर्मा हे जैन होते, असें कित्येक ग्रंथकार ह्मणतात. पण या दोघांबद्दल मला शंका आहे. वल्लभवंशी राजा कुमारपाळ हा जैनधर्माचा मोठा पुरस्कर्ता होऊन गेला. प्रसिद्ध बौद्ध राजा अशोकाचा प्रपौत्र महाराज संपदि, यानें जैनधर्माचा स्वीकार केला होता व अशोकही बौद्धधर्म स्वीकारण्यापूर्वी जैनधर्मानुयायी होता, असें विद्वानांचें मत आहे. कर्नल टॉडसाहेबांच्या ‘ राजस्थानीय इतिहासांत ’ उदयपूरच्या घराण्या-संबंधानें असें लिहून ठेविलें आहे कीं, ‘ कोणताही जैनयति उक्त संस्थानामध्यें ज्या वेळीं शुभागमन करतो, त्या वेळीं राणीसाहेब स्वत: मोठ्या आनंदानें आदरसत्काराची व्यवस्था करितात. ’ ही व्यवस्था तेथें अद्यापि चालू आहे. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, उदयपूरचा इतिहासप्रसिद्ध राणा प्रतापसिंह हा, अकबरबादशहाबरोबर लढतां लढतां थकून गेला; त्यावेळीं त्याला भामासा नांवाच्या एका जैन-महाशयानें वीस हजार सैन्याची मदत मोठ्या संतोषानें दिली. त्या वेळेपासून उदयपूरचें राज्य जैनांचें ऋणी होऊन राहिलें आहे. दुसरी, पन्नादाईची कथा सर्वांना विदित आहेच. बनवीरच्या भीतीनें आपल्या स्वामीपुत्राच्या रक्षणासाठीं आपला जीव धोक्यांत घालणाऱ्या पन्नादाईला राजपुत्रासहित ज्यानें आश्रय दिला तो

आसासा नांवाचा पुरुष जैनच होता, असें सांगतात. मंडपाचलामध्यें ( हल्लीं त्याला मांडू असें ह्मणतात ) मुसलमान बादशहांच्या वेळीं मुख्य दिवाणगिरीचे पदावर जैन होता. सारांश प्राचीनकालीं जैनांनीं उत्कट पराक्रम आणि राज्यकारभाराचें परिपोषण चांगलें केलें आहे. अर्वाचीनकालीं मात्र जैनांची राजकीय बाबतींत फारच अवनति दिसते.

प्राचीनकालीं राजकीय उन्नतीचा उपभोग घेऊन पुन्हां जैनांला जशी अवनत दशा आली तशी जैनवाङ्मयालाही वर्तमानसमयीं दुर्दशा आली आहे. प्राचीन जैनवाङ्मय संस्कृतवाङ्मयाची बरोबरी करीत होतें. धर्मशर्माभ्युदयमहाकाव्य, हम्मीरमहाकाव्य, पार्श्वाभ्युदयकाव्य, यशस्तिलकचंपू वगैरे काव्यग्रंथ, जैनेंद्रव्याकरण, काशिकावृत्ति व पंजिका, रंभामंजरी नाटिका, प्रमेयकमलमार्तंडासारखे न्यायशास्त्रविषयक ग्रंथ, हेमचंद्रासारखे कोश, याशिवाय जैनपुराण, धर्मग्रंथ, जैनइतिहासग्रंथ वगैरे असंख्य उत्तमोत्तम ग्रंथ आहेत; पण यांमधील फारच थोडे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत. अद्यापि शेंकडों ग्रंथ अज्ञात स्थितींत आहेत.

जैनधर्मामध्यें अहिंसा हें तत्व अत्यंत श्रेष्ठ मानलें आहे बौद्धधर्मामध्यें व आपल्या ब्राह्मण धर्मामध्येंही हें तत्व आहे. पण जैनलोक अहिंसा तत्वाच्या ज्या भागावर गेले आहेत, त्या भागापर्यंत अद्यापि उक्त दोन्ही धर्मांची मजल गेली नाहीं. परार्थाकरितां स्वार्थ सोडून देणारा जैनधर्म एकच आहे.

जैनलोकांचा भाविकपणा, श्रद्धा व औदार्य हे गुण प्रशंसनीय आहेत. एका कालीं जैनांची हिंदुस्थानांत पुष्कळ उन्नतावस्था होती. धर्म, नीति, राजकार्यधुरंधरता, वाङ्मय, समाजोन्नति वगैरे

गोष्टींत जैनसमाज इतर समाजांपुढें होता. प्रत्येक गोष्टींत ब्राह्मण व बौद्ध यांच्यापेक्षां जैनसमाजानें महत्पद मिळविलें होतें.

---

## रा. रा. बाळ गंगाधर टिळक.

---

जैनधर्माचा आणि ब्राह्मण धर्माचा अत्यंत निकट संबंध आहे. दोन्ही धर्म प्राचीन आणि परस्पर संबंध ठेवणारे आहेत. जैन आणि ब्राह्मण धर्म हे हिंदुधर्मच आहेत. ग्रंथांवरून आणि सामाजिक व्याख्यानांवरून जैनधर्म हा अनादि आहे, असें समजतें. आणि ही गोष्ट निर्विवाद व मतभेदरहितहि आहे. जैनधर्म अनादि असल्याबद्दल इतिहासाचे भरपूर पुरावे आहेत. चोवीस तीर्थंकरांत शेवटचे श्रीमहावीर तीर्थंकर ह्यांनीं जैनधर्माचा जीर्णोद्धार केला. बौद्धधर्मानें जैनधर्माचें अनुकरण केलें आहे.

**अहिंसा परमो धर्मः** या जैनांच्या उदार सिद्धांतानें ब्राह्मण धर्मावर चिरस्मरणीय छाप मारला आहे. पूर्वकालीं यज्ञासाठीं असंख्य पशुहिंसा होत होती. याला प्रमाण मेघदूतकाव्य आणि इतर ग्रंथ यांमध्यें पुष्कळ मिळतात. रतिदेव नांवाच्या राजानें यज्ञाच्या वेळीं इतका पशूंचा वध केला होता कीं, त्यामुळें नदीचें पाणी तांबडेलाल होऊन गेलें होतें ! त्या वेळेपासून त्या नदीचें नांव चर्मवती असें पडलें. पशुवधानें स्वर्ग मिळतो याबद्दल वरची गोष्ट साक्षीभूत आहे ! अशा घोर हिंसेपासून ब्राह्मणधर्माला परतविण्याचें श्रेय विशेषेंकरून जैनधर्मालाच आहे.

हिंदुधर्मा (ब्राह्मणा) मध्यें मांस भक्षण आणि मदिरापान बंद होण्यासही जैनधर्मच कारण आहे. हिंसेच्या विधानामुळें जैनधर्म

वेदाला मानीत नाहीं. पूर्वकालीं अनेक ब्राह्मण आणि जैनपंडित जैनधर्माचे धुरंधर विद्वान् होते. जैनधर्माचा आणि ब्राह्मणधर्माचा पाठीमागून किती निकटसंबंध झाला आहे, हें ज्योतिषशास्त्री भास्कराचार्य यांच्या ग्रंथावरून दिसून येईल. त्या आचार्यानें आपल्या ग्रंथांत ज्ञान, दर्शन आणि चारित्र हीं धर्माचीं तत्वें आहेत, असें ह्मटलें आहे. ब्राह्मणधर्म आणि जैनधर्म हे विशेष संबंधानें वेष्टित आहेत. एकाच आर्यप्रजेचे हे दोन धर्म आहेत. या दोन्ही धर्मांचा निकटसंबंध नेहमीं लक्षांत ठेवावयाला पाहिजे आणि परस्परांनीं ऐक्य वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

---

## जैनधर्मानुयायी इंग्रज गृहस्थ मि० हर्बर्ट वारन् यांच्या 'जैनिजम्'च्या लेखाचा संक्षिप्त अनुवाद.

---

जैनधर्माचा असा एक सिद्धांत आहे कीं, मनुष्याचें चांगलें किंवा वाईट होणें, हें त्यानें भूतकालीं केलेल्या कर्मांवर अवलंबून असतें. मनुष्य जें कांहीं करतो, त्याची जबाबदारी त्याच्यावरच असते. ज्या प्रकारचें तो कृत्य करील, त्याच प्रकारचा तो स्वतः अनुभव घेईल. अशा प्रकारें जैनधर्मानें व्यक्तिगत स्वातंत्र्य सर्वांना दिलें आहे. ती व्यक्ति स्वतः ज्या प्रकारच्या जीवनाची इच्छा करील, त्याच प्रकारच्या जीवनाचा उपभोग घेण्यास ती स्वतंत्र आहे.

---

# श्री. वरदाकांत मुख्योपाध्याय एम्. ए.

श्रीदेवनंद्याचार्यप्रणित 'दर्शनसार' ग्रंथावरून असें समजतें कीं, पार्श्वनाथ तीर्थंकरांच्या वेळीं, पलाश नगरींत शरयू नदीच्या कांठीं पिहिताश्रवाचे शिष्य बुद्धकीर्ति संन्यासी तपश्चर्या करीत होते. एके दिवशीं त्यांनीं नदीच्या पाण्यांतून बाहेर मरून पडलेला मासा पाहिला. मेलेल्या प्राण्याला खाण्यामध्यें कांहीं दोष नाहीं, असा विचार करून त्यांनीं तो खाल्ला. त्यांच्या गुरूंनीं त्याला प्रायश्चित् घेण्यास सांगितलें असतांही, त्यानें ती गोष्ट नाकारून दुराग्रहानें तपश्चर्या सोडून दिली आणि त्या वेळेपासून रक्तवस्त्र परिधान करून बौद्धधर्माचा प्रसार करण्यास आरंभ केला. ही गोष्ट आधाराला घेऊन दि० जैन पंडित शिवचंद्र ह्यांनीं, प्रश्नोत्तरदीपिकेमध्यें बुद्ध हा पूर्वी जैनसंन्यासी होता; पण आपल्या विषयप्रवृत्तीचें दमन करण्यास असमर्थ होऊन त्यानें आमिष भोजनाचा उपदेश दिला आणि रक्त वस्त्र घेऊन नवीन बौद्धधर्माची स्थापना केली, असें सिद्ध केलें आहे.

प्राचीनकाळीं दिगंबर ऋषि ऋषभदेव, **अहिंसा परमो धर्मः** या तत्वाचा उपदेश देत होते. त्यांच्या उपदेशानें देव, मनुष्य आणि इतर प्राणी ह्यांनीं त्या उपदेशाचा चांगला फायदा करून घेतला आहे. त्यावेळीं ३६३ पुरुष पाखंडीधर्माचे प्रवर्तक होते. चार्वाकांचा नेता शुक्र किंवा बृहस्पति यांपैकीं कोणी तरी एक त्या वेळीं होता.

प्राचीन जैन तीर्थंकरांनीं, मी कोण आहे? मी कोठून आलों? मी कोठें जाणार? जगांतील सर्व पदार्थ हे काय आहेत? वगैरे प्रश्नांचीं उत्तरें समाधानकारक दिलीं आहेत. त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, आत्मा, कर्म आणि जगत् हे अनंत आहेत. त्यांना

उत्पन्न करणारा कोणी नाहीं. आत्माच कर्में करणारा व त्यांची फळें भोगणारा आहे. जैनशास्त्रानुसार मानवात्मा व कल्पित ईश्वर ही एकच वस्तु आहे. निर्वाणप्राप्त आत्मा हाच ईश्वर आहे. आणि हाच आत्मा सर्वज्ञ आणि अनंत गुणविशिष्ट आहे.

# हिंदुस्थानच्या बाहेर अन्य देशांत झालेला जैनधर्माचा प्रसार.

## आशिया.

सर्वांच्या अगोदर हिंदुस्थानाबाहेरील आशिया ( Asia ) खंडांत जैनधर्माचा प्रसार झाला होता; त्याबद्दल पुरावा:—

मिस्टर ॲबि जे. ए. डु बाईस ( Abbe J. A. Du Bois ) हे म्हैसूर प्रांतांत मिशनरी होते. त्यांनीं फार्शी भाषेंत एक पुस्तक लिहिलें आहे त्याचें नांव " हिंदुस्थानांतील लोकांचा स्वभाव, आचरण, रीत, धर्म व गृहस्थासंबंधीं कर्तव्यांचें वर्णन " असें आहे. ( Description of the character, manners and the customs of the people of India and of their institutions religious and civil ) हें पुस्तक इ० स० १८०६ मध्यें म्हैसूरचे ॲक्टिंग रेसिडेंट [illegible]र विल्क ( Major Welke, Acting Resident at My[illegible]e ) यांच्या हातीं लागलें. त्यांनीं तें पुस्तक मद्रासच्या गव्हर्नर-स[illegible]कडे पाठविलें. त्यांनीं त्याचें इ० स० १८१७ मध्यें इंग्रजी भाषांतर करवून छापविलें. पुस्तकाच्या प्रस्तावनेच्या शेवटीं संपादकांनीं असें लिहिलें आहे:—

"I have subjoined to the whole an appendix containing a brief account of the Jains, of their doctrines the principal points of their religion and their peculiar customs.

Other writers possessing more information than I do, will hereafter instruct us more fully concerning this interesting sect of Hindus and particularly respecting their religious worship which probably at one time was that of all Asia from Sibiria to Cape Comorin North to South and from the Caspian to the Gulf of Kamaschatka from west to east, &c.—

अर्थः—मी एक पुरवणी जोडली आहे. तींत मी जैनलोक व त्यांचीं मतें आणि त्यांच्या धर्मांतील मोठमोठ्या गोष्टी आणि त्यांचे विशेष रीतिरिवाज ह्याविषयीं वर्णन केलें आहे. माझ्यापेक्षां अधिक ज्ञान आहे असे दुसरे लेखक, हिंदूंच्या या लाभदायक जातीबद्दल आणि विशेषेंकरून त्यांच्या धार्मिक पूजाविधीविषयीं अधिक माहिती कळवितील. ही पूजा सर्व आशियांत अर्थात् उत्तर सैबेरियापासून दक्षिणेकडील केपकुमारीपर्यंत, आणखी पश्चिमेकडील कॅस्पियन सरोवरापासून पूर्वेकडील कामश्चाटकाच्या खाडीपर्यंत पसरली होती, इत्यादि."

## युरोप.

बाबू प्यारेलालसाहेब जमीनदार, बरोठा जि० अलीगड यांनीं "हिंदुस्थान कदीम" या नांवाचें पुस्तक उर्दू भाषेंत लिहिलें आहे. त्यांत त्यांनीं पृष्ठ १ मध्यें लिहिलें आहे कीं, "ज्या वेळीं साऱ्या हिंदुस्थानांत बौद्धमताचा आणि हिंदुमताचा संग्राम होऊन राहिला

होता, त्या वेळीं बौद्धमताचे आणि जैनमताचे लोक येथून निघून युनान, फिनिशिया, फिलिस्थान, कार्थेज, रूम आणि मिसर या देशांत गेले. "

पुढें पृष्ठ १२ मध्यें ते लिहितात:—

" ज्या वेळीं यूनानमध्यें बौद्धमत, जैनमत आणि हिंदुमत यांचा सारखा फैलाव झाला, त्या वेळीं तेथें तीन राजे होऊन गेले. त्यांचीं नांवें:–श्री बुद्धलामा (Triptolema), सुमलबुद्ध (Eum-olpotes), देवकुलेश (Diocles) ब्राह्मणमताचा राजा, वगैरे. "

यापुढें पृष्ठ १७ मध्यें त्यांनीं लिहिलें आहे कीं:—

" मी असें सांगूं शकतों कीं, यूनानमध्यें जो (Parnasus) पर्णालस पर्वत आहे त्याचें दुसरें नांव (Devanika) देवनिका असें कां पडलें ? या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, जैनमताचे संत लोक, पर्णालस अर्थात् पानांच्या झोंपड्यांमध्यें राहतात. ह्मणून हें पहिलें नांव पडलें आणि त्या जागीं देवतांचा वास होता ह्मणून दुसरें नांव पडलें. "

## आफ्रिका.

जैनधर्माचा प्रसार आफ्रिकेंतही झाला होता, याबद्दल "हिंदुस्थान कदीम" नांवाच्या उक्त पुस्तकांत ४२ व्या पृष्ठामध्यें लिहिलें आहे कीं, " मिसर (इजिप्त) देशांत जाणारे लोकही आपल्या मायभूमीला विसरले नाहींत; त्यांना तिकडे जे जे पर्वत आढळले त्यांस त्यांनीं मेरू, कैलास अशीं नांवें ठेविलीं ".

सदर पुस्तककर्ते पृष्ठ ४५ मध्यें लिहितात:—

जैनमताच्या पुस्तकांत बर्बर देशाचें नांव कित्येक ठिकाणीं आढळून येतें, आणि ऋषभ तीर्थंकर हे दुसऱ्या देशाहून हिंदुस्था-

नांत आले, असें लिहिलें आहे. जैनधर्माचा मिसर देशाशीं संबं होता, असें ओरिएंटल ( Oriental ) आक्टोबर १८०२ च्या पत्रावरून समजतें.

पं० लेखाराम आर्यमुशाफरीकृत "**रिसाला जेहाद**" नांवाचें पुस्तक आहे. त्याच्या २५ व्या पृष्ठांत आफ्रिकेचा नकाशा दिला आहे. त्यांतील देशांपुढें मुसलमानी धर्माप्रमाणें अन्य धर्मांचींही नांवें दिलीं आहेत. त्यांपैकीं मिसर आणि नाटाल देशाच्या समोर जैनधर्माचेंही नांव आहे.

वरील प्रमाणांवरून आपला जैनधर्म कोणत्या तरी एका काळीं, आशिया, युरोप व आफ्रिका या तीन खंडांतही पसरला आणि आपल्या सत्य व उज्वल उपदेशाचा प्रकाश चोहोंकडे वि रला होता, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. *

---

* या भागांतील बहुतेक सर्व उतारे "**जैनधर्मका महत्व**" ( संपादक 'जैनमित्र' ) या हिंदी पुस्तकावरून भाषांतररूपानें घेतले आहेत यांत जैनेतर विद्वानांच्या व्याख्यानांचे व लेखांचे जे सारांश दिले आहेत त सर्वस्वी जैनधर्मास मान्य आहेत असें नाहीं; त्यांत पुष्कळ मतभेदात्मक व वादग्रस्त विषय आहेत. पण वाचकांनीं तिकडे कांहीं दृष्टि न पोंच . त्यांतील ग्राह्यांशाकडेच लक्ष द्यावें अशी आमची सूचना आहे.